

जेव्हा स्वातंत्र्याचे मांगल्य गीत गात होती भारत भूमी,
तेव्हा मात्र पारतंत्र्याचे चटके सोसत होती मराठवाडा भूमी,
सांगतात आजी-आजोबा आजही तेव्हाची परिस्थिती,
निजामाच्या गुलामगिरीने त्रस्त झालेल्या जनतेची करुण कहाणी...
धडक कारवाईमुळे निजाम राजवट पूर्ण झाली खिळखिळी,
गुलामगिरीचे तोडून साखळदंड स्वतंत्र झाली मराठवाडा भूमी,
जान ठेवून भूमीपूत्रांच्या त्याग बलिदानाची...
गाऊ गाथा मुक्ती संग्रामाच्या पराक्रमाची..

पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,
कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि
बी.आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय, मानवत



# मानवता

## हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा अमृत महोत्सव विशेषांक

२०२२-२३

पाथरी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

**कन्नुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि**

**बी.आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालय,**

मानवत – ४३१ ५०५

(नॅक मूल्यांकन 'ब' – तृतीय फेरी)

# मानवता




## २०२२-२३



# मानवता

## हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा

## अमृत ७५ महोत्सव

## विशेषांक
## २०२२-२३

**विद्यार्थी संपादक**

मराठी विभाग
**पानझाडे नेहा** (बी.ए. प्रथम वर्ष)
**नितीन चव्हाण** (बी.ए. तृतीय वर्ष)

हिंदी विभाग
**मयुरी नेरश डुळगच** (बी.ए. प्रथम वर्ष)
**जाधव रागिनी मुंजाभाऊ** (बी.ए. तृतीय वर्ष)

इंग्रजी विभाग
**विधी बालाप्रसादजी मुंदडा** (बी.ए. द्वितीय वर्ष)
**मीरा परमेश्वर बोंबिलवार** (बी.ए. द्वितीय वर्ष)

संपादक
**प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे**

कार्यकारी संपादक
**डॉ. पंडित लांडगे**

सदस्य
**डॉ. पवन पाटील**
**डॉ. सचिन चोबे**


मुद्रक
**मयूर प्रिंटर्स,**
वर्कशॉप रोड, कैलास नगर,
नांदेड - ४३१ ६०५.


**टीप :** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

नमस्कार...

शैक्षणिक वर्ष २०२२ -२३ चा महाविद्यालयाचा 'मानवता' वार्षिकांक आपल्या हाती देतांना मनस्वी आनंद होत आहे. 'हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा अमृत महोत्सव' या विषयावर आधारलेला हा अंक म्हणजे येणाऱ्या तरुण पिढ़ीला हैद्राबाद मुक्तीसंग्राम भारतीय स्वातंत्र्याचा पुर्णत्वाचा अमृत महोत्सव वर्षा निमित्त देशभक्तीचा स्फूल्लिंग, मनामनात पेटवणारी, हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील जुलमी निजाम  राजवटी विरोधातील संघर्षाचा ज्वाज्वल इतिहास विद्यार्थ्यांना सांगणारा, स्वातंत्र्य सैनिकांचे बलिदान, सांगणारा हा अंक नक्कीच विद्यार्थ्यांना प्रेरना देणारा आहे. हैद्राबाद मुक्ती लढ्याचे प्रनेते ज्यांच्या नावाने विद्यापीठ ओळखले जाते असे स्वातंत्र्यसेनानी स्वामी रामानंद तीर्थ आणि गोविंद भाई श्राफ यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना होईल.

सध्याचे भारतीय राजकारण, समाजकारण, अर्थकारण पाहिले तर राष्ट्रपुरुषांनी, क्रांतीकारकांनी दिलेला त्याग, बलीदान, आपण विसरत चाललो आहोत. राष्ट्रपुरुषांनी दिलेल्या नैतिक मुल्यांचा अभाव सर्वच क्षेत्रात दिसतो आहे. अशा वेळी भारताचा

आपण ७५ वा अमृत महोत्सव साजरा करीत आहोत. याच अनुशंगाने ‘हैद्राबाद मुक्ती संग्रामचा अमृत महोत्सव’ हा विषय घेून नक्कीच विद्यार्थ्यामध्ये राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय संस्कार घडवणारा हा मानवता अंक आहे.

आमच्या विद्यार्थ्यांनी आपल्या परिने हैद्राबाद मुक्ती संग्रामाच अमृत महोत्सव या विषयावर मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतुन लेख लिहिली आहेत. या अनुषंगाने त्यांनी, हैद्राबाद संस्थानातील पहिले बलीदान, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि सवामी रामानंद तीर्थ, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील शैक्षणिक संस्थांचे योगदान, ऑपरेशन पोलो इत्यादी लेख लिहून आपले मत व्यक्त केले आहे. या अंकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नक्कीच क्रांतीकारकांची त्याग, आदर्श डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करतील असा विश्वास वाटतो.

आपण या अंकाचे स्वागत कराल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी थांबतो.

धन्यवाद ...

**डॉ. भास्कर मुंडे**
प्राचार्य व संपादक



# मानवता

## हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा
## अमृत महोत्सव विशेषांक
## २०२२-२३

### मराठी विभाग

विद्यार्थी संपादक
**पानझाडे नेहा** (बी.ए. प्रथम वर्ष)
**नितीन चव्हाण** (बी.ए. तृतीय वर्ष)

# अनुक्रम


- **एकसंघ भारताचे स्वप्न : हैद्राबाद मुक्ती लढा – शितल परमेश्वर गायकवाड,** बी.ए. प्रथम वर्ष
- **हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा लढा – अंकीता रंगनाथ कुलकर्णी,** बी.ए.प्रथम वर्ष
- **मराठवाड्यातील मुक्ती संग्रामात स्त्रियांचा सहभाग : औरंगाबाद जिल्हा –**
  **अनुष्का कैलास कांबळे,** बी.ए.प्रथम वर्ष, **वैष्णवी गणेश भैरट,** बी.ए.प्रथम वर्ष
- **हैदराबाद मुक्तीलढ्यात परभणी जिल्हातील महिलांचे योगदान –**
  **चव्हाण नितिन आप्पाराव,** बी.ए.प्रथम वर्ष
- **हैद्राबाद संस्थानातील मराठी वृत्तपत्रे व पत्रकारिता –नंदीनी ज्ञानु कांबळे,** बी.ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद मुक्ती लढ्यात उस्मानाबाद जिल्ह्याचे योगदान –**
  **श्वेता नंदकुमार शिंदे, वैष्णवी रामप्रसाद रासवे,** बी.ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद संस्थानातील पहिले बलिदान – सवळे रोहीत,** बी.ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी – आकांक्षा मारोती मल्हारे ,** बी.ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी – नवघरे योगेश बबन,** बी.ए. तृतीय वर्ष
- **मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा अमृत महोत्सव – नंदीनी नागनाथ मोरे,** बी.ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ –**
  **तुपसमुंद्रे प्रदिप, शेख अलिम,** बी.ए. तृतीय वर्ष
- **निजामकालीन लातूर प्रदेशाचे जमीन महसुली प्रशासन –**
  **अतुल ज्ञानेश्वर चव्हाण,** बी.ए. द्वितीय वर्ष
- **हैदराबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे योगदान –**
  **कु. अश्विनी कसाब, कु. रोहीणी वान्हळे,** बी.ए. द्वितीय वर्ष
- **हैदराबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे कार्य –**
  **आकांक्षा चेवले** बी.एस्सी. प्रथम वर्ष, **संजना गोरे** बी.एस्सी. प्रथम वर्ष
- **सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीचा उदय – गणेश थोरे,** बी.कॉम. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद मुक्तीलढ्याच्या संदर्भात जालना जिल्ह्याचे योगदान**
  **शिवकन्या अशोक कनकुटे,** बी. ए. प्रथम वर्षे, **आश्विनी बळीराम कसाब,** बी. ए. प्रथम वर्षे
- **हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील शैक्षणिक संस्थांचे योगदान –**
  **वैष्णवी तुकाराम कौसाईतकर, कोमल ज्ञानेश्वर कौसईतकर,** बी.ए. तृतयी वर्ष
- **ऑपरेशन पोलो – संघमित्रा राजकुमार वडमारे,** बी.ए. प्रथम वर्ष
- **हुतात्मा गोविंदराव विनायक पानसरे – झाडे सपना बालाजी,** बी.ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात कंधारचा सहभाग –**
  **कु. अंकिता टाळेकार, कु. भारती बारटक्के,** बी. ए. तृतीय वर्ष
- **हैद्राबाद मुक्ती लढयात औसा तालुक्याचा सहभाग – पानझाडे नेहा,** बी.ए. प्रथम वर्ष
- **निजाम राज्यातील भु. महसुल व्यवस्था – जगताप प्रतिक्षा वसंतराव,** वर्ष



# एकसंघ भारताचे स्वप्न : हैद्राबाद मुक्ती लढा

**शितल परमेश्वर गायकवाड**
बी.ए. प्रथम वर्ष

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश स्वतंत्र झाला परंतु, तेलंगना, मराठवाडा कर्नाटक ही एकाच भारत मातेची लेकरं पारतंत्र्यातच होती. त्यामुळे मिळालेले स्वातंत्र्य हे अधुरेच होते १९४७ ला हे राज्य हैद्राबाद संस्थानाचा भाग होती. भारताला ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबादच्या लोकांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी १३ महिने २ दिवस संघर्ष करावा लागला. १७२४ ते १९४८ पर्यंत निजाम हा हैद्राबाद संस्थानचा शासक होता. हैद्राबाद हे ब्रिटिश राजवटीच्या अस्ताच्या वेळेपर्यंत टिकून असलेले भारतातील सर्वांत मोठे स्वायत्त्व संस्थानिक राज्य होते. भारताच्या स्वातंत्र्यानंतर निजामाने जनतेच्या विरोधात जाऊन भारतात विलिन होण्यास नकार दिला. परंतु निजाम हा हिंदू द्वेष्टा असल्याकारणाने त्याने जनतेवर अनेक अन्याय अत्याचार केले. त्यामुळे तेथील जनतेने निजामाच्या अन्यायाला त्रस्त होऊन स्वतंत्र्य भारतात विलिन होण्यासाठी सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले. त्याचबरोबर तत्कालीन गृहमंत्री आणि लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी केलेली पोलीस कारवाई म्हणजेच 'ऑपरेशन पोलो' याने निजामाला गुडघे टेकवण्यास भाग पाडले, व १७ सप्टेंबर १९४८ ला हैद्राबाद संस्थान निजामाच्या अधिपत्यातून स्वतंत्र होऊन भारतात विलीन झाले. भारताच्या संपूर्ण स्वातंत्र्याला अर्थ प्राप्त झाला.

सामाजिक : दक्षिण भारताच्या मधोमध असलेले हैद्राबाद संस्थानाचा निजाम हा हिंदूचा तिरस्कर्ता असल्याकारणाने त्याने जनतेच्या विरोधात जाऊन लोकशाही असलेल्या भारतात विलिन होण्यास नकार दिला व स्वंतत्र राष्ट्राची अग्रही भूमिका घेतली कारण हैद्राबाद संस्थानात ८८ टक्के हिंदू होते. ११ टक्के मुस्लिम तर १ टक्के इतर लोक होते. निजामाच्या अधिपत्याखाली असलेल्या हैद्राबाद राज्यात तेलंगणा, महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेश ज्यामध्ये औरंगाबाद,

बीड, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद, परभणी आणि कर्नाटकातील कलबुर्गी, वेल्लारी, रायचूर, यादगीर कोप्पल, विजयनगर आणि बिदर या जिल्ह्याचा समावेश होता. त्यावेळच्या हैद्राबाद संस्थानामध्ये राहणाऱ्या स्त्रियांचे स्थान हे अतिशय हीन दर्जाचे, बालविवाह, बालविधवा, अंधश्रद्धा, अज्ञान, निरक्षरता, दारिद्रता, कुपोषण, पडदा पद्धती या परंपरांच्या विळख्यात अडकली होती.

**रझाकार :**

हैद्राबाद संस्थानात जनतेला त्रास देण्याकरिता कट्टरपंथी असलेल्या कासीम रिझवीच्या नेतृत्वाखाली 'रझाकार' नावाचे एक लष्करी दल स्थापन केले व तेथील बहुसंख्याक हिंदूवर अत्याचार करणे, हिंदुना धर्मांतरण करण्यासाठी प्रवृत्त करणे, हिंदू मंदिरे तोडणे, जबरदस्तीने कर वसुली करणे, हिंदू स्त्रियांची अब्रु लुटणे, हिंदूची घरे जाळणे, जमिनी बळकावणे, सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला करणे यासारखे हिंस्त्र काम केले.

रझाकार हे तेथील जनतेला अतिशय त्रास देत असत. त्यांचा तेथे कायमच दरारा होता. परभणीत रझाकारांना हुसकावून लावणारे सुर्यभान पवार, विनायक राव, चारठाणकर, विश्वनाथराव कातनेश्वरकर यांसारख्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपल्या जीवाची तमा न बाळगता भारतात विलीन होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

**स्वातंत्र्य सेनानी व त्यांचे योगदान :**

१९३८ पर्यंत मराठवाडा स्वातंत्र्य संग्रमात स्त्रियांची भूमिका फारशी दिसून येत नाही. परंतू, त्यानंतरच्या काळात स्त्रीयांनी स्वातंत्र्य संग्रमात उत्साहपूर्ण सहभाग नोंदवल्याचे आढळून येते. मराठवाड्याच्या स्वातंत्र्यासाठी जनता आतुन धगधगत होती. याच स्वातंत्र्य संग्रामाला स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाचे नेतृत्व लाभले. प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून अनेक स्त्री व पुरुष नेत्यांनी लढ्याचे नेतृत्व केले.

ले. जनरल राजेंद्र सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली जनरल जयंत चौधरी, डी.एस. ब्रार, ए.ए.रुद्र यांनी 'ऑपरेशन पोलो' ही योजना राबवली. १३ सप्टेंबर १९४८ ला सुरु झालेली पोलीस कारवाई १७ सप्टेंबरला निजामाने शरणागती पत्करल्यावर हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम संपला सर्वांचे सूत्रधार हे सरदार वल्लभभाई पटेल होते.

अशाप्रकारे अवघ्या चार ते पाच दिवसातच तेलगू भाषिकांचे तेलंगणा, मराठी भाषिकांचे मराठवाडा आणि कन्नड भाषिकांचे कर्नाटक असे भाग करण्यात आले. एकसंघ भारताचे स्वप्न सत्यात उतरले.

■ ■ ■

# हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा लढा

**अंकीता रंगनाथ कुलकर्णी**
बी. ए. प्रथम वर्ष

१७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्तीयुद्ध म्हणून साजरा केला जातो. जरी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वतंत्र्य मिळाले पण त्याच वेळेस भारतातील जूनागढ, हैद्राबाद आणि कश्मिर हे भारतात सामाऊन घेण्यास तयार नव्हते. हैद्राबाद राज्यात मराठवाड्याचा समावेश होता आणि भारताच्या स्वातंत्र्यानंतर १३ महिने स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला आणि या संघर्षा नंतर मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळाले.

त्याच प्रमाणे हैद्राबादलाही स्वातंत्र्य मिळावे म्हणून भारत सरकारने हैद्राबाद राज्यावर लष्करी कार्यवाही करून ते भारतीय संघराज्यात विलिन करून घेतले. हैद्राबाद राज्याच्या विलिनिकरणासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त्र आंदोलन केले हेच अंदोलन भारतीय इतिहासात हैद्राबादाचा स्वतंत्र्य संग्राम या नावाने ओळखले जाते.

**हैद्राबाद मुक्ती संग्रमातील संघर्ष :**

हैद्राबाद राज्य हे ब्रिटिश भारतातील एक संस्थान होते. त्यात सध्याच्या तेलंगणा, मराठवाडा, उत्तर कर्नाटक, विदर्भातील काही भागांचा समावेश होता. १७२४ ते १९४८ पर्यंत निजाम हैद्राबाद संस्थानचा शासक होता. हैद्राबादच्या स्वतंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ स्वातंत्र्यानंतर, हैद्राबादला १९४८ मध्ये भारत सरकारने निझामाच्या राजवटीविरूयध्द पोलीस कारवाई करून भारतात सामावून घेतले. १ सप्टेंबर १९४८ चा दिवस हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक महत्वाचा क्षण होता. हैद्राबादच्या लोकांच्या सामुहिक इच्छाशक्तिने या प्रदेशाला स्वतंत्र देश बनवण्याच्या निजामाच्या प्रयत्नांना केवळ हाणून पाडले नाही तर या प्रांताला भारतीय संघराज्यात विलीन करण्याचा निर्णय घेतला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा संपूर्ण भारत स्वातंत्र्य दिन साजरा करत होता. तेव्हा हैदराबाद राज्याने भारतात विलिनीकरण करण्याची मागणी केल्यामुळे निजामाच्या रियासतीतील लोकांना छळ आणि दडपशाहीचा सामना करावा लागला. हैद्राबादचे लोक, निजाम आणि त्याच्या स्वातंत्र्यासाठी पूर्ण उत्साहाने लढत राहिले. भारताचे तत्कालीन गृहमंत्री आणि लोहपुरूष, सरदार वल्लभाई पटेल यांनी पोलिस  कारवाई करण्यासाठी घेतलेल्या धाडसी निर्णयामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाला शरणागती पत्करण्यास आणि भारतीय संघात सामिल होण्यास भाग पाडले या ऑपरेशनला ''ऑपरेशन पोलो'' असे नाव देण्यात आले. म्हणून उर्वरित भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हैद्राबादच्या लोकांना त्यांच्या स्वातंत्र्यासाठी १३ महिने आणि २ दिवस संघर्ष करावा लागला. निजामाला त्याच्या षडयंत्रात यशस्वी होऊ दिले असते तर भारताचा नकाशा आज असला नसता.

**''ऑपरेशन पोलो''**

निजामी शासनसत्तेचा प्रतिकार १०९ तासात संपुष्टात आला. ही पोलिस कारवाई म्हणजे लष्करी कारवाई होती. तिला ऑपरेशन पोलो नाव दिले होते. त्याआधी सीमेवर घुसखोरी करणाऱ्या निजामी लष्कर व रजाकारी टोळ्यांविरुद्ध ऑपरेशन कबड्डी चालवले गेले होते. इ.स.१९४८ च्या ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात ऑपरेशन पोलोची तयारी सुरु झाली. या मोहिमेसाठी फर्स्ट ग्वालियर लान्सर्स मैसूर लान्सर्स मेवाड

इन्फंट्री, फोर्स ग्वालियर इन्फंट्री, राजाराम रायफल्स, फर्स्ट मैसूर इन्फंट्री यातील दले तैनात केली होती. या लष्कराला हवाई दलाचे व रणगाड्यांचे सहाय्य होते. सदर्न कमांडचे सरसेनापती लेफ्टनंट जनरल राजेंद्रसिंह हे पुण्याच्या मुख्यालयातून सर्व सूत्रे हलवीत होते. वेगवेगळ्या विभागांसाठी दलप्रमुख होते. सोलापूरहून शिरलेल्या तुकड्यांचे नेतृत्व मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी यांच्याकडे होते तर औरंगाबादच्या बाजूने शिरलेल्या तुकड्यांचे नेतृत्व मेजर जनरल डी. एस. ब्रार यांच्याकडे होते. हैद्राबाद संस्थानात पाच दिशांनी लष्कर शिरले वायव्येला औंरगाबादकडुन, पश्चिमेला सोलापूरकडून ईशान्येला आदिलाबादकडून दक्षिणेला कर्नलकडून तर आग्नेयेला विजयवाड्याकडून लष्कराने संस्थानी हद्दीत प्रवेश केला.

१३ सप्टेंबर इ.स. १९४८ रोजी पहाटे, ४ वाजता कारवाई सुरु झाली पहिल्या तासातच तुळजापूर सर झाले. नळदुर्गला जोरदार प्रतिकार झाला. तेथील पूल निजामी सैन्याने उडवून देण्यापूर्वीच भारतीय लष्कराने कब्जात घेतला. सेनेने औरंगाबादच्या बाजूला जालना रस्त्याने मुसंडी मारली परभणी जिल्हात कन्हेरगाव जिंकले. कर्नल विभागात तुंगभद्रेवरील महत्वाचा पूल ताब्यात आला. आदिलाबाद भागात बल्लारशहाचा पूलही ताब्यात आला. वरंगल व बीदरच्या विमानतळांवर बाँबफेक केली.

१४ सप्टेंबरला दौलताबाद मुक्त केले. जालनाही मुक्त केले सोलापूरकडून शिरलेल्या तुकड्या सिंकदराबादच्या अर्ध्या वाटेवर पोहोचल्या. उस्मानाबाद व येरमाळाही ताब्यात आले. विजयवाड्याच्या फौजा सिंकदराबादपासून साठ मैलावर पोहोचल्या याच दिवशी कर्नुल येथील रझाकारांचा प्रतिकारही मोडून काढण्यात आला व वरंगल आणि बीदरच्या विमानतळांवर पुन्हा हल्ला करण्यात आला.

१५ सप्टेंबरला औरंगाबादवरील चढाई फत्ते झाली. हुमनाबाद पडले. शहागडच्या पुलावर कब्जा झाला. जनरल चौधरींची तुकडी सिकंदराबाद पासून नव्वद मैलांवर पोहचली. सप्टेंबर १९४८ ला हैद्राबाद हे भारतात विलिन होऊन हैद्राबाद मुक्ती संग्रामामध्ये सामिल योद्धाचा संघर्ष यशस्वी झाला.

■ ■ ■

# मराठवाड्यातील मुक्ती संग्रामात स्त्रियांचा सहभाग : औरंगाबाद जिल्हा

**अनुष्का कैलास कांबळे,** बी. ए. प्रथम वर्ष
**वैष्णवी गणेश भैरट,** बी. ए. प्रथम वर्ष

१३ सप्टेंबर १८४८ ला भारत सरकारने हैद्राबाद राज्याविरुद्ध पोलिस कारवाई करून तेथील जनतेला निजामी दास्यातून मुक्त करून स्वतंत्र भारताचे नागरिक केले.

भारतीय फौजांनी पोलिस कारवाई करून जरी हैद्राबादेतील निजामास शरण आणले तरी पूर्वी राजवटी विरुद्ध आपल्यावर होत असलेला अन्याय वेशीवर टांगल्याचे कार्य त्यावेळच्या जनतेने व निरनिराळ्या राजकीय संस्थाच्या मार्फत करण्यात आले. निजामशाही विरुद्ध शेतकरी, कामकरी, ग्रामीण-शहरी भागातील जनतेने, विद्यार्थ्यांनी, स्त्रियांनी आणि व्यापाऱ्यांनी अत्यंत तीव्र असा लढा दिला या लढ्यात शेकडो तरूण स्त्री पुरुष, देशप्रेमाने प्रेरित होऊन जुलमी राजसत्तेविरुद्ध उभे राहिले.

हा लढा एकाएकी सुरु झालेला नव्हता. १९३० पासून सुरु झालेल्या स्वातंत्र्य चळवळीने लोकांना प्रेरणा दिली. १९३५ पासून प्रयत्न होऊन १९३६ ला महाराष्ट्र परिषद कायम करण्यात आली. परिषदेने पहिले अधिवेशन परतूर जिल्हा परभणी येथे कै. गोविंदराव नानल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

७ सप्टेंबर १९३८ ला स्टेट कॉंग्रेसवर बंदी घालण्यात आली. तत्कालीन कार्यकर्त्यांनी ही बंदी मोडून आंदोलनाचा सत्याग्रह प्रारंभ केला. १८४७-४८ चा सामूहिक सत्याग्रह (सशस्त्र संघर्ष) हा पहिल्या सत्याग्रहाने सुरु झालेल्या कालखंडाचा अखेरचा परिणाम होता. १९३९ ला हैद्राबाद नॅशनल कॉन्फरन्स या नावाने काम चालू करावे असा आदेश देण्यात आला. कार्यकर्त्यांनी अहिंसा हे धोरण मान्य करून पुढच्या कामास सुरूवात केली. मधल्या काळात अशा अनेक घटना घडल्या ज्यामुळे या कामास वेगळे वळण लागले व सर्व साधारण लोकांनी सहभागी होऊन निजामी राजवटीस विरोध करण्यास प्रारंभ केला. ह्या विरोधात पुरुषांप्रमाणेच स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा होता. स्त्रियांच्या कामगिरीचा आढावा घेतांना आपणास असे दिसून येते की विद्यार्थ्यां, तरूणी मध्यमवयीन गृहिणी व वृद्ध सर्वांचा वाटा होता. ह्या सर्व स्त्रियांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी स्विकारली होती श्रीमती आशाताई वाघमारे यांनी.

स्वातंत्र्य संग्रामात सहभागी होण्यास खालील गोष्टी महत्वाच्या होत्या; १) शस्त्रास्त्रे गोळा करणे २) निधी गोळा करणे ३) कार्यकर्ते जमवणे ४) कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणे ५) जन जागृती घडवून आणणे व त्यासाठी सभा, संमेलने आयोजित करणे, मोर्चे काढणे बुलेटिन्स काढणे, वाटणे. प्रभातफेऱ्या काढणे, स्त्रियांनी महिला मंडळ स्थापन करून सत्याग्रहात सहभागी होणे, या सर्व कामात स्त्रियांनी हिरीरीने भाग घेऊन अपापल्यापरीने कामाचा वाटा उचलला आशाताई वाघमारे ह्या व्यवसायाने शिक्षिका होत्या. घरातील कुटुंबीय

स्वातंत्र्य आंदोलनाच्या लढ्यात उतरल्यामुळे त्यांच्या पासून त्यांनी प्रेरणा घेतली होती. त्या स्वत: एक उत्कृष्ट राजकिय कार्यकर्त्या होत्या १९३० पासून झालेल्या विविध स्वातंत्र्य आंदोलनाच्या चळवळीत त्या सहभागी होत्या. त्यांच्या निर्भिड व निडर स्वभावामुळे विद्यार्थीनींचा, पालकांचा व समाजाचा त्यांच्यावर विशेष लोभ होता, म्हणूनच मुक्ती संग्रामाच्या काळात महिला कार्यकर्त्याच्या तुकड्याच्या तुकड्या त्या निर्माण करू शकल्या व त्यांना कामाला लावू शकल्या.

तत्कालीन शालेय विद्यार्थ्यांवर त्यांचा प्रभाव तर होताच परंतु त्यांना मदत करण्याची अहमहिका विद्यार्थीनी मध्ये चालत असे. सेवादलामध्ये जाणे, प्रभातफेऱ्या काढणे, स्फुर्तीगीते गावून जनजागृती करणे, बुलेटीन काढणे, ते वाटणे निरोप पोहचविणे ही कामे विद्यार्थिनी सहजरितीने पार पाडीत असत. शाळेमध्ये सक्तीने शिकविल्या जाणाऱ्या उर्दु भाषेच्या वर्गावर बहिष्कार टाकला जात असे तसेच बाहेर विद्यार्थ्यावर लाठी हल्ला झाल्याची बातमी येताच सरकारी शाळेत संप घडवून आणला जात असे. अशा कामात प्रमिला पारनेकरच्या जोडीला, प्रमिला चौधरी, कु. कमल भोरे, रमण शहा, कुमुद शहा, कुमूद पाठक, कुमूद कुलकर्णी व देव यांचा सहभाग होता. ह्या विद्यार्थ्यांनीनी निडर बनून रात्री अपरात्री निरोप देण्याचे व कार्यकर्त्यांना संकटाची चाहूल देवून सावध करण्याचे काम केले वातावरण व परिस्थितीमुळे पालकांच्या कामात सहभागी होत औरंगाबादेत गोकूळनाथ मोहल्लात जून्या शारदा मंदिरमध्ये सुभाषचंद्र बोसाची जयंती साजरी होणार होती. परंतु आई-वडिलांनी घरात कोंडून ठेवल्यामुळे अडचण आली. मुलीने गच्चीवरून दुसऱ्याच्या घरात उतरुन व मागच्या गल्लीने शाळेत पलायन केले व कार्यक्रम आटोपून पून्हा त्याच मार्गाने घरात प्रवेश केला.

अनेक वेळा स्त्रियांच्या प्रभातफेऱ्या मोठ्या फेरीस व मोर्च्यास शासन हरकत घेत असे विशेषत: ह्या प्रभात फेऱ्या मोठ्या प्रमाणावर काढल्या जात असत. आशाच प्रकारे एकदा निजामी पोलिसांनी मोर्चास परवानगी नाकारली. परंतू निम्म्या स्त्रियांनी याचा विचार न करता व शासनाचा आदेश धाब्यावर बसवून मोर्चा काढला. बाळकृष्ण मंदिरात या सर्व स्त्रियांना आडविण्यात आले व त्यांच्या देखत त्यांच्या बरोबरच्या पुरुषावर भयंकर लाठीमार करण्यात आला. तरी देखील आपले नितीधैर्य न खचू देता जिद्दीने लहान मुलांना कडेवर घेऊन या महिला सायंकाळपर्यंत तेथेच बसून राहिल्या. शेवटी शासनाला त्यांची दखल घ्यावी लागली व त्यांना परवानगी देण्यात आली. प्रभात फेरीचे रुपांतर सायफेरीत झाले. शासनाचे आदेश धाब्यावर बसवून महिलांनी स्टेट कॉंग्रेस जिंदाबाद अशा प्रकारच्या दणदणीत घोषणा देवून गोकूळनाथ मोहल्ल्यात सभा घेतली. प्रत्येक लढ्यात भाग न घेता लढ्यात आर्थिक व कटाच्या स्वरुपात मदत करणाऱ्या अनेक महिला होत्या. पैकी द्वारकाबाई केळकर, कुसुमताई साठे, विमलाबाई टाळकर होत. अनेक गृहिणी भूमिगतांना आपल्या घरात आश्रय देत असत. त्यांची जेवणाखाण्याची, राहण्याची सोय करीत असत. आशाताईचे घर हे भुमिगतांचे केंद्र होते. त्यांना जेवण तयार करण्यासाठी लागणारी मदत अन्नपूर्णाबाई भालेराव, मालतीबाई कुलकर्णी, सुमिता कुलकर्णी, लक्ष्मीबाई शिंदे, विठाबाई वाणी अशा सारख्या अनेक अशिक्षित महिला करीत असत. ढाकेफळ येथील पूर्ण वेळ डॉ. गुलाबचंद नागोरी यांच्या पत्नी आनंददेवी नागोरी, तसेच औरंगाबाद येथील गोविंदभाई श्रॉफ यांच्या पत्नी सत्यवतीबाई श्रॉफ त्यांच्या दोघी बहिणी आल्या व मातोश्री याही चळवळीत सामील होत्या.

स्त्रियांच्या शौर्याची कामगिरी दर्शविणाऱ्या काही घटना बोलक्या ठरतात त्यापैकी हुतात्मा मोसाज धोंडाबाई

यमाजी ह्या स्त्रीने गाडीमध्ये आश्रयास आलेल्या भुमिगत कार्यकर्त्यांना त्यांच्या शस्त्रासह पळून जाण्यास मदत केली. सर्व रजाकारांनी गढीला वेढा दिला असता मुख्य दरवाजावर तीने तीस पाळीत रजाकरांना तीन तास थोपवून धरले व तेवढ्या अवधीत आतील भुमिगत कार्यकर्ते शस्त्रांसहित पळून गेले. शेवटी रजाकारांनी बाईला लाथा –बुक्क्यांनी तूडवून ठार मारले परंतू बाईने शेवटपर्यंत तोंड उघडले नाही. आपल्या चळवळीशी व कार्यकर्त्यांशी ती प्रामाणिक राहीली.

नांदेड येथे गोपाळशास्त्री देव ह्यांच्याकडे काशिनाथ वैद्य यांचा अल्पकाळ मुक्काम होता त्याचवेळी गोपाळशास्त्री देवांच्या मुलाचा मृत्यू झाला होता. प्रेत घरात तसेच ठेवून शास्त्री कूटुंबाने पाहूण्याचे अतिथ्य केले व त्यांना पाठवून दिल्यानंतर मुलाचा अंत्यविधी पार पाडला कोलता पिंपळी या ठिकाणी रजाकारांनी हल्ला करून ध्वजाचा अपमान केला तेव्हा तेथील दगडाबाई शेळके नावाच्या महिलेने ३०३ रायफलचा उपयोग करून रजाकारांना पळविले, चौघांना लोळविले, बाईने पुन्हा झेंडा आपल्या ऑफीसवर आणून लागला. दगडाबाई अशिक्षित होत्या परंतु शस्त्रास्त्र चालविण्याचे, शिक्षण मात्र त्यांनी घेतले व प्रसंगी उपयोग करून शत्रुला लोळविले.

परतूर भागात रजाकारांनी फुलपांगरी या ठिकाणी लमाणी तांड्यावर हल्ला केला. तेंव्हा लमाणी पुरुष आजूबाजूच्या भागात लपले. परंतु स्त्रियांच्या साह्याने दगडांचा मारा करून रजाकारांना पळवून लावले व पुढे भुमिगतांचे ते एक संरक्षण केंद्र ठरले. तत्कालीन सामाजिक व राजकीय परिस्थितीचा विचार करता एक गोष्ट आपणास शासक हे मुसलमान होते आणि नाही म्हणटले तरी हिंदूच्या विरुद्ध मुसलमान ही तेढ होतीच. मुसलमान पडदा पद्धतीचा प्रभाव हिंदू स्त्रियांवर होत व त्यात शिक्षणाचे प्रमाणही अल्प होते. समाजावर जुन्या विचारांचा, रुढी परंपरेचा पगडा बऱ्याच प्रमाणावर होता अशा परिस्थितीत स्त्रियांनी घराबाहेर पडून कार्यकरणे म्हणजे एक प्रकाची क्रांती ठरली. सामाजिक दृष्टीने त्यांचे महत्त्व फार मोठे होते.

■ ■ ■

# हैदराबाद मुक्तीलढ्यात परभणी जिल्हातील महिलांचे योगदान

**चव्हाण नितिन आप्पाराव**

बी. ए. प्रथम वर्ष

हैद्राबाद संस्थानाचा इतिहास हा भारतीयांचा अविभाज्य भाग आहे. तत्कालिन हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटक अशा तीन विभागाचा समावेश होता. भारत स्वतंत्र होवूनही मराठवाड्यातील जनता पारंतत्र्य होती. गुलामगिरी, अत्याचार, अन्याय या मधून सुटका करुन घेण्यासाठी येथील जनतेने उत्स्फुर्त लढा दिला होता तोच लढा स्वातंत्र्य चळवळीतील एक तेजस्वी पर्व समजले जाते. हैद्राबाद मुक्ती आंदोलनात शेतकरी, मजुर, दलित, स्त्रिया, आदिवासी, काही समाज मुसलमान व्यक्तीनी भाग घेतला.

निजाम सत्तेविरुद्ध सर्वप्रथम परभणी जिल्ह्याने रणशिंग फुकले : परभणी जिल्हा अगदी सुरुवातीपासुन राजकिय दृष्टीने जागृत राहिला आहे. निजाम राजवटी विरुद्ध असंतोषाला योग्य व भारदस्त नेतृत्व देण्याचे भाग्य परभणी जिल्ह्याला लाभले आहे. निजाम सत्तेविरुद्ध संघर्षाची पहिली ठिणगी उडाली ती परभणी जिल्ह्यातूनच. श्री गोंविदराव नानल हैद्राबाद स्टेट कॉंग्रसचे पहिले अध्यक्ष होते. महाराष्ट्र परिषदेचे पहिले अधिवेशन परभणी जिल्ह्यातील परतूर (आत जि. जालना) येथे झाले. त्याही अधिवेशनात अध्यक्ष गोविंदराव नानल हेच होते. याच अधिवेशनामुळे स्वातंत्र्य लढ्याला खरी सुरुवात झाली. ही चळवळ नंतर मराठवाड्यात व संपूर्ण हैद्राबाद संस्थानात पसरली. निजाम सत्तेविरुद्ध लढा देण्यासाठी परभणी जिल्ह्यातील नेते श्री गोविंदराव नानल श्री मुकूंदराव पेडगावकर, श्री. श्रीनिवासराव बोरीकर यांच्या बरोब इतरही नेत्यांची कामगिरी उल्लेखनीय स्वरुपाची आहे. याशिवाय संघटना बांधण्यासाठी जनतेमध्ये वेळोवेळी राजकीय जागृती निर्माण करण्याचे कार्य परभणी जिल्ह्यातील सर्व संघटकांनी केले.

हैद्राबाद मुक्ती लढ्यात परभणी जिल्ह्यातील अनेक वीरांनी व पुढाऱ्यांनी नेत्रदिपक कार्य केले. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी जसा भाग घेतला तसा मराठवाड्यातील महिलांनी हैद्राबाद मुक्ती लढ्यात पुरुषाच्या बरोबरीने सक्रिय सहभाग घेतला.

**महाराष्ट्र परिषद लातूर १९३८ :**

१९३८ मध्ये महाराष्ट्र परिषदेचे दुसरे आधिवेशन लातूर येथे घेण्यात आले. पुरुषांबरोबर परभणी जिल्ह्यातील अनेक महिलांनी सहभाग घेतला. त्यामध्ये शांताबाई चारठाणकर, शांता पेडगावकर, सौ. मानवतकर , सौ. बीडकर इत्यादी महिला लातूरच्या हजारो महिला आल्या होत्या. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांना स्वातंत्र्य लढ्याच्या राजकारणात सक्रिय केले.

**महाराष्ट्र परिषद सेलू १९४५ :**

सेलु येथे महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन घेण्याचा मान परभणी जिल्ह्यास दुसऱ्यादा मिळाला या अधिवेशनाला जोडूनच महिला परिषद घेण्यात आलि या परिषदेच्या अध्यक्ष सौ. सुशीलाबाई दिवान होत्या. तर स्वागत अध्यक्ष सौ. सस्वतीबाई बोधनकर ह्या होत्या. परिषद यशस्वी करण्यासाठी सौ. गीताबाई चारठाणकर, शांता पेडगावकर या सारख्या महिलांबरोबर अन्य महिला सहभागी होत्या. येथेच महिला समेलन संघटना स्थापना करण्यात आली. सेलू येथील महाराष्ट्र महिला परिषद विविध प्रश्नावर समस्येवर विचार मंथन झाले या

परिषदेसाठी मराठवाड्यातील सर्व विभागातून मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या चर्चेत महिलांनी स्वयंस्फुर्त भाग घेतला ही विषेश बाब होय. निजामी राजवट उलथून टाकण्यासाठी ठोस निर्णय घ्यावेत असा सर्व स्त्रियांचा सुर होता. त्यांनी आपल्या भावना अत्यंत कडवट शब्दात व्यक्त केल्या होत्या.

**महिलांचा विविध शिबिरातील सहभाग :**

१९४४ मध्ये नांदेड येथे महिलाचे दोन आठवड्याचे शिबीर घेण्यात आले. त्यातही परभणी जिल्ह्यातील महिला सहभागी होत्या. दुसरे महिला शिबीर परभणी येथे १९४५-४६ मध्ये घेतले त्यासाठी सौ. गीताबाई चारठाणकर, शांताबाई पेडगावकर, सौ. सुशिलाबाई भालेराव, सौ. सरस्वतीबाई बोरीकर यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले एस.आर. गुरुजी हे शिबीराचे संयोजक होते. या शिबीरात संपूर्ण मरराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातून मोठ्या शिबीरात आलेल्या महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी बाहेरुन अनुताई लिमये जानकिबाई आपटे, सुशिलाबाई पै आणि आपटे गुरुजी आले होते. या शिबीरानंतर मुलींचे कॉंग्रेस सेवादलही चालू केल्यामुळे महाराष्ट्र परिषदेच्या कार्यात मुलींचा गट काम करू लागला. अनंत भालेराव, विनायकरराव चारठाणकर, द.रा. मेढेकर, श्रीनिवास बोरीकर त्यांना मार्गदर्शन करीत असत.

**हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या अंतिम लढ्यातील महिलांचे कार्य :**

हैद्राबाद मुक्ती लढ्याच्या अंतिम टप्यात अनेक महिलांचे कार्य महत्वपूर्ण आहे. हिंगोली येथील सौ. शैलजाबाई गोगटे, अनुसयाबाई खोडवे, सौ. टाकळकर, सौ. देशपांडे याही चळवळीत सहभागी होत्या हैद्राबादला महिलांच्या चार तुकड्या सत्याग्रहासाठी गेल्या. त्यामध्ये सौ. विमलताई मेलकोट, सौ. सिताबाई नादापरुकर, सौ. उषा पांगरीकर इत्यादी महिलांनी सत्याग्रहसाठी सहभाग घेतला. हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यात शेवटच्या टप्यानंतर निजाम व रझाकारांच अत्याचार शिगेला पोहचले होते. त्यानी अनेक गावावर हल्ले केले. गुंडा नावाच्या गावावर चंदा वसुल करण्यास्तव रझाकार गेले असता त्यांनी लोकावरती गोळीबार केला, त्यामुळे अनेकांना हौतात्म्य पत्कारावे लागले. त्यामध्ये मालनबाई जोशी व त्याची चार वर्षाची मुलगी शकुतला यांची रझाकारानी हत्या केली व रझाकारांच्या अत्याचाराचा निषेध निजाम पोलिसांच्या करण्यासाठी मे १९४८ मध्ये परभणी जिल्हा कचेरीवर १०० महिलांनी मूक मोर्चा नेला आणि धरणे धरुन एक दिवसाचा उपोषण केले. मोर्चामुळे निजाम सत्तेस हादरा बसला.

हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्याची सांगता निजामाच्या विरुद्ध चर्चेचे सर्व मार्ग बंद झाले असताना भारताच्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या सप्टेंबरच्या बैठकित पोलिस कार्यवाहीचा निर्णय घेण्यात आल. १५ सप्टेंबरला ऑपरेशन पोलो या सांकेतीक नावाने प्रत्यक्ष कार्यवाहीस सुरुवात झाली. ही कार्यवाही १०८ तासात पूर्ण झाली. १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी ५ वाजता निजामाच्या लायक अल्लीच्या मंत्रीमंडळाने शणागतीची मंत्रीमंडळाच्या राजीनामाची, युद्धबंधीची व रझाकार संघटनेवर बंदी घातल्याची घोषणा केली आणि निजाम शरण आला. हैद्राबाद संस्थानातील मुक्तीसंग्राम यशस्वी झाला. परभणी जिल्ह्यातील महिलांनी हैद्राबाद मुक्ती लढ्यासाठी अत्यंत असाधारण कामगिरी बजावली आहे. अन्यायी, अत्याच्यारी निजामी सत्तेविरुद्ध समाजात जागृती घडुन आणली, अस्पृशता, निवारा, हुंडाबळी, पुर्नविवाह, बालविवाह बंदी या सारखे सामाजिक कार्य केले. स्त्रियांना व पुरूषांना भजनातुन भक्तिपासून राष्ट्रीयवृत्ती जोपासण्याचे काम केले. महिलांनी खेड्यापासून जावून जन जागृतीचे निजाम सत्तेविषयी चिड निर्माण करण्याचे महान काम केले त्यामुळेच लोकलढा सर्वसमावेशक होऊ शकला.

■ ■ ■

# हैद्राबाद संस्थानातील मराठी वृत्तपत्रे व पत्रकारिता

**नंदीनी ज्ञानु कांबळे**
बी. ए. तृतीय वर्ष

हैद्राबाद हे भारताच्या मध्यवर्ती असणारे संस्थांन. हैद्राबाद संस्थांनाची स्थापना निजाम उल-मुल्क फिरोजजग चिन्कलीच खान मीर कमलादीने १७२४ ला केली. पराक्रमाच्या जोरावर १७२४ - ४८ पर्यंत निजामाने साम्राज्यविस्तार केला यांच्या मृत्यूनंतर असफशाह गादीवर ६ वारसदार १८४८ पर्यंत झाले. २० ऑक्टोबर १८०० ला दुसऱ्या निजामाने ब्रिटीशांनी एक करार केला. त्यान्वये हैद्राबाद संस्थानाचे रुपांतर नेहमीसाठी सरक्षीत राज्यात झाले. निजाम ब्रिटिशांच्या अंकीत बनला. निजामाने ब्रिटिशांनी करार आणि संस्थांनात पाश्चात्यांचे आवागमन सुरु झाले. त्यांच्या आगमनाबरोबर संस्थानात विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनही सुरु झाला. १९ ला शतकाच्या मध्यांनंतर संस्थानात भौतिक सुधारणा सुरु झाल्या. तारारांयत्रे रेल्वे, पोस्ट, लष्करयत्रणा, शास्त्रस्त्रे व साहित्य आणि छपाईयंत्री ही आली संस्थानात विचारमंथन सुरु झाले. पण संस्थांनात ह्या सर्व सुधारणा राजधानी हैद्राबादचा ठिकाणी केंद्रीत होत्या.

**संस्थांनातील वृत्तपत्रे :-**

हैद्राबाद संस्थांनात सरजामशाही व्यवस्था होती. राजेशाहीत वृत्तपत्राला आणि मुक्त पत्रकारितेला स्वातंत्र्य नसते कारण वृत्तपत्र स्वातंत्र्याला आणि मुक्त पत्रकारिता हे दोन तत्व लोकशाहीत असतात. हैद्राबाद संस्थानात आंध्रचे ०८, महाराष्ट्राचे ०५ कर्नाटकाचे ०३ जिल्हे होते. तसेच हैद्राबाद संस्थानात मोगल, तुर्क, पठाण, अरब फ्रेंच, इंग्रज तसेच तामिली, गुजराथी, कायस्थ, मारवाडी, राजपुत आणि सुधारणा हैद्राबादमध्ये झाल्या. हैद्राबादमध्येच प्रथम छपाई यंत्र रेसिडंसीच्या भागात निघाले. प्रथम वृत्तपत्र 'दख्कन टाईम्स' १८६४ ला सिकंदराबादहून प्रसिद्ध झाले ते स्थेडेंसीचेच होते. पुढे त्यावर निजामाने ताबा मिळवला व ते बंद केले. निजामी शासन छपाई यत्रांस परवानगी, द्यावयास नाखूष होते. हैद्राबाद दुरसंचार 'हैद्राबाद रेकॉर्डस' डेक्कनपोस्ट हैद्राबाद, बुलेटीन, द डेली न्युज, द न्यूएरा' ही इंग्रजी वृत्तपत्रे तर दख्खन पुनेश मुशेरे दख्खन, साहिबा रहेबार - इ - दख्खन, वत्क,पाचम, गॅझेट, तुथे-ए-दख्खन मुमालिकत हे उर्दु वृत्तपत्रे काढले. यातील बरीच वृत्तपत्रे ही इंग्रजी (ब्रिटिश) रेसींडन्सीची होती. तर उर्दु वृत्तपत्रे हे निजामी शासनाची होती ह्या वृत्तपत्रानी सामाजिक, शैक्षणिक, आणि स्थानिक समस्यांना राष्ट्रीय संस्थेपेक्षा जास्त महत्त्व दिले निजामाच्या हातात आपल्या धोरणाचा प्रसार करण्यासाठी रेडिओ, १० दैनिके, ७ साप्तहिके होती. ती निजाममी धोरणाची री ओढत.

अशा परिस्थितील मराठी भाषेतून वृत्तपत्रे निघाली ती उर्दू आणि इंग्रजी वृत्तपत्राच्या तूलनेत अल्प होती पण मराठी वृत्तपत्रानी मोठा वाचक वर्ग निर्माण केला व लोक मिळवला. त्याच मराठी वृत्तपत्रांनी आंदोलन उभे केले. ह्या मराठी वृत्तपत्राच्या उद्‌गम मात्र अल्पंत खडतर मार्गातून झाला पण ते आपल्या पत्रकारितेत अंतिमतः सफल झाल्याचे दिसते.

**संस्थानातील मराठी वृत्तपत्रे (१८८३ - १९००)**

**प्रथम टप्पा :-**

मुक्ती लढ्यासाठी मराठी वृत्तपत्रे हैद्राबाद आणि

मराठवाड्याबाहेर निघाली. संस्थांनात इंग्रजी वृत्तपत्र आणि मराठवाड्याबाहेर निघाली. संस्थांनात इंग्रजी वृत्तपत्र आणि उर्दू वृत्तपत्र निघाल्यानंतर १५-२० वर्षांनी प्रथम मराठी वृत्तपत्र निघाले. १८६४ ला इंग्रजी तर १८७८ ला उर्दू वृत्तपत्र निघाले तर १८८३ ला औरंगाबाद समाचार नावाचे वृत्तपत्र निघाले १८९४ ला संस्थांनातील काहीनी हैद्राबाद संस्थाना बाहेरीला विशेषत: पश्चिम महाराष्ट्रातील वृत्तपत्राची प्रेरणा घेवून मराठी साप्ताहिके सुरु झाली. त्यात हैद्राबाद मराठवाड्यातील प्रारंभीच्या काही वृत्तपत्रात १८९४ ला श्री. रामचंद्र वासुदेवराव कुलकर्णी यांनी हैद्राबादहून 'भाग्यनगर १८९७ ला नरसो मुकुंदरावनी भाग्येश नगर' तसेच गगांलहरी, १८९८ ला चपावंती गुलबर्गा समाचार' ही शिला प्रेसवर निघू लागली होती. ह्याचा ऐतिहासिक पुरावा मिळतो. ही वृत्तपत्रे ही अल्पजिवी व अल्प परिणामकारक ठरली.

हैद्राबाद संस्थांतील मराठी वृत्तपत्र कारिता :-

संस्थांनात मराठी पत्रकार प्रवृत्ती ही कमी अधिक प्रमाणात इ. स. १८९४ पासून घडपड करीत होती. हैद्राबाद राजधानीचे ठिकाणीच होते असल्याने न्यायालये, शिक्षण केंद्रे, प्रशासकीय कार्यक्रम, कॉलेजस, विद्यापीठ ह्या ठिकाणीच होते. त्यामुळे हैद्राबादला संस्थांनातून अनेक मंडळी स्थाईक झाली होती.

अशा व्यक्तीत मराठी भाषिक मंडळीचा एक गट प्रभावी होता. त्यात धनाढ्य म्हणून ओळखले जाणारे धर्मवीर वामन नाईक, न्या, कोरटकर, श्री राघवेंद्र शर्मा, श्री. वेदमहर्षी, श्रीपाद दामोधर सातवळेकर, श्री. हत्तो अप्पाजी तूळजापूरकर, श्री लक्ष्मणराव फाटक, श्री दिगांबरराव बिंदू, श्री काशीनाथ वैद्य, श्री रामचंद्र अतू यांचा समावेश होता. ह्यांनी सामाजिक व शैक्षाणिक परिषदातून जागृतीचा प्रयत्न केला. ह्यांनी वृत्तपत्रातून राजकीय जागृतीवर भर दिला. ह्यांची पत्रकारिता राजकीय पत्रकारीता होती. संस्थांनात २० व्या शतकाच्या, प्रथम तीन दशकात मोठ्याप्रमाणात राजकीय प्रबोधन झाले. वृत्तपत्रांनी राजकीय विषयाला महत्वपूर्ण स्थान प्राप्त करुन दिले. ही मराठी पत्रकारिता संस्थानात असलेल्या इंग्रजी, उर्दु, हिंदी, तेलगू आणि कन्नड भाषिक पत्रकारितेत अग्रगण्य होती. राजकीय पत्रकारिता असली तरी त्याला चळवळ पत्र करिता म्हणणेच आधिक योग्य ठरेल. मराठी पत्रकारिता जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणारी होती. पत्राच्या बातम्यांचे विषय सामाजिक, राजकीय, आर्थिक, साहित्यिक इ. होते. श्री दिगांबरराव बिंदूनी निजामविजय 'निघण्यापूर्वी बोध' मधून लिखाण केले हे लिखाण जहाल होते. त्यांनी ३-४ वर्षे असेल जहाल लिखाण 'बोध' निजामविजय व नागरीक मधून केले. निजामविजयमधून लिहिलेल्या टिका निजामाला झोंबताच त्यांची वकिलीची सनद रद्द करण्यापर्यंत विचार निजामाने केला अखेर निजामाच्या कायदेविषयक सल्लागाराने प्रतिकूल मत दर्शवल्याने तो विचार निजामाने सोडला. निजामविजयने तर पत्रकरिकेवर राष्ट्रवादी भावना, क्षात्रतेज निर्माण केले. श्री केशवराव असा अग्रलेख छापून त्या रानडेशी त्यांची तुलना केली. आमचे राजकीय साध्य हैद्राबाद राजकीय परिषद आधी कळस मग पाया हा व्यायाचा मार्ग नव्हे शिक्षण प्रसार की मद्य प्रसार असे अग्रलेख लिहिले. निजामाने १९२९ ला गिश्ती निशान ५३ लागू करुन वृत्तपत्रावर, राजकीय सभा बरोबरच इतर प्रकारच्या सभावर बंदी घातली तेव्हा ही श्री. केशवराव कोरटकरांनी लिहिले की, एखाद्या मृत्यूची शोकसभा घ्यावयाची तर मरणाऱ्याने १० दिवस आधी नोटीस द्यावी का ? असे लिखाण करुन एक पिढी चळवळीसाठी तयार केली. ही पत्रकारिता जनइच्छा सांभाळणारी होती संपादकाना अंक छापण्यापूर्वी अंकाची एक प्रत कोतवालाकडे द्यावी लागे. अनेक कायद्याचा व निजामाच्या लहरीचा विचार वृत्तपत्र मालकांना क्षणोक्षणी करावे लागे.

आ. कृ वाघमारेंनी मराठवाड्यात मराठी वृत्तपत्राच्या इतिहास एक आदर्शच घडविला. निजामी प्रदेशात बंदी असतानाही अनेक नावांनी मराठवाडा वृत्त काढून मराठवाड्यातच नव्हे तर संस्थानात असंतोषाला वाट देणारी महान व शैलीदार वाघमारेची पत्रकारिता हैद्राबाद, मुक्ती संग्रामात शब्दसंगीत बनलेली होती. असे एखादे नियतकालिक एका गावाला किंबहूना काही गांवाना जागे करायला पुरसे होते. येथील पत्रकारिता आकाराने क्षीण असली तरी सामर्थ्यवान व धारदार होती. मराठी वृत्तपत्राच्या कात्रीतून काही मंडळीनीच खटाटोप करुन 'रयत' काढण्याचा प्रयत्न केला. ते मवाळ विचारी असल्याने शोएबउल्लाखान सारख्या जहाल तरुणांचा कोंडमारा होऊ लागला. म्हणून दररोज दि. १५ नोव्हें. १९४७ ला काढले. २१ आगॅस्ट १९४८ तो रजाकाराच्या कृत्याला बळी पडला. पत्र कारितेतील आणि मुक्ती सग्रामातालेी तो शहीद शिरोमणी झाला. पत्रकरितेच्या यज्ञ कुडांवर बलिदान हेवून लागे.

शोएबउल्लाखानाने पत्रकरितेचे महत्त्व वाढवले म्हणून रजाकार, एम. नरसिंहराव म्हणतात शोएबने आपल्या हौतात्म्याने हैद्राबाद पोलिस कारवाईची तारिख फार जवळ आणली. श्री वाघमारेची पत्रकरिता तर एवढी जहाल होती की, निजाम संस्थानाने दहा वेळी मराठवाडा बंद केला. वाघमारेनी नागपूरहून निघणाऱ्या महाराष्ट्र पत्रात लिखान केले ते मध्यप्रांताच्या सरकाराने अवैध ठरवून ५०० चा जमीन महाराष्ट्र वृत्तपत्राकरडून घेतला. पत्रकारिता ध्येयाने प्रेरित होती. पत्रकरितेचे ध्येय, मुक्तिलढा उभारणे हे होते. पत्रकारिता राजकीय असली तरी समाजाभिमुख होती. आजच्या पत्रकारिकेत जो उताविळपणा, बदला घेण्याची वृत्ती, स्वार्थ, ब्लॅकमेलीग, जहिरातबाजी करण्याचे स्वरुप दिसते त्यांचा पूर्णत: संस्थानातील मराठी पत्रकरितेत होता. मराठी वृत्तपत्र कधीच केवळ बातमी देणारी वृत्तपत्रे, भाटपत्रे बनली नाहीत. तर उलट जनइच्छा साभांळून निजामी धोरणाची वाभाडे काढणारी होती. त्यांमुळे मराठी वृत्तपत्राना जाहिराती सांभाळून निजामी धोरणाची सहाय्य दिल्याचे मात्र दिसते. उहा. श्री वामनराव नाईक, श्री. केशेवराव कोरटकर इ. पत्रकरितेचा श्रेष्ठ होता, लोकप्रियता प्राप्त आणि जनपाठिंबा असणारी पत्रकारिता मराठी वृत्तपत्रांनी केली निजामाविजयचा प्रथम अंक त्यावेळी बाहेर पडला. त्यावेळी त्यांचे प्रथम वर्गणीदार विवेकवर्धिनीच्या एक शिक्षिका व जे. जे. रूबेल नावाचा हैद्राबाद संस्थानाचा एक गुप्त पोलीस होता. त्यावरुन पत्रकरितेचा दर्जा कळतो. राजकीय आंदोलनात गांधी नेतृत्व तर त्यावेळी संस्थानामध्ये स्वामी रामानंद तीर्थाचे नेतृत्त्व उद्याला आले होते. मराठी पत्रकरिता स्वामीजीच्या तत्वानुसार १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत कार्यरत होती.

सारांश मराठी पत्रकरिता राजकीय होती. पत्रकारितेने संस्थानातील आंदोलनात हिंदू – मूस्लीम ऐक्यावर सतत भर देवून राजकीय साध्य प्राप्त केले. मराठी वृत्तपत्रे केवळ मतपत्रेच नव्हती तर ती चळवळीची मुखपत्रे ही होती. प्रत्येक घटना ४–४ ओळीत देण्याचा प्रयत्न वृत्तपत्रानी केलेला दिसतो. वृत्तपत्राची लिखाणशैली सामान्याना ही अवगत होईल अशी साधी, सोपी, होती. उदा. भा. कृ. वाघमारे आपले विचार धारदार शब्दात वृत्तपत्रातून मांडल्यामुळे त्यांना आपल्या घरावर तुळशीपत्र ठेवावे लागले. पण तूळशीपत्र घरावर ठेवून कार्य करणाऱ्या श्री. लक्ष्मणराव फाटक, श्री. दिगांबरराव बिंदू, आ. कृ. वाघमारे इत्यादीनी मात्र वृत्तपत्राच्या माध्यमातून घरा – घरात प्रत्येक व्यक्तीच्या मनामनात, मुक्तीलढ्याचे वचार रुजवले संपूर्ण संस्थांनात एक चैतन्याचे, स्फुरण चढवले ते मराठी पत्रकरितेनेच असे आपणास सारांशपणे म्हणावे लागते.

■ ■ ■

# हैद्राबाद मुक्ती लढ्यात उस्मानाबाद जिल्ह्याचे योगदान

**श्वेता नंदकुमार शिंदे**
**वैष्णवी रामप्रसाद रासवे**
बी. ए. तृतीय वर्ष

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे एक सोनेरी पान म्हणूनच हैद्राबाद मुक्तीसंग्रामाकडे पाहिले जाते. खरतर हैद्राबादचा मुक्तीलढा हा राष्ट्रीय इतिहासाचा एक भाग आहे. स्वातंत्र्याचे मुल्यरक्षण करण्यासाठी व शोषणास पुर्णाविराम देण्यासाठी हा प्रेरक ठरणारा आहे.

मराठवाडा हैद्राबाद मुक्तीलढ्यात त्याग, समर्पण व संघर्ष पर्वात सदैव पुढे होता. मराठवाड्याच्या खांद्यावरच क्रांतीची पताका होती. प्रा. नरहर अग्रेसर होता. मराठवाड्याने लोकजागृतीत आणि पुढे सशस्त्र आंदोलनातही या लढ्याची रोमांचक व तेवढीच तेजस्वी शस्त्र अभ्यासताना त्या सत्याची पुन्हा प्रचिती येते. हैद्राबाद मुक्तीलढ्यात संपूर्ण मराठवाडा अग्रभागी होता आणि त्यात उस्मानाबाद जिल्ह्याने महत्वपुर्ण योगदान दिल्याचे दिसून येते. हैद्राबाद मुक्तीसंग्रामचे सेनानी आणि हैद्राबाद स्टेट काँग्रेसचे पहिले अध्यक्ष पू. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होण्याची प्रक्रिया तुळजापूर तालुक्यातील हिप्परगा (नरसोबाचे) इथे घडली. हैद्राबाद मुक्तीलढ्यातील पहिल्या व दुसऱ्या नेतृत्वाची फळी मराठी भाषिक पट्टा असलेल्या मराठवाडा विभागातून उदयास आली आहे.

हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात उस्माबाद जिल्हा सर्वाधिक सक्रिय होता. समाजाच्या सर्व थरातील मंडळी यावेळी काही ना काही करण्यासाठी धडपडत होती. उस्मानाबाद जिल्ह्यात व्यंकटेश बापुजी जोशी (कॅप्टन जोशी), विश्वंभर भू हदाळकर, उमरग्याचे नानासाहेब चिंचोलीकर, तात्याराव मोरे, नारायणराव लोहारेकर, लातूरचे डॉ. निळकंठराव कुलकर्णी, अहमदपुरचे माणिकराव पागे, निवृत्ती रेड्डी हे प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांच्याखेरीज पुर्णवेळ कार्यकर्त्यांची बरीच मोठी संख्या होती. राघेंद्रराव दिवाण, बाबुराव कानडे, श्रीनिवास अहंकारी, शेषराव वाघमारे, देवीसींह चौहान, कालिदासराव देशपांडे, यांच्यासारखे पूर्णवेळ संघटन संपूर्ण जिल्ह्यात चळवळ आघाडीवर ठेवण्याची पराकाष्ठा करीत होते. १९४६ मध्ये लातुरच्या महाराष्ट्रात परिषदेच्या वेळी फुलचंद गांधी महाराष्ट्र परिषदेत व काँग्रेसच्या राजकारणात आले.

औसा –लोहारा परिसरात हिप्परगा नावाच्या एका छोट्याशा खेड्यात एका विलक्षण प्रयोगाची सुरुवात झाली. निझाम सरकारच्या उर्दु माध्यमाच्या शिक्षणाला कंटाळून काही राष्ट्रीय वृत्तीच्या तरुणांनी या खेड्यात राष्ट्रीय शाळा सुरु करण्याचे धाडस केले होते. १९२१ च्या विजयादशमीला या शाळेची स्थापना झाली. लोहाऱ्याचे अनंतराव कुलकर्णी व त्यांचे बंधु व्यंकटराव कुलकर्णी या शाळेचे संस्थापक होते. स्वामी रामानंद तीर्थ व पू. बाबासाहेब परांजपे हे अध्यापक म्हणून तेथे आले. या दोघांनी नंतर संपुर्ण हैद्राबाद राज्यात मुक्ती संग्रामासाठी म्हणून हजारो तरुणांना उभे करुन दाखविले. हैद्राबाद मुक्तीसंग्रामाची ठिणगी उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा या गावी पडली.

उस्मानाबाद जिल्ह्याचा १९८२ पर्यंत अविभाज्य घटक असलेल्या औसा तालुक्याने हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या विविध आघाड्यावर आपला विशेष ठसा निर्माण केल्याचे दिसून येते. हैद्राबाद मुक्तिसंग्राम मराठवाड्यातील ज्या स्वातंत्र्यवीरांनी अजरामर केला अशा आग्रगण्य स्वातंत्र्यसैनिकांमध्ये श्री देवीसींह चौहान यांचे स्थान बहुमोलाचे मानले जाते. श्री देवीसींह चौहान यांचा जन्म मराठवाड्यातील सध्याच्या लातूर जिल्ह्यातील

औसा तालुक्यातील मौजे नागरसोगा या गावात २ मार्च १९०९ मध्ये झाला. देवीसिंहानी आपले लहानपण नागरसोग्याच्या माळरानावर गुरे राखीत अत्यंत साह्यपुर्ण वृत्तीने घालविले. त्यांची आई अंबिकाबाई हिला उपल्लीबासी म्हणून संबोधले जात असे. १९३१ मध्ये हिप्परग्याच्या शाळेतून ते मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण केली. तेंव्हा ते मुंबई विद्यापीठातून गुणानुक्रमे सर्व तृतीय होते. पुढे त्यांनी मुंबई विद्यापीठातून बी.ए. ऑनर्स ही परिक्षा उत्तीर्ण केली. स्वामी रामानंद तीर्थ व पू. बाबासाहेब परांजपे यांच्या सल्ल्यामुळे श्री देवीसिंहानी वकीलीच्या व्यवसायावर पद स्वीकारले. हिप्परग्याचा शाळेत शिकत असताना पू. स्वामी रामानंद तीर्थच्या सान्निध्यामुळे देवीसिंहामध्ये देशभक्ती, त्याग, अभ्यासवृत्ती, परिश्रमशीलता, निर्भयता इ. गुणांचा विकास घडून आला. स्टेट काँग्रेसच्या लढ्यात श्री देवीसींहंजी स्वामीजींच्या प्रेरणेमुळेच आले. पुढे १९४७ मध्ये हैद्राबाद स्टेट कांग्रेसने व्यापक आंदोलन पुकारले. तेव्हा गुरुजींनी स्टेट काँग्रेस सत्याग्रहात सक्रीय सहभाग घेतला. स्वातंत्र्यातील सक्रीय सहभागामुळेच गुरुजींना २७ ऑगस्ट १९४७ पासुन तुरुंगवास भोगावा लागला.

४ डिसेंबर १९४७ रोजी सायंकाळी सहा वाजता उस्मानाबादच्या जेलमधील सत्याग्रही कैद्यांची जेवणे आटोपली होती. जेलरने सर्वांना रांगेत उभे राहण्याचे आदेश दिले. यासर्व धावपळीत देवीसिंह चौहान व श्रीनिवास अहंकारी जेलमधुन पळून गेले होते. जेलच्या प्रवेशद्वारावरील बंदुकीवर लाकडी दंडुक्याने प्रहार केला. निझामी पोलिसांनी त्यांचा पाठलाग केला. त्या धावपळीत देवीसींहानी रक्षकाच्या बंदुकीवरलाकडी दंडुक्याने प्रहार केला. हातापायात बेड्या ठोकूण्यात आल्या. हातातील बेड्या केवळ भोजनासाठी मोकळ्या केल्या जात असत. जंगल्या नावाच्या जेलमधील अट्टल चोरावर श्री देवीसींहाना सांभाळण्याची जबाबदारी टाकण्यात आलेली होती. दोन – तीन दिवसांनंतर 'खतरनाक कैदी' म्हणून गुलबर्ग्याच्या जेलमध्ये रवाना करण्यात आले या प्रसंगी वरुन देवीसींहाच्या साहसी वृत्तीची आणि आलेल्या प्रसंगाना सामोरे जाण्याची विलक्षण वृत्ती पहावयास मिळते.

**गुलबर्गा जेलमधून पलायन**

श्री देवीसींह गुरुजी व त्यांच्या साथीदारामध्ये जेलमध्ये अडकून पडल्यामुळे कमालीची अस्वस्थता होती. त्यातूनच त्यांनी गुलबर्गा जेलबाहेर पडण्याची धाडसी योजना आखली. श्रीनिवासराव अहंकारी, श्री देवीसींह चौहान व श्री दिगांबरराव पोतदार या तिघांनी गुलबर्गा जेल फोडुन बाहेर पडण्याचा बेत आखला. श्रीनिवासराव अहंकारी यांनी जाळणाऱ्या लाकडाने जेलच्या पहारेकऱ्याच्या डोक्यावर तडाखा दिला. पहारेकरी खाली कोसळ्ताच हे तिघेही बाहेर निसटले. परंतु या धावपळीतही श्री देवीसींह चौहान श्री दिगंबरराव पोतदार पोलिसांच्या हाती सापडले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना अमानूष मारहाण केली. स्वामी रामानंत तीर्थाचे 'सच्चे शिष्योत्त्म' या नात्याने गुरुजींनी आपले व्यक्तीमत्व कलंकित होऊ दिले नाही. उस्मानाबाद, उमरगा, औसा, लोहारा, लातूर परिसरात हैद्राबादच्या मुक्ती लढ्याचा तेजस्वी इतिहास ज्यांच्या जगण्यातून, साहसातुन, संघर्षातुन व त्यागातून उज्वल झाला आहे. त्या श्री देवीसींह चौहान यांचे नाव आग्रक्रमाने घ्यावे लागते. श्री देवीसींह चौहान संबंधी पू. स्वामीजी म्हणतात, ''श्री देवीसींह चौहान हे हिप्परग्याच्या शाळेत विद्यार्थी एका खेड्यातील गरीब घराण्यातील हा मुलगा. पण आपल्या परिश्रमाने विद्यापीठाच्या पदव्यांनी विभुषित झाला. स्वातंत्र्य लढ्यातील एक क्रियाशील सैनिक असल्यामुळे त्यांना अतोनात कष्ट सहन करावे लागले. उमरगा येथे १५ ऑगस्ट १९४७ ला स्टेट काँग्रेसच्या आदेशाप्रमाणे राष्ट्रध्वज उभारुन भारतीय स्वातंत्र्यदिन साजरा करण्याचे धैर्य श्रीनिवास मुगळीकर वकिल, रामराव राजेश्वरकर, दिगंबरराव पोतदार वकील, देविसींह चौहान, शंकरराव कार्लेकर श्रीनिवासराव अहंकारी यांनी दाखवले.

■ ■ ■

# हैद्राबाद संस्थानातील पहिले बलिदान

**सवळे रोहीत**
बी. ए. तृतीय वर्ष

इ.स. १९३४ ते १९३८ या काळात हैद्राबाद संस्थानात आर्य समाज संघटनेचे कार्य जोमात शुद्द होते. उदगीर, बसवकल्यान, लातूर, निलंगा या ठिकाणचा कार्यकर्ते गावोगावी जाऊन आर्य समाज संघटनेची स्थापना करी. विनायकरावजी विद्यालंकार, नरेद्रंजी, भाई बन्सीलाल भाई शामलाल असे अनेक कार्यकर्ते आपल्या भाषणातून हिंदु समाजाता जागृती निर्माण करून निझामी सत्तेविरुद्ध लढा देण्यास प्रवृत्त करीत असे. संस्थानातील या नेत्यांव्यतीरीक्त उत्तर हिंदुस्थानातून दीड दोन हजार आर्य समाजाची तरुण कार्यकर्ते हैद्राबाद स्टेटच्या कानाकोपऱ्यात पठाणी पोषाख्यात वावरत होते.

गुंजोटी, पायगा सरकारचे जिल्हाचे ठिकाण त्या काळात मूस्लिम जमातीची 'इत्तहादुल मुस्लिम' अशी एक कट्टर जातीयवादी संघटना होती. 'इत्तहादुल मुस्लिम संघटनेतील गुंडाकडून हिंदू रयतेचे जीवन संकटात होते. या संघटनेला उत्तर म्हणून आर्य समाज संघटनेची एक फळी गुंजोटी गावात उभी राहीली. ही फळी उभरण्यापूर्वी स्वातंत्र्यवीर वि.रा.पाटील यांनी इ.सन. १९२७-२८ ला गुंजोटीला येऊन हिंदु संघटना स्थापन केली. वि.रा. पाटलांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेत होते. त्यांनी जुलुमाविरुद्ध प्रतिकार करण्यासाठी हिंदु संघटनेची स्थापना केली. म्हणून इ.स. १९३६-३७ ला आर्य समाजाची संघटना उभी करण्याची कार्य सुलभ झाले. दुरदृष्टीच्या वि.रा. पाटलाचे हे कार्य वाखाण्याजोगे आहे. इत्तहादुल मुस्लिम संघटनेस प्रतिकार करणे ही काळाजी गरज आहे. हे आव्हान आपण स्वीकारले पाहिजे आणि गुंडाच्या जुलुमाविरुद्ध निर्भयपणे कार्य करणारी एक समर्थ हिंदु संघटना स्थापन केली पाहिजे या वि.रा. पाटलाच्या विचाराने प्रेरीत घेऊन श्रीनिवासराव शाईवाले वकी, वासुदेवराव देशमुख, बाबुरावजी देशपांडे वकील आणि हरिपंत राखेलकर वकील इत्यादी समान विचारांची मांडणी एकत्र झाली. त्यानी इ.सन १९२७ मध्ये श्रीकृष्ण पाठशाळा, श्रीकृष्ण वाचनालय आणि व्यायाम शाळा स्थापन केली. वाचनालयात केसरी, पुरुषार्थ, आदेश, ही वर्तमानपत्रे येऊ लागली. पुढे गणपतरावजी मार्डीकर व प्रल्हादजी उदगीरकर यांनी मुळज उजळंब या गावी आर्य समाज संघटना स्थापन करून गुंजोटीस आले व आर्य समाजाची सहाय्याने 'महानुभाव' मठामध्य बैठक घेण्यात आली व आर्य वासुदेवरावजी देशमुख बाबुरावजी देशपांडे, नागोराव कुलकर्णी, टोपनय्या बबले, शिवबसप्पा हर्के, बसप्पा अगशे, गंगाराम आयनळे, विरंतप्पा माळगे, धोडींबा गवंडी सटवा गवंडी, गोविंद कारभारी, नरसप्पा, कडदोरे, रामरावजी हिरव, शिवलालचंद शहा, गदगया स्वामी, शिवप्पा पाटील, कंट्यापा देशमुख, दिगंबरराव देशमुख बसप्पा अणगीरे इत्यादी मंडळी आर्य समाजाच्या ध्वजाखाली एकत्र आली. गावाचे गुंडापासुन संरसण केले. सत्संग, शिक्षण, व्यायाम आणि जुलुमाविरुद्ध प्रतिकारास आवश्यक असणारी निर्भय वृत्ती तरुण पीठीच्या अंगी जोपासण्याचा सातत्याने प्रयत्न केला. या तरूणातूनच वेदप्रकाश आर्य मुळचे नांव दासमिया शिवबसप्पा हर्के जन्म १९१७ या विर पुत्राने हैद्राबाद संस्थानाचे निझामी तख्त उखडून टाकण्यासाठी स्वत: हौतात्म्य पत्करुन निझामी राजवटीच्या अस्ताचे जणु नांदी पदच गाईले,

आर्य समाजाच्या कार्यक्रमात गवोगावी आपल्या गोड गळयाने भजने गाणारा 'वदिक नाद बजाओ' हे आर्य वीरण आयो,'' अशा गीतांनी हजारोंना प्रभावित करणाऱ्या वेद्रकाशन देशात प्रज्वलीत घेत असलेल्या स्वातंत्र्याच्या ध्वन स्वडीलावर आपल्या स्वत:चा हविर्भाग अर्पन करून सामवदाती एक मंत्रच उच्चावला ! निझामशाहीच्या अस्ताचे नांदीपह गुंजोटी गावातून सुट झाले! हे गुंजोटीचे भाग्यच हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रमाच्या इतिहासात गुजोटीच्या सर्व प्रथम उल्लेख करावा लागेल.

ता. २३ फेब्रुवारी १९३७ मार्गर्शीष शुद्ध चतुर्थीचा दिवस उजाडला। आई बन्सीलालजी वकील गुंजोटीला येणार म्हणुन त्याच्या स्वागताची जोदार तयारी सुरु झाली. औराद, कदेर, तुगाव, नागराळ, बेडगा, जागीर चिचोली, एकोंडी वगैर गावची आर्य समाज – मंडळी जमु लागली. जो बोले सो अभय – वैदीक धर्म की जय! जयघोषाने गुंजोटी गाव आनंदाने रोमांचित झाला. हा जयघोष ऐकून इत्तहाउल मुस्लिम, संघटनेत द्वेषाचा अग्नी भडकु लागला !

बन्सीलालजीना घेऊन येण्यासाठी वेदप्रकाश सकाळीच उमरग्याला गेला होता. पण ठरल्यावेळी भाईजी आले नाहीत. दुसऱ्या गाडीने येतील म्हणुन मार्गप्रतीक्षा करीत तो सायंकाळचे सहा वाजेपर्यंत थांबला. चार वाजेपर्यंत वाट पाहुन बाहेरगावचे आर्य समाजी लोक आपआपल्या गावी निघुन गेले. आर्य समाजाचे लोक पांगल्याचे बघुन इत्तहादून संघटनेतील गुंडानी गावात धुमाकुळ घालण्यास सुरुवात केली. एका अरबाने रस्त्याने जात असलेला शाळेतला विद्यार्थी किसन कदम (पळसगाव) यास विनाकारण जंबियाने वार केला. त्याच्या पाठीवर निसटता वार लागला म्हणून तो वाचला! रक्ताने भिजलेल्या कपड्यातला किसन बचावासाठी आर्यसमाज मंदिरात आला! दुसऱ्या एका गुंडाने व्यंकोबा बेरड नावाच्या व्यक्तीवर पान खावुन थुंकले. व्यंकोबा बेरड हा बेडर घेता. त्याने त्या गुंडास दोन चारदा उचलुन आदळले आणि चांगलाच ठोक दिला!

गावचे वातावरण चिघळु लागले म्हणून काही हिंदू पुढारी तालुकदाराच्या हत्तहादुल संघटनेच्या गुंडाचा जमाव होता. हिंदु पुढारी बाहेर आले की त्याना खतम करण्याचा विचार पक्का झाला घेता. तालुकादाराने ही गोष्ट कचेरीसमोर झाली तर ती बदनाम घेईल असे गुंडाना सांगितले. 'तुम्ही गावातील लोकांनी हिंदुची खुन खराबी केली तर त्याच्या सरकारवर ठपका येईल. असा उपदेश करून तालुकदार साहेबांनी ह्याना एक नामी युक्ती सांगितली! जमलेले हत्यारी गुंड निघून गेले. तास दीड तास निघुन गेला आणि एका व्यक्तीने तालुकदार साहेबांना ते येत असल्याचा निरोप दिला. थोडा वेळ थांबुन तालुकदार साहेबांनी त्या चौघांना तुम फिकर मत करो!

■ ■ ■

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी

**आकांक्षा मारोती मल्हारे**
बी. ए. तृतीय वर्ष

मी जी कामगिरी स्वीकारली तशा स्वरुपाची कामगिरी पार पाडण्यास धैर्याने पुढे येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने आपल्या मातापित्याचा पूर्ववृतांत आपली वंशावळ आणि तशाच स्वरुपाच्या इतरही काही गोष्टीचा उल्लेख करावा अशी एक सर्वसाधारण प्रथा पडली आहे. या बाबतीत मला मात्र तो मार्ग अवलंबित येत नाही. इतरांनी न चौखाळलेल्या अशा माझ्याच मार्गाने जाण्याचे माझ्या नशीबी आले आहे. फार फार वर्षापुवी मी हे सारे संबंध तोडून टाकले आहेत, कुटुंब, वंश, पूर्वज, मुळगाव, जात आन प्रांत इत्यादी शब्दांनी व्यक्त होणारे अर्थ, त्या शब्दांनी लिहित असलेले सगळे भाव माझ्या बाबतीत आधीच पार उडुन गेलेले आहेत. लुप्त झाले आहेत. विस्मृतीच्या गर्तेत गुप्त झालेल्या नात्यागोत्याच्या संबंधाना पुन्हा स्मृतिपटलावर आणण्याचा प्रयत्न करणे मला तसे थोडेसे अनावश्यकच वाटते. ठराविक सर्वसामान्य चाकोरीतून खस्ता खात जाऊन काही मी आज जसा दिसतो तसा बनलो नाही, तर त्यासाठी मी मोठमोठ्या हनुमान उड्या घेतल्या, ज्याने स्वयंप्रेरणेने ब्रम्हचर्याश्रमातून एकदम चतुर्थाश्रमात पदार्पण केले अशा संन्याशाने कौटुंबिक नात्यागोत्या संबंधी व इतर बाबीसबंधी काही सांगणे अनावश्यक आहे, शिवाय मोठा असो किंवा लहान कोणत्याही माणसाच्या जीवनात काय आहे. त्याने स्वत:ला व आपण ज्या परिसरात राहतो व कार्य करतो त्या परिसराला कसे घडविले आहे या गोष्टीच महत्वाच्या आहेत. तो कुठे जन्माला व कुठे राहात होता या गोष्टींना महत्व नाही. म्हणून या सर्व गोष्टींचा उल्लेख न केल्याबद्दल मी क्षमेची याचना करतो. एकच एक घटना वाचकांना जरा गमतीची वाटेल माझा जन्म सर्व सामान्य पद्धतीचा असून थोडासा असाधारण वाटत आला आहे. माझ्या वडिलांनी तीन मुले झाल्यानंतर संन्यासधर्म स्वीकारला, काही काळ १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला पण त्यावेळी संपूर्ण देश विविध संस्थानामध्ये विखुरलेला होता. त्यावेळच्या ५६५ पैकी ५६२ संस्थांनानी स्वतंत्र भारतात सामील होण्याची सहमती दर्शविले आणि तशी कार्यवाही केली. मात्र हैद्रराबाद संस्थान, जम्मू आणि काश्मीर आणि जुनागड संस्थान ही तीन संस्थाने स्वतंत्र्य भारतात सामील झाली नव्हती.

हैद्राबाद संस्थानावर निजाम मीर उस्मान अली खान यांचे राज्य होते. हैदराबाद संस्थानावर तब्बल सहा पिज्यापासून निझाम वंशाचे राज्य होते. त्याच्या निजामांच्या राज्यातून मुक्त होऊन भारतीय संघराग्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैद्राबाद संस्थानात मुक्ती सुरु झाला होता.

हैद्राबाद संस्थानची त्यावेळची लोकसंख्या १ कोटी ६० लाख होती. यात तेलंगणा, मराठवाडा आणि कर्नाटकचा काही भाग येत होता. मुक्ती संग्राम सुरु झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रझवी यांनी मजीलस-ए- इत्तेहादुल मुस्लिमीन (लघुरुप एम.आय.एम.) या संघटनेच्या माध्यमातून रझाकार नावाने मुस्लिम स्वयंसेवकाची भरती केली आणि त्यांच्या मदतीने जनतेवर अनन्वित अत्याचार सुरु केले.

याच नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ दिगंबरराव बिंदु,

गोविंद, भाई श्रॉफ रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशपायन, शंकरसिंग नाईक, विजयेंद्र काबरा बाबासाहेब परांजपे या आणि इतर अनेक नेत्याकंडे होते, मराठवाड्याच्या गावागावत हा संग्राम लढला होत गेला यात जीवाची पर्वा न करता अनेक स्वातंत्र्यवीर पुढे आले. निजामाच्या पंतप्रधानास रोखण्यासाठी पुल उडवून देणारे काशीनाथ कुलकर्णी मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणून प्रसिद्ध झालेल्या बदनापूर तालुक्यातील घोपटेश्वर गावाच्या दगडाबाई शेळके, रोहिल्यांना जेरीस आणणारे बीडचे विठ्ठलराव काटकर, बर्दापूर पोलीस ठाणे उडवून देणारे लातूरचे हरिशचंद्रजी जाधव, नळदुर्ग सर करणारे उस्मानाबाद जिल्ह्यातील होटी गावचे जनार्दन होर्टीकर गुरुजी तसेच परभणीत रझाकारांना हुसकावून लावणारे सुर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातनेश्वरकर, पालम तालुक्यातील गुळखंड गावचे जीवनराव बोधनकर आदींच्या रुपाने मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्य संग्राम तेजस्वीपणे लढला गेला.

या मुक्ती संग्रामात श्रीधर वर्तक, जानकी, लालजी राठी, शंकरराव जाधव, जालन्याचे जनार्दन मामा, किशनसिंग राजपूत, गोविंदराव पानसरे, बहिर्जी बापटीकर, राजाभाऊ वाकड, विश्वनाथ भिसे जयंतराव पाटील आदीसारख्यांनी आपल्या जीवाची तमा न बाळगता काम केले, या सर्व हुतात्म्यांनी आणि मुक्ती संग्रमातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या संग्रमाचं मोल काढणं शक्य नाही. यासीन जूबेरी हैद्राबादी मंत्री यानी मुक्तीसेनेने ताब्यात घेतलेली परत घेण्याची प्रतिज्ञा केली. त्यामुळे औरंगाबाद जिल्हातील वैजापुर तालुक्यातील जातेगाव माळावर निजामाच्या सैन्याला पुढे सरकु दिले नाहीत यामध्ये मानसिंग राजपुत, लक्ष्मण आवचार रामलाल राजपूत व रामचंद्र धंदेवार हे आघाडीवर होते. यामध्ये रामचंद्र बाळगीर मठ सरला येथे बंदुकीच्या गोळीने वेध घेतल्याने शहीद झाले. त्यावेळी गोदामाय दुथडी भरुन वाहत होती. रामचंद्र यांना सिरसागर नावाच्या मर्दाने शहीदास आपल्या पाठीवरून पैलतीरी आणुन भर पावसात खड्डा केला व त्यांचा विधी पूर्ण केला.

निझाम सरकारचे हे अत्याचार एवढे अनन्वित होते की, हैदराबाद मुक्तीसंग्रातील काँग्रेस कार्यकर्यांच्या शस्त्रे हाती घेऊ देण्याच्या विनंतीस स्वत: महात्मा गांधीनी सुद्धा संमती दिली. शेवटी भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल अंतर्गत मेजर जनरल जे.एन. यांनी निझाम सरकारच्या विरोधात पोलीस ऍक्शनची घोषणा केली ११ सप्टेंबर १९४८ रोजी ऑपरेशन पोलो आतर्गंत मेजर जनरल जे.एन चौधरीच्या नेतृत्वाखाली पाच दिशेने निझाम संस्थानावर कारवाई सुरु झाली मुख्य फौजी सोलापूरकडून घुसल्या पहाटे ४ वाजता ऑपरेशन सुरु झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळपर्यंत तुळजापूर परभणी ते मणिगढ कनेरगाव विजयवाड्याकडील बोनाकल ताब्यात घेतले.

चाळीसगावकडून आलेल्या तुकडीने कन्नड, दौलताबाद तर बुलढाण्याकडेच्या तुकडीने, जालना शहर ताब्यात घेतले दुसरीकडे वरंगल, बीदर, विमानतळावर भारतीय फौजांनी हल्ले केले. १५ सप्टेंबर रोजी औरंगाबाद सर करून फौजा पुढे निघाल्या भारतीय फौजे पुढे रझाकार फार वेळ टिकू शकले नाहीत. निजामी सैन्य माघार घ्यायला लागले आणि कासीम रजवीला अटक झाली. शेवटी १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादचे सैनाप्रमुख जन अल इद्रीस यांनी शरणांगती स्वीकारली आणि निझाम सरकारने हार मानली आणि हैदराबाद संस्थानात तिरंगा फडकला.

■ ■ ■

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी

**नवघरे योगेश बबन**
बी. ए. तृतीय वर्ष

सत्याग्रहाच्या माझ्या तुकडी संस्थानातील तिन्ही विभागातून आलेले चार तरुण मित्र होते. त्यापैकी एकाने तर घरातून पळुन येऊनच सत्याग्रहाच्या यादीत नाव नोंदवले होते. त्याच्या घरच्या मंडळीची कल्पना मात्र अशी झाली होती की, तो वकिलीची सनद मिळवण्याकरिता खटपट करीत होता. लोकांचा उत्साह वाढत होता. सत्यागृहाची नियोजित वेळ त्यांना अगोदर कळली होती. सत्याग्रहाच्या ठिकाणी हजारोच्या संख्येन लोक जमा झाले. आम्ही आमचे निवेदन वाचाले. माझे निवेदन मी अधेमुर्धे वाचले तोच मला अटक करण्यात आली. थोडीशी गडबड झाली व लगेच आम्हाला तुरुंगात नेण्यात आले. रात्रीच्या काळोख्यात आम्हाला डांबण्यात आले. तेथे पुर्णपणे पाय पसरुन झोपणेही कठीणच होते.



तसेच त्या कोठडीत पाणी नव्हते. व प्रकाशही नव्हता. अटक झाल्यानंतर दोन चार दिवसानंतर आमचा खटला चालू झाला. कोणत्या नियमाखाली आमच्यावर खटला भरण्यात आला होता हे मला आठवत नाही. हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी हूकूम मोडण्याचा गुन्हा मान्य करण्याचे आम्ही ठरविले होते. इतर आरोप आम्ही करावयाचा नाही, हा मुद्दा आम्ही स्पष्ट केला. तथापी आम्हाला आमचा निकाल न्यायालयाला योग्य वाटेल त्या पद्धतीने आमच्या खटल्याचा निकाल लावण्याची मुभा होती.

ज्या निरनिराळ्या कलमान्वे माझ्यावर खटला भरण्यात आला होता. त्यापैकी एक कलम चॅप्टरकेस च्या सदरात पडणारे होते, हे ऐकून मला मोठी गंमत वाटली. कारण त्या कलमान्वये मी उपजीविकेचे निश्चित साधन नसलेला असा एक उडाणटप्पू भटक्या आहे. असे सिद्ध होणार होते संन्याशाच्या जीवनपद्धतीचे किती यथार्थ चिंतन होते ते! खटल्याच्या शेवटी आम्ही एक छोटेसे निवेदन सादर केले. त्यात आमची भूमिका स्पष्ट करून बंदीहूकूम भंग केल्याचा गुन्हा आम्ही मान्य केला. होता. मॅजिस्टेटने मला दीड वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली माझ्या सहकाऱ्यानासुद्धा निरनिराळ्या मुदतींच्या शिक्षा सुनावण्यात आल्या.

खटला संपल्यानंतर आता आम्ही रितसर कैदी बनलो. आम्हाला आमचा पोशाख बदलावा लागला. इतर गुन्हेगारांप्रमाणे आम्ही जेलचा पोशाख घातला.

आम्ही तुरुगांत येताच पायात लोखंडू बेडी तर पडलीच होती. एक घोंगडी एल थाळी, एक लोटा, एक चटई, एक ट्रवाल, दोन चड्या व एक हाफ शर्ट एवढी आमची मालमत्ता होती. आम्हाला सक्तमजुरीची शिक्षा झाली असल्यामुळे बॉबिनवर सुत गुडाळण्याचे काम आम्हाला देण्यात आले. आश्चर्याची गोष्ट अशी की सामान्यपणे एका कैद्याला जितके काम दिले जात होते. त्याच्या तिप्पट काम आम्हाला देण्यात आले.

जेल अधिकाऱ्यांच्या स्वभावाची त्याच्या कार्यपद्धतीची कल्पना नसल्यामुळे आम्ही दररोजचे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत होतो. पण आठ–आठ तास चरखा फिरवुन सुद्धा दिलेल्या कामाच्या एकतृतीयांश कामही आम्ही करू शकत नव्हतो आम्ही पुर्णपणे थकून जात असु दिवसभर इतक्या प्रामाणिकपणे काम करूनही आमचे काम का संपु नये याचे आम्हाला आश्चर्य वाटे. दुसऱ्या दिवशी कामावर देखरेख करणाऱ्या वार्डरने–दीर्घ मुदतीच्या कैद्याने आम्हाला काम दिले, त्यावेळी त्याने हलकेच माझ्या सहकाऱ्याच्या कानात सांगितले की, आम्हाला त्रास देण्यासाठी मुद्दाम तिप्पट काम देण्यात येत आहे. त्यापैकी फक्त पाव कामच पुर्ण करावे, तथापी आम्ही आदल्या दिवशीप्रमाणे प्रामाणिक पणे काम करून पाहुन हिस्सा काम पूर्ण केले.

काही दिवसापर्यंत दैनंदिन कार्यक्रम नेहमीप्रमाणे पार पाडले, मग एके दिवशी अर्धामुर्धा युरोपियन असलेला इन्स्पटेकटर जनरल ऑफ पोलीस माझ्या भेटीला आला. त्याच्याशी माझी थोडीशी शाब्दिक चकमक उडाली. त्याचा परिणाम असा झाला की, मला माझ्या सहकाऱ्यापासुन वेगळे काढुन एका 'गंजी' मध्ये अंशार कोठडीत नेऊन ठेवण्यात आले. तेथे मी १११ दिवस होतो.

माझ्या साथींना इतर तुरुंगात पाठविण्यात आले. माझी कोठडी म्हणजे १ फुट लांब व ४ फुट रुंद अशा आकाराची एक छोटीशी अंधार कोठडी होती.

त्या कोठडीत वर दोन छोटे झरोके होते. माझ्या खोलीला लोखंडी गंजाचा दरवाजा होता. त्या दरवाजा समोर एक भिंत उभी होती. त्यामुळे मी बाहेरचे काहीच पाहु शकत नव्हतो. माझ्याजवळ वाचायला पुस्तके नव्हती. किंवा वर्तमान पत्रेही नव्हती. फक्त गीतेची एक प्रत आणि ब्रम्हानंदाच्या धार्मिक गीतांच्या संग्रहाची प्रत माझ्याजवळ ठेवण्यास मला परवानगी दिली.

रात्री दिव्याची सोय माझ्या कोठडीत नव्हती. त्या कोठडीत मला सक्तमजुरी करावी लागे. कोठडीच्या एका कोपऱ्यात मुलमुत्र विसजर्नासाठी एक कुंडी मिनीटाकरीता मला स्नानासाठी बाहेर घेऊन जात असत. त्यावेळी मी कुणाकडे पाहू नये. असा निर्बंध होता. दुसऱ्या कुणी कैदी माझ्याजवळ येऊ शकत नव्हता. सारांश संपूर्ण एकांतवास होता. तो सत्याग्रह्यांनी तुरुंग गजबजुन गेला होता. त्यांची संख्या शेकड्यांनी वाठत चालली. पहाटेच्यावेळी व देशभक्तीप गीतांनी आम्ही झोपेतून जागे होत असू तुरुंगाचे आवार त्या गाण्याच्या ध्वनिप्रतिध्वनीने निनादुन जाई त्यामुळे तुरुंगाचे नेहमीचे उदास वातावरण पार विसरुन जाई येथे मला एक विचित्र अनुभव यायचा होता. हिंदू सत्याग्रहींना अटक केल्यानंतर पोलीस त्यांना विलक्षण छळीत असत सत्याग्रहीना त्रस्त करण्याचे चमत्कारिक प्रकार पोलीस अवलंबित असत ते हिंदुचे जानवे काढून टाकीत साहजिकच असत. त्यामुळे तुरुंगाधिकाऱ्याच्या पुढे एक समस्याच निर्माण होय.

पुन्हा नवे जानवे घालावयाचा धार्मिक विधी करावा लागतो. व त्यासाठी मंत्र सांगणारा उपाध्याय लागतो. असे सत्याग्रही अधिकाऱ्यांना सांगत यावेळी तेथिल उपतुरुंगाधिकारी माझ्याकडे आला. तो मला गुरुमहाराज या नावाने संबोधीत असे. मी नवे जानवे घालुन घेण्यास

तयार होतील. असे त्या अधिकाऱ्याने मला सांगितले. उपाध्याय म्हणून मी कधी काम केले नसल्यामुळे मी त्यांना सांगितले. तथापि मला येत असलेल्या मंत्राचा उच्चार करून त्यांना जानवे देण्यास माझी काहीच हरकत नाही, असे मी सुचविले. हे त्यांना पटले. सत्याग्रहींना माझ्याकडे आणावयाचे त्यांनी स्नान करावयाचे मी गायत्री मंत्र म्हणावयाचा, सत्याग्रहींना त्याचा उच्चार करावयाचा व मग मी जानवे द्यायचे असे ठरले माझ्याशी त्यांना काही बोलता येऊ नये, या दृष्टीने त्यांना दुर अंतरावर बसविण्यात आले. तरी काही सत्याग्रही मोठे धुर्त होते. गायत्री मंत्र म्हणता म्हणता मध्येच काही शब्द ते घालीत व बाहेरच्या घडामोडीची मला कल्पना देत. तुरुगाधिकाऱ्याला संस्कृत येत नसल्यामुळे त्यानी मध्येच घातलेले शब्द गायत्री मंत्राचाच एक भाग आहे. असे तो समजे. अशा रितीने तुरुगात मला एक नव्या पद्धतीचे व्रत्तपत्र मिळू लागले होते.

विद्यार्थ्यांमध्ये 'वन्दे मातरम्' चळवळ खूप जोमाने फोफावत होती, शैक्षणिक संस्थानातून राष्ट्रगीत गाण्यावर बंदी होती. या बंदी हुकूमाविरुद्ध विद्यार्थी मोठ्या नेटाने धैर्याने लढत होते. सत्याग्रही कैद्यानिसुद्धा 'वन्देमातरम्' गीत गाण्याचा हक्क प्रस्थापित केला तेही हे गीत तुरुंगात म्हणू लागले. व त्यासाठी लढा देत असलेल्या विद्यार्थ्यांना सहानुभूती दाखवू लागले. एके दिवशी अगदी पहाटे जैलबराकी पैकी कुठल्यातरी एका कोपऱ्यातून 'वन्देमातरम्' गीत साहिकपणे गायलेले ऐकू आले. इतरानी राष्ट्रगीत म्हणण्याची ही प्रथा सुरु करावी. याची ती जणू सुचना होती झाली. लगेच प्रत्येक सत्याग्रही राष्ट्रगीत म्हणू लागला या घटनेचे वृत्त तुरुंगाच्या मुख्याधिकऱ्यांना कळविण्यात आले. पुढे तीन दिवसा पर्यंत राष्ट्रगीत गाण्याचं कार्यक्रम असाच चालला. त्याविरुद्ध मुख्याधीकाऱ्याची इच्छा नव्हती. वरिष्ठाची त्यांनी विचारविनीमय केला असे कळले एकदा एके दिवशी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलीस तुरुंगात आला आणि तुरुंगात 'वन्देमातरम्' गीत गायिले जाता कामा नये अशा तऱ्हेचा हूकूम देण्यात आला. आय.जी.पी. माझ्या कोठडीतही आला व राष्ट्रगीत गाण्यास परवानगी दिली जाऊ शकत नाही. असे त्याने मला धमकी दिली. तथापि तुम्ही एकटेच आहात त्यामुळे तुम्हांला गाण्याची परवानगी मी देईन : पण सामूहिक रीतीने मात्र ते गीत गाण्यास परवानगी मिळणार नाही असे त्याने सांगितले. त्या शुर सत्याग्रहीला 'वन्देमातरम्' रामचंद्र राव या नावाने संबोधिले जाऊ लागले. त्यानंतर तो निरनिराळ्याच राजकीय रंगणात भटकत गेला असला तरी त्याच्या बाणेदार वृत्तीचे मला नेहमीच कौतुक वाटत राहिले.

■ ■ ■



# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा अमृत महोत्सव

**नंदीनी नागनाथ मोरे**
बी. ए. तृतीय वर्ष

भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभाई पटेल यांच्या कणखर भूमिकेमुळे हैद्राबाद भारतात विलिन झाले. देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागाच्या माध्यमातून मराठवाड्याची राजधानी अशी ओळख असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील दौलताबाद येथील देवगिरी किल्ल्यातरील भारतमाता मंदिरात प्रांगणात मराठवाडा मुक्ती संग्रामतील हुतात्मा स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन करण्यासाठी १७ सप्टेंबर रोजी सामूहिक 'वंदे मारतरम्' गायन कार्यक्रमाचे आयोजन

दि १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीतून भारत स्वतंत्र झाला नुकताचा आपण देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवही साजरा केला. परंतु १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळानंतर देखील देशाचा काही भाग पारतंत्र्यात होता. परकीयांचे अत्याचार सहन करत होता. हा भाग मुस्लीम शासक निजाम डच पोतुगीजांच्या अधिपत्याखाली होता. त्यावेळी एकीकडे संपूर्ण देश स्वातंत्र्याचा गुलामगिरीतून मुक्ती आनंद साजरा करत होता. तर दुसरीकडे फाळणीच्या जखमादेखील त्रासदायक ठरत होत्या. अशा परिस्थितीत दक्षिण भारताच्या मधोमध हैदराबादचा निजाम नावाचा एक क्रुर शासक भारताच्या विभाजनाची आग्रही भूमिका घेऊन पाकिस्तानप्रमाणे स्वतंत्र राष्ट्राची मागणी करत होता. पाकिस्तान जवळीक साधत होता. कासीम रिझवी

हिंदू जनतेवर अनन्वित अत्याचार करत होता. परंतु हैद्राबादसह मराठवाड्यातील जनतेच्या एकजूटीने आणि लोकशाही स्वीकारलेल्या भारतात सामिल होण्याच्या जिद्दीने निजामाला गुडघे टेकण्यास भाग पाडले आणि मराठवाडा भारताचा अविभाज्य भाग झाला.

देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या काळात ५६५ संस्थानां पैकी हैद्राबाद जम्मू व काश्मीर आणि जूनागढ ही तीन संस्थाने मात्र स्वांतत्र्याची वाट पाहत गुलामगिरीचा कडवटपणा अनुभव होती स्वतंत्र भारत देशाचा भाग होण्याचे स्वप्न पाहत होती. क्रुर निजामाच्या राजवटीतील त्यातील हैदराबाद हे एक मोठे संस्थानक होते. मराठवाडा प्रदेश हैदराबाद हे एक मोठे संस्थापक होते. मराठवाडा प्रदेश हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक असलेला महत्वाचा भाग होता. हैद्राबाद संस्थानात तेलंगणा, मराठवाडा व कर्नाटक राज्याचा काही भाग घेता. एकाच भारतमातेची ही लेकरं होती. परंतु काहींना एक न्याय अन् काहींना वेगळा न्याय मिळत होता. देशाच्या स्वातंत्र्याच्या एका वर्षानंतरच्या काळात मराठवाडा आतून धगधगत होता अत्याचार सहन करत स्वातंत्र्यासाठी लढत होता आणि याच स्वाधीनता संग्रामाला स्वामी रामानंद तीर्थ यांच्यासारख्या व्यक्तिमत्वाचे नेतृत्व लाभले आणि मराठवाडा मुक्तीचा लढा सुरु झाला.

निजाम अत्यंत धर्मांध, धुर्त, हिंदीद्वेष्टा व महत्वकांक्षी होता. त्याने हैदराबाद संस्थान भारतात विलीन होण्यापासून वाचवण्यासाठी कट्टरपंथी कासीम रिझवीच्या नेतृत्वाखाली 'रझाकार नावाने एक क्रुर निमलष्करी दल स्थापन केले होते. या दलाने तेथील बहुसंख्याक हिंदुवर अत्याचार करतांना कौर्याची परिसीमा गाठली होती. त्या अत्याचाराची तुलना क्रुरकर्मा हिटलरच्या नाझी सैन्याशी केली जाते हिंदू मंदिरे तोडली जात होती. अशा परिस्थितीत हिंदुंना धर्मातरण करण्यासाठी देखील प्रवृत्त केले जाते मुस्लिम व्हा अथवा मरा अशी क्रुर वागणूक हिंदू जनतेला दिली गेली. निजामाचे प्रतिनिधी जबरदस्तीने कर वसुल करणे लुटालूट करणे, हिंदू स्त्रियांची अब्रु लुटण हिंदूची घरे जाळणे जमिनी बळकावणे सरकारी कर्मचार्यांवर हल्ले करणे इत्यादी अमानुष लैंगिक कृती करत असत या भागात उर्दू भाषेची सक्ती करण्यात आली होती तसेच हिंदूना गुलाम बनवण्याचा मुस्लिमांच्या अधिकारावर कासीम रिझवीने अधिक भर दिला होता.

देशाचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी हैदराबाद मुक्तीची सुत्रे आपल्या हाती घेतली त्यांच्या दृष्टीने काश्मीरप्रमाणे हैद्राबाददेखील महत्वाचे संस्थान होते. त्यामुळेच हैद्राबा स्वातंत्र होणे हे त्याच्यासाठी एकसंघ भारताचे स्वप्न सत्यात उतरण्यासारख होते हैद्राबादमध्ये लष्करी कारवाईने हस्तक्षेप करावा लागणार याची सरदार पटेलांना सुरुवातीपासूनच कल्पना होती निजाम शरण येत नाही. त्या उलट सामान्य जनतेवरील अन्याय वाढले आहेत.

■ ■ ■

# हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि स्वामी रामानंद तीर्थ

**तुपसमुंद्रे प्रदिप**
**शेख अलिम**
बी. ए. तृतीय वर्ष



भारत भूमीला गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी असंख्य शिलेदारांनी लढा उभारला. त्यात हैद्राबाद मुक्तीसंग्रामचे नेतृत्व करणारे हैद्राबाद स्वातंत्र्य लढात थोर नेते आणि ऋषीजन व्यक्तीमत्व असलेले स्वामी रामानंद तीर्थ यांचे मुनाव व्यंकटेश भगवान खेडगीकर, कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील सिंदगी येथील कुटूंबात त्यांचा जन्म झाला. वडील भगवानराव प्राथमिक शाळेत शिक्षक व्यंकटेश उर्फ रामानंद तीर्थ यांचे प्राथमिक शिक्षण मुळगावी झाले पुण्यातील महाराष्ट्र विद्यापीठातून इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांसह बी.ए, लोकशाहीचा विकास हा प्रबंध लिहून त्यांनी एम.ए. ची पदवी घेतली पुण्यातील वास्तव्यात लोकमान्य टिळकांच्या भाषणांनी त्यांना भारावून टाकले. टिळकांच्या मृत्यू नंतर आजन्म अविताहित राहून उर्वरीत आयुष्य मातृभूमीच्या चरणी समर्पित करण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली.

**संभाजीनगरचे खासदार :** महाराठवाडा मुक्त झाल्यानंतरही स्वामींजींनी समाजातील तेढ वाढू नये, सलोखा रहावा यासाठी राजकारणात सक्रीय सहभाव घेतला. स्वतंत्र भारतात त्यांनी दोन वेळा निवडणुक लढवली. गुलबर्गा आणि संभाजीनगरमधून ते लोकसभेवर निवडून आले. दुसरी टर्म झाल्यावर मात्र त्यांनी राजकारणातून निवृत्ती घेतली पुढे ते आचार्य विनोबा भावेच्या भूदान चळवळीतही सहभागी झाले. त्यानंतर वय वाढू लागल्याने उपचार सुरु असतानाच त्यांची प्रकृती अत्यवस्थ झाली आणि २२ जानेवारी १९७२ रोजी त्यांच निधन झालं.

१५ ऑगस्ट १९४७ हा भारताला स्वातंत्र्य मिळाले पण स्वातंत्र्यालढ्याची परिपूर्ती अजून झाली नव्हती. कारण काही संस्थानिकांनी भारतात विलीन होण्यास विरोध दर्शविला पण तत्कालीन गृहमंत्री पोलादी पुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांनी अत्यंत संयमाने व मुत्सदीपणे पद्धपैकी बहुतांश संस्थानांचे भारतात

विलीनीकरण केलो. तरीही काश्मिर, हैद्राबाद व जुनागड संस्थानिकांनी आपल्या प्रजेला स्वातंत्र्य देण्यास व भारतात विलीन होण्यास नकार दिला आणि स्वातंत्र्य राहण्याचे मनसुबे रचू लागले. त्यातील हैद्राबाद हे संस्थान निजामाच्या पोलादी जोखडाखाली होते.

१९ जून १९४७ रोजी निजामाने आपण कोणत्याही संघराज्यात सामिल होणार नाही तर स्वतंत्र्य राहणार अशी घोषणा केली. भारतातील सर्वात विलक्षण व विक्षिस संस्थानी म्हणून सातवा निजाम ओळखला जात असे. अमेरिकेतील लॉर्ड नंतर हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात श्रीमंत व्यक्ती होता. यास सत्ता व पैसा या दोन गोष्टींचे जबरदस्त आकर्षण होते. हा महत्वकांक्षी हुशार तर होताच शिवाय डावपेच करण्यात व कटकारस्थाने रचण्यात पुरेसा चतुर होता.

उस्मान अलीने १९२१ मध्ये एक आदेश काढून सभा समेलने बैठका, प्रवचने मिरवणुका यावर बंधी लादली. आखाडे व्यायाम शाळा, ग्रंथालये परवानगी शिवाय काढून नयेत अशी सक्ती करण्यात आली हैद्राबाद संस्थानात निजामाच्या अन्यायाविरुद्ध प्रथम आवाज उठविण्याचे काम आर्य समाजाने केले. आर्य समाजामुळे मुस्लीम धर्मांतर मोहिमेस आळा बसला. हैद्राबाद संस्थानात इस्लाम धर्मीयांखेरीज कोणताच विशेषता हिंदूना कसलेच धर्मस्वातंत्र्य नव्हते.

आर्य समाजावर तर सरवकारची वक्रदृष्टी होतीच. मराठवाड्यात आर्य समाजाची पहिली क्षारवा धारुर जि. बीड येथे नंतर निलंगा जि. बिदर येथे स्थापन झाली २३ फेब्रुवारी १९३६ ला गुंजोटी मजलिसे इलेहादुल मुसलमीनच्या गुंडांनी वेदप्रकाश यांची हत्या केली. वेदप्रकाश हुतात्मा झाले. हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील वेदप्रकाश हे पहिले हुतात्मा ही बातमी सर्वदूर पोहचली सर्वत्र हाहाकार माजला.

हैद्राबादचा स्वातंत्र्यलढा हा भारतीय स्वातंत्र्य लढ्याचाच भाग होता. प्रजेला दुहेरी पारतंत्र्यात राहावे लागत होते. राजकीय पारतंत्र्य तर होतेच पण त्या बरोबर जनतेच्या शिरावर सांस्कृतिक भाषिक आणि धार्मिक पारतंत्र्यही लादण्यात आले होते. ब्रिटिशांपेक्षा ही अधिक दडपशी आणि कोणताही उदारमतवाद न सहन करणारी राजकीय संस्कृती येथे नांदत होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वातंत्र्याचा जो लढा येथे चालला गेला त्याचे नेतृत्व कर्मयोगी संन्याशी स्वामी रामानंद तीर्थ यांनी केले. वास्तविक पाहता स्वामीजी हे हैद्राबाद संस्थानाबाहेरील होते. स्वामीजीचा जन्म कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील सिंदगी या गावी ३ ऑक्टोंबर १९०३ रोजी झाला. हे गाव संस्थानाबाहेर होते. पण सरकारी कागद पत्रात स्वामीजींचे जन्मगाव गुलबर्गा जिल्ह्यातील चिनमेल्ली असे नोंदविले आहे. कारण हैद्राबाद संस्थानात संस्थानाबाहेरील व्यक्तीस गैरमुलकी ठरवून हदपार केले जाई.

स्वामीजीचे पूर्वाश्रमीचे नाव व्यंकटेश भगवानराव खेडगीकर असे होते. स्वामीजीच्या आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. सिंदगीच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ते सोलापूरला आले येथे नॉर्थकोट हायस्कूल ही ब्रिटिशांची सरकारी इंग्रजी शाळा येथील मुख्याध्यापक व शिक्षक इंग्रजनिष्ठ होते. घरुन आर्थिक सहाय्यम मिळाल्याने व्यंकटेशने शाळेच्याच वस्तीगृहात वाढण्याचे काम करून निवास व भोजनाची सोय करुन घेतली. येथेच नवनवीन मित्र मिळाले. पुस्तकांचा सहवास लाभला. हा पहिल्या महायुद्धाचा काळ होता. आणि लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली देश भर ब्रिटिश विरोधी आंदोलन चालू होते. शाळेतील शिक्षक हिंदी मुलांच्या मनात इंग्रजनिष्ठा निर्माण करण्याचा खटाटोप करीत होते. या काळी वाढत्या वयाबरोबरच व्यंकटेशची प्रस्थापित सत्तेविरुद्ध बंडखोरी वाढत होती. लहान लहान गोष्टीतून ती प्रकट होत असे मुलांना युनियन जॅकचे

छोटे धडे व त्याचबरोबर खाऊचे पुडे दिले गेले. व्यंकटेश सारख्या उगवत्या बंडखोरांनी युनियन जॅक फेकून देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढविली दुसऱ्या दिवशी अशा सर्व विद्यार्थ्यांना इंग्रजधार्जिण्या मुख्याध्यापकाच्या छड्या झेलाव्या लागल्या. या काळातच सोलापूर लोकमान्य टिळक येनार होते. लहानगा व्यंकटेश व त्यांच्या बालमित्रांना लोकमांन्य टिळकांच्या संस्थेत जायचे होते. पण शाळेत त्या वेळी परिक्षा सुरु होती. मुलांना सभेस जाता येऊ नये. म्हणून मुद्याम दुपारी परिक्षा ठेवली तेंव्हा व्यंकटेश त्यांच्या मित्रांची घाईघाईने चांगले येणारे प्रश्न सोडविले सभेस उपस्थित झाले.

उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथे व्यंकटराव देशमुख व अनंतराव कुलकर्णी यांनी १९२१ मध्ये राष्ट्रीय शाळा स्थापन केली होती. या शाळेने खऱ्या अर्थाने हैद्राबाद मुक्तीसंग्रमाला ऊर्जा व कार्यकर्त्यांची मालकी पुरवली हैदराबाद मुक्ती संग्रामाचि प्रणेते स्वामी रामानंद तीर्थ या शाळेत जवळपास सहावर्षे मुख्यध्यापक म्हणुन कार्य करत होते.

स्वामीजींनी १४ जानेवारी १९३२ रोजी संन्यास घेतला तेव्हापासून त्यांचे नाव स्वामी रामानंद तीर्थ असे झाले. पुढे अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेत काम करत असतांना स्वामीजींनी पुर्ण वेळ राजकारणात यावे असा आग्रह आनंद कृष्ण वाघमारे व इतर सहकाऱ्यांनी धरला स्वामीजींच्या नेतृत्वाखालीच १९३८ ला हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना झाली मग स्वामीजींनी मागे वळून पाहिजे नाही अनेक निष्ठावंत कार्यकर्ते स्वामीजींना लाभले स्वामीजींनी अत्यंत संयमाने या लढ्याचे नेतृत्व केले व वैयक्तिक सत्याग्रह केले. अनेकवेळा तुरुंगावास भोगला स्वामीजींनी उभारले त्या लढ्यात जनता मोठ्या संख्येने सहभागी झाली. १९३८ ते १९४८ चा काळात पन्नास हजार लोकांचा आंदोलनात प्रत्यक्ष सहभाग होता. १९४७-१९४८ चा काळात वीस हजार लोक तुरुंगात होते. तीस हजार कार्यकर्ते भूमिगत कार्यकरीत होते. या लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉक, बाबासाहेब, परांजपे, दिगंबराव बिंदु आ. कृ. वाघमारे, अनंत भालेराव, नारायराव चव्हाण रामलिंग स्वामी, देवीसिंह चौहान, मुंकूंदराव पेडगावकर, फुलचंद गांधी, इत्यांदीनी मौलीक योगदान दिले. हैद्राबाद मध्ये लढव्या गेलेल्या ऐतिहासिक लढ्यात वेदप्रकाश, धर्मप्रकाश, श्यामलाल, गोविंदराव पानसरे, बहिर्जी शिंदे, जनार्धन मामा, अशा अनेकानी हौतात्म पत्करले.

निजामाशी समोपचाराने बोलणी करण्याचा प्रयत्न भारत सरकार करत होते. पण निजाम दाद देत नव्हता. ७ नोव्हेंबर १९४७ रोजी भारत सरकारने निजामाबरोबर जैसे थे करार केला. पण निजाम पाकिस्तानात सामिल होण्याचा प्रयत्न करू लागला.

निजामाने भारतीय चलन संस्थानात बेकायदा ठरवले शिवाय युनो मध्ये हा प्रश्न घेऊन जाण्याचा प्रयत्न करू लागला. अखेरीस भारत सरकारने १३ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाविरुद्ध पोलीस कारवाई सुरु केली. या कारवाईला ऑपरेशन पोलो असे म्हटले जातो १७ सप्टेंबर १९८४ रोजी निजाम शरण आला व निजामाच्या पोलादी जोखडातून हैद्राबाद संस्थान मुक्त झाले हैद्राबाद संस्थान भारतात विलिन झाले.

■ ■ ■

# निजामकालीन लातूर प्रदेशाचे जमीन महसुली प्रशासन

**अतुल ज्ञानेश्वर चव्हाण**
बी. ए. द्वितीय वर्ष

**पार्श्वभूमी :**

प्राचीन प्रशासकीय रचनेसंबंधी कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील उहापोहान्वये प्रत्येक गाव किंवा ग्रामसमुहातील विविध प्रकारची जमीन व त्यापासून मिळणारा महसूल यांचा सविस्तर अभिलेख ठेवणार अधिकारी होते याची माहिती मिळते.

दक्षिणेत अकबराच्या राजवटीत राजा तोडरमलने सर्व जमिनीची मोजणी करुन व जमीनीची प्रतवारी ठरवून सारा निश्चितीसाठी 'असल-इ-जया-इ' नामक पद्धती सुरु केली होती. अशा तऱ्हेने वसूल केल्या जाणाऱ्या 'तनख्वाह' म्हणत. औरंगाजेबाच्या कारकिर्दीत मुर्शिद कुलीखान नामक दिवाणाने याच पद्धतीत स्थानिका परिस्थितीनुसार काही महत्वपूर्ण महसूलविषयक सुधारणा केल्या. त्यातील अपेक्षित यशामूळे या पद्धतीस पुढे कित्येक वर्षे 'मुर्शिद कुलीखानाची शेतसारा पद्धती' म्हणून ओळखली जाई.

इ.स. १७ व्या शतका आरंभी मलिक अंबर निजामशाही सरदाराने स्वत:ची म्हणून रुढ केलेली जमीन महसूल पद्धती ही राजा तोडरमलच्या पद्धतीचीच सुधारित आवृत्ती होती. यावेळी महसूल मुख्यत्वेकरुन पैशातच गोळा केला जाई. पुढे आसफजहा निजाम-उल-मुल्क याने स्वत:चा सवता सुभा निर्माण केल्यावर इ.स. १७२३ मध्ये हीच पद्धत हैद्राबाद राज्यास लागू केली.

**काही प्रादेशिक बदल :**

हैद्राबाद राज्यातील लातूर प्रदेशातील जमीन महसूलाबाबत माहिती घेण्यापूर्वी या राज्यात झालेल्या काही प्रादेशिक फेरबदलांची माहिती करूण घेणे इष्ठ ठरेल. दक्षिणेत निजामशाही घराण्याच्या उदयानंतर इ.स. १८५३ मध्ये निजामाने ब्रिटिशांशी केलेल्या तहान्वये वऱ्हाडचा बराच मोठा भाग आणि सध्याच्या लातूर जिल्हाच्या काही भागाचा समावेश असलेलां तत्कालीन उस्मानाबाद व रयचूर - दोआब हे जिल्हे ब्रिटिशांना दिले होते. पुढे इ. स. १८६० मध्ये ते ब्रिटिशांनी परत निजामाकडे सुपूर्द केले. यावेळी उस्मानाबादचे मुख्यालय नळदुर्ग येथे होते व त्यात वाशी, औसा, कळंब, तुळजापूर व धाराशिव हे तालुके समाविष्ट हेते. त्यातील औसा तालूक्यातच लातूरचा समावेश होता. इ. स. १८६७ मध्ये निजामाचे पंतप्रधान सर सालारजंग (प्रथम) यांनी हैदराबाद राज्यातील जिल्ह्यांची पुनर्रचना केली होती. इ. स. १९०४ मध्ये उस्मानाबाद जिल्हा अस्तित्वात येऊन त्यात लातूर हे तालुका मुख्यालय बनले. यावेळी जिल्ह्यातील तालुके समाविष्ट यावेळी जिल्ह्यातील उदगीर या ुपविभागात उदगीर, अहमदपुर आणि निलंगा हे तत्कालीन बिदर जिल्ह्यातील होते. इ. स. १९४८ मध्ये निजामाच्या सत्तेच्या अंतानंतर इ.स. १९५० मध्ये केलेल्या पुनर्रचनेनंतर बिदर जिल्ह्यातील अहमदपुर, निलंगा व उदगीर हे तालुके उस्मानाबद जिल्ह्यात जोडून पुन्हा १९६१ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्याचे लातुर,

उस्मानाबाद व उदगीर असे तीन उपप्रशासकीय विभाग निर्मिण्यात आले. त्यापैकी लातुर उपविभागात लातुर, औसा, कलाम (कलंब) हे तालुके व भुम हा महाल होता. पुढे महाराष्ट्र शासनाने इ. स. १९८२ मध्ये उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करुन त्यातून औसा, उदगीर, अहमदपूर, निलंगा व लातुर या तालुक्यांचा मिळून लातुर जिल्हा निर्माण केला. त्यानंतर इ. स. १९९२ मध्ये रेणापूर व चाकूर आणि इस. स. १९९२ मध्ये रेणापूर व चाकूर आणि इ.स. १९९९ मध्ये शिरुर अनंतपाळ, देवणी व जळकोट या नवीन तालुक्यांचा त्यात समावेश करण्यात आला.

**निजामशाहीतील महसुली प्रशासन :-**

सध्याचा लातुर जिल्हा समाविष्ट असलेले तत्कालीन हैद्राबाद संस्थान मुघल साम्राज्याचाच एक सुभा होता. त्यामुळे येथे मुघलांनी रुढ केलेली महसूल पद्धतीत स्वीकारण्यात आली होती. तत्कालीन लातूर व अन्य तालुक्यांना हैद्राबाद राज्याचेच जमीन महसुलाबाबतचे नियम व कायदे कानून लागू होते.

पहिल्या निजामाच्या काळात प्रशासनात अस्थिरता व अराजकता होती. दुसऱ्या निजामाच्या काळात मात्र महसूल व्यवस्थेकडे जाणीवपूर्वक लक्ष पुरविण्यात आले. या काळात महसूल वसुलीसाठी लिलाव पद्धतीने 'गुत्तेदार' नेमले होते. महसूल वसूल करणाऱ्यांना 'तालुकादार' असेही म्हणत पाटील - पटवा - यांमार्फतही महसूल गोळा केला जाई. त्यानंतर पुन्हा तिसऱ्या निजामाच्या काळात चंदुलाल सारख्या कारभाऱ्यामुळे हैद्राबाद संस्थानची महसुली व प्रशासकीय घडी कमालीची विस्कळटली होती. तरीही यावेळी नळदुर्ग जिल्हात समाविष्ट असलेल्या लातुर प्रदेशाचे महसूली उत्पन्न ५० लाख रुपये होते.

संस्थानाच्या अर्थव्यवस्थेचा गाभाच मुळी सरंजामी पद्धतीचा होता. पहिल्या निजामाच्या काळात जहागिरीचे सर्फई खास, पायगा, जहागीर व संस्थान असे चार प्रकार होते. त्यापैकी जहागीर वगळत इतर तीन प्रकार सध्याच्या लातूर जिल्हयात अस्तित्वात नव्हते. मात्र जिल्हयातील एकूण गावांपैकी २० टक्के गावे जहागीरदारांच्या मालकीची होती. त्यांना अमर्याद अधिकार असल्याने जनतेकडून किती सारा वसूल करावयाचा हे सर्वस्वी त्यांच्या इच्छेवर अवलंबून होते. जिल्हयात शेती हा प्रमुख व्यवसाय होता. संस्थानातील इतर जिल्ह्याप्रमाणे या जिल्ह्यातूनही किती शेतसारा वसूल करावा यावर इ. स. १८५३ पर्यंत कोणतेच बंधन नव्हते. जो कोणी सरकारला जास्त रक्कम देईल त्यास 'इजारा' पद्धतीने इजारा जमीन मिळ्याची.

इजारदारांनी मनमानीपणे रयतेस नागविले. देशमुख, देशपांडे, व मोहरील हे वंशपरांपरागत अधिकारीही इजारदारांना शेतसारा वसुलीत साहाय्य करतांना निर्दयपणे वसुली करीत. दुष्काळप्रसंगी जहागीर क्षेत्र वगळता दिवाणी क्षेत्रातील शेतसाऱ्यामध्ये २५ टक्के सूट मिळे. मात्र लातूर प्रदेश जहागीर क्षेत्रात असल्याने त्यास ही सूट मिळत नसे. त्यामुळे लातूर, निलंगा व औसा तालुक्यातील शेतकऱ्यांवर आर्थिक दुर्दशा ओढवली होती.

हैद्राबाद संस्थानातील जमीन महसुलाची पद्धती बऱ्याच अंशी मुंबई इलाख्यातील रयतवारी पद्धतीसारखी होती. संस्थानात दिवाणी किंवा खालसा जमीन आणि निजामाची सर्फ -ई-खास व इतर जाहागिरी असे जमीन महसुलासाठीच्या पद्धतीने दोन प्रकार होते. सरकार केवळ शेतकऱ्यापुरतेच हक्कादार होते. सन १८६६ पूर्वी सारा वसुलीचे काम वार्षिक मकल्याने महसूल कंगातदारांना दिले जाई. त्याबदल्यात त्यांना काही टक्के अडत येत असे. पण इ.स. १८६६ मध्ये जिल्हा प्रशानाची सुरुवात झाल्यानंतर महसूली व्यवस्थेत आमुलाग्र बदल झाले व त्याचे सलारजंग प्रथम यांना जाते.

सर सालारजंग प्रथम यांनी आपल्या दिवाणपणाच्या काळात इ.स. १८५३ - १८८३ विविध क्षेत्रात आमुलाग्र सुधारणा केल्या. महसूल मंडळ निर्माण करुन इ.स. १८६५ मध्ये मुलकी खात्याचे काम या मंडळाकडे दिले. तेव्हापासून जमीन महसूल पद्धतीत आमुलाग्र बदल घडून आला. महसूल गोळा करण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी सरकारी तिजोरी ठेवण्यात आली होती. जोपर्यंत शेतकारी शेतसारा देतो तोपर्यंत त्याच्याकडून जमीन काढून घेण्याचा सरकारला अधिकार नव्हता. दर ३० वर्षांनी सर्वेक्षण व शेतसाऱ्याची फेर आकारणी केली जाई. शेत जमिनीचा उपयोग अन्य कामासाठी केल्यास साऱ्याच्या दहा पट दंड आकारुन शेतजमीन ही काढून घेण्याचा सरकारला अधिकार होता.

सर सालारजंग यांनी इ. स. १८६६ मध्ये ''जिल्हाबंदी पद्धती'' नामक योजना संस्थानात रूढ करुन संस्थानाची विभागणी ५ विभाग व १४ जिल्ह्यात केली. त्यातील उत्तर - पश्चिम विभागातील बिदर व नळदुर्ग जिल्ह्यात बहुसंख्य भाग मोडत होता.

**रयतवारी पद्धती :-**

सालारजंग यांनी इ. स. १८६६ पासून जिल्हा प्रशासनाची सुरुवात करुन रोखीने शेतसारा गोळा करण्याची जबाबदारी तालुकादार व तहसिलदारांवर सोपविली. इ. स. १८७६ मध्ये महसूविषयक सर्वेक्षणाला आरंभ होऊन ते काम सन १८८० मध्ये सुरु करुन सन १८८० मध्ये पूर्ण करण्यात आले. याचवर्षी रोख महसुल देण्याची 'रयतवारी पद्धती' सुरु करण्यात आली. फेर आकारणीच्या वेळी जमीन महसूलात वाढ केली जाई. त्यामूळे संस्थानाचे जमीन महसुलाचे उत्पन्न बरेच मोठे होते. सन १८८३ मध्ये सध्याचा लातूर जिल्हा अंतर्भूत असलेल्या उस्मानाबाद जिल्हाचा जमीन महसूल १०.२२ लाख ते ११.४ लाख रुपये होता. यावेळी कोरडवाहू जमीनीवर सरासरी २ रुपये, तर जास्तीत जास्त ३ रुपये व कमीत कमी १/४ रुपये असा साऱ्याचा दर होता. ओलिताखालील जमिनीवर तो अनुक्रमे ८,१५ व २/८ रुपये होता. सन १९०१ मध्ये निलंगा तालुक्यातून १.६ लाख व उदगीर तालुक्यातून ३.१ लाख रुपये जमीन महसूल गोळा झाला होता. इ.स . १९१९ नंतर निजाम सरकारने शेतसाऱ्यात प्रचंड वाढ केली. केवळ औसा तालुक्यात ३० टक्के शेतसाऱ्याचा दर वाढविला.

रयतवारी पद्धतीत रयेला सर्व शेतजमीन सरकारकाडून मिळालेली असते. जमीन महसूल भरणास पात्र आसलेल्यास 'पट्टेदार' म्हणत. जमीन महसूल भरणाऱ्यालाच पट्टेदार नियमित साराभरणी करुन पट्टेदारी पुढेही चालू ठेवू शकत असे किंवा इच्छेनूसार एका नोटीशीद्वारे ही जमीन त्यागू किंवा विकू शकत असे, वा दुसऱ्यास हस्तांतरित करु.

■ ■ ■

# हैदराबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे योगदान

**कु. अश्विनी कसाब**
**कु. रोहीणी वान्हळे**
बी. ए. द्वितीय वर्ष

हैदराबाद राज्याची स्थापना इ.स. १७२४ मध्ये निजाम उल-मुल्क यांनी केली. तेव्हापासुन आसफजाही घराण्याची निजामीराजवटीला सुरुवात झाली, ती १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत सात निजामांची सत्ता होती. या निजामाच्या जुलमी राजवटीतून हैदराबाद राज्याला मुक्त करण्यासाठी पुरुषाप्रमाणे महिलांचाही सहभाग होता.

महिलांची अर्धी शक्ती सहभागाविणा वाया जाते. ही स्त्रीशक्ती उपयोगात आली तर देशाचा दुप्पट विकास होईल. या म. गांधीच्या उक्तीला प्रतिसाद देऊन निजाम संसथानातील शेकडो महिलांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामात उडी घेतली.

सशस्त्र लढ़ा व महिलांचा सहभाग हे मुक्तिसंग्रामाचे मानबिंदुच होते त्यात मराठवाडा व हैदराबादच्या कर्तबगार महिलांची संख्या फार मोठी होती. परिषदा, सभा, संमेलने भरविणे, संघटना स्थापन करणे, स्त्री शिक्षण, स्त्री सुधारणा चळवळ चालविणे, स्वातंत्र्य सैनिकांना गुप्त रितीने वृत्तपत्रे,  पत्रके, बातम्या व शस्त्रास्त्र पुरविणे कर्तबगार पुरुषाची पिछडी सांभाळणे व वेळ आल्यास रझाकार व पोलीस दलाशी दोन हात करणे ही महत्त्वपुर्ण कामे महिलांनी पार पाडली.

हैदराबाद संस्थानातील परिस्थिती लक्षात घेतली तर बाहेरच्या ब्रिटिश हिन्दुस्थानाच्या तुलनेत येथील महिलांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग का ? घेतला नाही हे जसे उमजते तसेच ज्या महिलांनी परिस्थितीची तमा न बाळगता कार्य केले त्यांच्या धाडसाविषयी व त्यागी वृत्तीविषयी आश्चर्य वाटल्या वाचून राहत नाही. हैदराबाद संस्थानात दोन्ही अर्थाने मोगलाई होती. राज्यव्यवस्थेत मोगलाई व एकूण जीवनात कमालीची जातीयता म्हणजेच मोगलाई पुरुषांना जेथे आपल्या गावात व भागात मोकळे पणाने हिंडणे, फिरणे व सार्वजनिक कार्य करणे अवघड होते. तेथे महिलांना काय सोसावे लागत असेल याची कल्पना न केलेली बरी.

असे असतानाही मराठवाड्यात महिला कार्यकर्त्यांची सेना संख्या आणि गुण या दोन्ही दृष्टीनी बऱ्यापैकी उभी राहिली या महिलांमध्ये तरुण तसेच वयस्कर अशा महिलांचा समावेश होतो. हैदराबाद स्वातंत्र्याच्या संग्रामाला इ.स. १९३७-३८ पासुन सुरुवात झाली.

लातूर येथील इ. स. १९३८ मधील महाराष्ट्र परिषदेचे वैशिष्ट्ये तेथे महिलांचे संमेलन घेण्यात आले. या संमेलनाच्या अध्यक्षा सौ. काशिबाई किर्लोस्कर होत्या. त्यांनी भाषण करत असताना मराठवाड्यातील साक्षरतेच्या प्रमाणाबाबात खेद व्यक्त केला. त्यांनी हे दाखवुन दिले की मराठवाड्यात साक्षरतेचे प्रमाण शेकडा तीन आहे. महिलांमध्ये तर ते शेकडा एक सुद्धा नाही. स्त्री ही जीवनातील अमोघ शक्ती आहे स्त्रियांची उन्नती झाली तरच देशाची उन्नती होईल त्यांनी आपल्या भाषणामध्ये सामाजिक सुधारणेवर भर दिला. आम्ही महिला केवळ तात्विक चिंतन करत बसल्यामुळे कर्तव्य शुन्य झाल्या आहो. असे सांगून सर्व महिलांनी तात्काळ

कार्यास लागावे, असे आवाहन केले. महिला परिषदेत काही ठराव पास केले. साक्षरतेचा प्रसार, प्राथमिक शिक्षण सक्तीचे, मुलींच्या शाळा तपासणीसाठी महिला, आहिल्याबाई व झांशीची राणी जन्मदिन राष्ट्रीय सण, सार्वजनिक संस्थाना दान, मातृभाषेत शिक्षण, कायदेभंगाची तयारी, सत्याग्रह, स्वामीना चिटणीसपद, जबाबदार राज्य पद्धतीची मागणी केली.

मुक्तिसंग्रामात महिलांचा प्रत्यक्ष सहभाग :

हैदराबाद मुक्तीलढ्यात महिलांनी जो सहभाग घेतला त्यात ग्रंथालय चालविणे राजकीय प्रचारातील पत्रके वाटणे, गणपती मेळ्यांत भाग घेणे, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेणे, चळवळीतील कार्यकर्त्यांना खाद्यपदार्थ पुरविणे, ग्रहिणी म्हणून घर सांभाळणे यामध्ये ज्या महिलांनी सहभाग नोंदविल्या त्यात आशाबाई वाघमारे, सुशिलाताई दिवाण, पानकुंवर कोटेचा सुलोचनाबाई बोधनकर, गोदावरीबाई, लताबाई, उषा पांगरेकर, गीताबाई चारठाणकर, प्रतिभाताई वैशंपायने, दगडाबाई शेळके, तारा परांजपे, करुणाबाई चौधरी, शकुंतलाबाई साले, आदींचा उल्लेख करावा लागतो. अनेक महिलानी आपले नाव प्रकाशत न येऊ देता भुमिगत राहुन मुक्तिलढयाचे संघटन केले.

दगडाबाई शेळके ह्या महिलेनी हातात ४ तास रायफल घेउन रझाकारांशी झुंज दिली. पत्रके वाटुन आपला सहभाग कुसुमताबाई जोशीनी नोंदविला स्वदेशी व खादीचा प्रसार शांताबाई कोटेनी केला, स्वामी रामानंद तीर्थ तुरुंगात असताना त्यांच्या बहिन कमलाबाई यांनी लढ्याची माहिती संकलित केली, चर्चा, लेखन, साहित्य परिषद आदी माध्यमातून महिलांनी कार्यकर्त्यांचे बळ वाढविले. हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामात महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन शत्रुशी लढा दिला. स्टे कॉंग्रेसच्या आदेशानुसार त्यांनी झेंडा सत्याग्रह व जंगल सत्याग्रहात १४०० महिलांनी सहभाग घेतला होता. सुर्यापेढला रझाकारांनी विद्यार्थीवर लाठी हल्ला केला. त्याच्या निषेधार्थ ऑगस्ट १९४७ मध्ये निजाम कॉलेज पासुन निघालेल्या मोर्चात गवळीगुड्याच्या विवेकवर्धिनीतील ७० मुलींनी भाग घेतला.

या मोर्चावर रझाकारांनी केलेल्या लाठी हल्ल्यात कांलिदा पांगरेकर यांनी एक वर्षांच्या मुलासह भाग घेतला. त्यांनी आठ महिन्याची शिक्षा तारा परांजपे व मनुबाई कुलकर्णी यांनी स्वातंत्र्य आंदोलनात कार्य केले. आशाबाई वाघमारे यांनी औरंगाबादतीलं गुलमंडीवर तर ईट येथील काकीसाहेब देशमुख यांनी तिरंगा फडकवला.

महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाप्रमाणे मराठवाड्यात महिलांची नांदेड, औरंगाबाद, सेलू व लातूर येथे मेळावे झाले. १ ऑक्टोबर १९४७ मध्ये औरंगाबाद येथे १०० महिलांनी सरकारच्या विरोधात घोषणा देऊन सत्याग्रह केला. बीड, परभणी, लातूर व उस्मानाबाद येथे असेच सत्याग्रह झाले. कल्हाळी येथील दलित महिलांनी रझाकारांशी कडवी झुंज दिली. रझाकार आणि पोलीस यांच्या संयुक्त अत्याचाराला उत आला. कासिम रझवीचा भाऊ तय्यब, भोतकूरचा दाढीवाला आसीम, सिकंदराबादचा महमद हाजी, एका खेड्यात आले असता दुपारी चहाकरिता दुध मिळेना तेव्हा त्या खेड्याच्या पाटलाला त्यांनी उन्मतपणे हुकुम केला! भाई म्हशी दुध देत नाहीत तर तुम्ही तुमच्या बायकांचे दुध ताबडतोब घेऊन या हम को चाय पिना है. महाराष्ट्र परिषद चालू असताना संस्थानातील महिलांनी लातूर महिला संमेलन (१९३८), औरंगाबाद (१९४३), सेलू (१९८४), लातूर (१८४६), मध्ये महिला परिषद भरवून फार मोठी महिला शक्त संघटित केलेली होती. तुंगाबाई बुळर्गीकर तुरुंगात गुप्तपत्रे वाटण्याचे कार्य करीत होत्या, राजकुवर विजयेंद्र काबरा जीव धोक्यात घालून स्वातंत्र्य सैनिकांला मदत करती नांदेडच्या ताराबाई

परांजपे व पदमाकर लाढकर यांनी भोईवालीचा वेशधारण करुन सुलतान बाजारातील छोटा खटला गल्ली मधील स. कृ. वैशंपायनच्या घरातील सायक्लोस्टाईलने मशीन शिताफीने पळविले व जाताना पोलीस पहारेकऱ्यांना निकज्यू सल्लागा उॅडणी (तुझा वंश वाढू दे) असा तोंडभरुन आशीर्वाद दिला. आशाबाई वाघमारे पतीच्या खांद्याला खांदा देऊन कार्य करत होत्या. एकदा तर भिकारणीचा वेश घेऊन गुलमंडीच्या सत्याग्रहींना गुप्तपणे पत्रके वातकेली आहेत. कॉंग्रेड करुणा चौधरी यांचे धाडस असेच अभुतपूर्व होते. औरंगाबादच्या सुपारी हनुमान मंदिरापाशी त्यांनी काढलेला मोर्चा पोलीसांनी अडवला असताना शुद्धा तिरंगा झेंडा फडकविण्याचे धाडस दाखविले. पोलीस झेंडा हिसकावण्याचा प्रयत्न करीत होते. प्रसंगाक्धान राखुन करुणाबाईने मांडीवर झेंडा आंथरुन त्यावर ज्योती ह्या आपल्या कन्येला झोपविले व भाषण केले सर्व पोलीस अवाक होऊन भाषण एकत राहिले सौ. गीताबाई विनायकराव चारठाणकर या देखील निर्भय क्रांतीकारक भगीणी होत्या. वाशिम कॅम्पच्या स्वातंत्र्य सैनिकांना त्या बंदूका, पिस्तुले, रिव्हाल्वर, काडतुसे व हातबॉम्ब पुरविण्याचे काम करीत असत. छत्रपती शिवाजी महाराजांचा गानिमी कावा युद्धनिती येथील स्त्री - पुरुषांच्या रक्तातच भिजलेला होता. नांदेड मुक्तिलढ्याचे केंद्र होते. या परिसरातील महिला पिछाडीस राहणे शक्यच नव्हते सुलोचनाबाई, इंद्रायणी बोधनकर, शकुंतलाबाई साले, कृष्णाबाई रत्नाळीकर रमाबाई गांजवे, संरस्वतीबाई सरदेशपांडे, तान्याबाई पाटील, चंद्रभागाबाई पाटील, गंगुबाई देव, ह्या सर्वजनी धैर्यशाली स्वातंत्र्य सैनिक महिला होत्या द्रगडाबाई शेळके ह्या तर अग्रभागी होत्या. झाशीच्या राणीचे शौर्य तीच्या ठायी होते. टाकळी कोलते पिंपळगावी जन्मलेल्या या भद्रकाली स्टेट कॉंग्रेसचे सदस्यत्व स्वीकारले व टाकळी कॅम्पच्या प्रमुख बनल्या घोड्यावर बसून खांद्यावर बंदुक घेऊन त्या मुस्लीम वस्तीत निर्भयपणे पहारा देत होत्या. पोलीस कारवाईत कन्हेरगाव कॅम्पात त्या सक्रिय होत्या. अनेक चळवळीत व सत्याग्रहात त्यांचा पुढाकार होता. म्हणूनच दगडाबाई शेळके यांना मुक्तीसंग्रामातील महिला योद्धा मानले जाते.

हैदराबाद राज्यातील आसफजाही घराण्याची निजामांच्या नावने ओळखली जाते. निजाम उल-मुल्क (१७२४ ते १७४८) पहिला, निजाम अलीखान (१७६२ ते १८०३) दुसरा, निजाम सिकंदरजहा (१८०६ ते १८२९) तीसरा निजाम नासिर उदौला (१८२९ ते १८४६), चौथा निजाम अफलजल उदौला (१८५७ ते १८६१) पाचवा निजाम मीर महबुब अली (१८६९ ते १९११) सातवा, यांच्या राजवटीचा शेवट १७ सप्टेंबर १९४८ ला झाला.

■ ■ ■



# हैदराबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे कार्य

**आकांक्षा चेवले** बी. एस्सी. प्रथम वर्ष
**संजना गोरे** बी. एस्सी. प्रथम वर्ष

**योगदान :-**

हैद्राबाद संस्थानात स्त्रियांचे स्थान अतिशय हीन दर्जाचे होते. दरिद्रय, निरक्षरता, अज्ञान, अंधश्रद्धा, बालविवाह, बालविधवा, कुपोषण, राजकीय व सामाजिक जागृतीचा अभाव, पडदा पद्धती अशा अनेक रुढी, परंपरांच्या विळख्या ती अडकली होतो. इस्लामी संस्कृती व परंपरेचा फार मोठा प्रभाव स्त्रियांवर होता. तरीही हैदराबाद युवती लढ्यात महिलांनी मोलाचे योगदान दिले आहे.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महिलांच्या सहभागाची दोन कालखंड करता येईल.

१) पहिला कालखंड - इ.स. १९३८ पर्यंत
२) दुसरा कालखंड - इ. स. १९३८ ते १९८२ पर्यंत

पहिला कालखंडात स्त्रियांनी गणपती मेळ्यात भाग घेणे, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेतो, ग्रंथालय चालविले, राजकीय परिपत्रक वाटणे, चळवळीतील कायकर्त्यांना अन्न पुरविणे, चळवळीतील कार्यकर्त्यांची गृहिणी म्हणुन घर सांभाळणे इत्यादी कामे किलेली दिसून येतात.पहिल्या कालखंडातील महिलांचा सहभाग हा सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाचा होता. पहिल्यापेक्षा दुसरा कालखंडातील महिलांचा सहभाग अधिक निर्णायक ठरला.

इ. स. १९३८ ते १९४९ या दुसऱ्या कालखंडात ज्या महिलांनी सहभाग नोंदवला त्यात सुशीलाताई दिवाण, सुलोचनाबाई बोधनकर, आशाताई वाघमारे, कावेरीबाई, गोदावरीबाई, लताबाई, गिताबाई

चारठाणकर, उषा पांगुरबाई, तारा परांजपे शंकुलता साले, करुणा चौधरी, दगडाबाई शेळके, इत्यादी महिलांचा सहभाग होता त्यांच्या मुक्ती लढ्यातील सहभागाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे.

हैद्राबाद राज्य ब्रिटिश राजवटीच्या अस्ताच्या वेळेपर्यंत टिकून असलेले भारतातील सर्वात मोठे स्वायत संस्थानिक राज्य होते. सध्याच्या मराठवाडा, तेलंगणा, विदर्भ, उत्तर कर्नाटकचा काही भाग या संस्थानाची व्याप्ती होती. इ. स. १७२८ पासुन इ. स. १९४८ पर्यंत निजाम हैद्राबाद राज्यांचे संस्थानिक होते. स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रदीर्घ हैद्राबाद मुक्ती संग्रामाची शेवट इ. स. १९४८ मध्ये भारत सरकारने निजाम शासकाविरुद्ध किलेल्या पोलीस कारवाईने झाला आणि हैदराबाद संस्थान स्वतंत्र भारत देशात समाविष्ट झाले.

१९४७ मध्ये ब्रिटिशांना भारतीय स्वातंत्र्या चा कायदा पास केला. या कायद्यानुसार, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिशांच्या राजकीय वर्चसवातून मुक्त झाला. म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळाले. वरील कायद्यानुसार देशी राज्ये आणि संस्थानिकांनी आपली राज्य भारतात की पाकिस्तानात विलीन करावयाचे की, स्वातंत्र्य राह्यचे या बाबतीन स्वातंत्र्य दिलेले होते. त्यामुळे देशीरज्ये व संस्थाने भारतीय संघराज्यात कशी विलीन करुन घेता येतील हा मोठा प्रश्न भारत सरकारपुढे निर्माण झाला. शेवटी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु आणि गृहमंत्री सरदार व वल्लभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीनि करून घेतली. परंतु हैद्राबाद राज्याच्या सत्ताधिश निजाम मीर उस्मान अली खान याने ११ जून १९४७ रोजी आपले राज्य स्वतंत्र्य राहणार असल्याचे जाहिर केले.

निजामाने आपले राज्य स्वातंत्र्य राहणार असल्याचे घोषित किल्यामुळे भारत सरकार आणि हैदराबाद राज्यातील जनतेपुढे मोठा पेच व प्रश्न निर्माण झाला. हैदराबाद राज्याचा सत्ताधिश मुसलमान होता. परंतु राज्यात ८८ टक्के हिंदु ११ टक्के मुसलमान आणि १ लक्षा इतर लोक होते. याशिवाय देशाच्या दुख्खनच्या मध्यभागी असलेलो हैदराबाद राज्य स्वतंत्र्य राहीले. राज्यातील जनतेने हैदराबाद राज्याचे भारतीय संघराज्यात वितीनीकरन करण्यासाठी सत्यागृह व सशस्त आंदोलन किले. शेवटी १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारत सरकारने हैदराबाद राज्यावर लष्करी कारवाई करुन ते भारतीय संघराज्यात विलीने करुन घेतले. हैदराबाद राज्याच्या विलीनीकरण्यासाठी जनतेने जे सत्याग्रह व सशस्त आंदोलने केली. हेच आंदोलन भारतीय इतिहासातील हैदराबाद स्वतंत्र - संग्राम या नावाने ओळखले जाते. हा स्वातंत्र्य संग्राम भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक भाग होता.

■ ■ ■



# सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळीचा उदय

**गणेश थोरे**
बी. कॉम. तृतीय वर्ष

संपूर्ण महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल होता; मात्र मराठी भाषिक प्रदेश असलेल्या मराठवाड्यात निजामशाही होती. शिक्षणाची आभाळ होती काही शाळा होत्या पण त्यांची भाषा उर्दू होती. १९१७ ला हैद्राबाद मध्ये उस्मानिया विद्यापीठ व १९२७ मध्ये औरंगाबादला इंटरमिजिएट कॉलेज स्थापन झाले.

आजुबाजूच्या विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण, महाराष्ट्र, ब्रिटिश सत्ता होती. ब्रिटिश आधुनिक शिक्षणाच्या बाबतीत आग्रही होते. त्यामुळे तिथल्या जनतेचे शिक्षण होत होते. मात्र मराठवाड्यात आधुनिक शिक्षण घेण्याला मर्यादा येत होत्या. निजामी संस्थानामध्ये मराठवाड्यातील लोकजीवनावर चौहुकडून सांस्कृतिक आक्रमण चालू होते.

**सांस्कृतिक चवळीचा उदय**

स्वातंत्र्याच्या चळवळी इतर भागात आकार घेत होत्या त्यामुळे मराठवाड्यातही सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीच्या माध्यमातून लोकजागृती मूळ धरत होती. लातूर मध्ये पुण्यावरुन येऊन लोकमान्य टिळकांनी इ. स. १८९१ पहिली प्रिंटींग प्रेस काढली त्यातून राजकीय जागृतीच्या पाउल मराठवाड्यात पडले. या निमित्तीने लोकमान्य टिळक यांना हिंगोली, परभणीसमोर दिसली होती. १९०१ मध्ये परभणी गणेश वाचनालय सुरु झाले ते मराठवाड्यातील सर्वात पहिले वाचनालय होते. त्यानंतर हिंगोली, कळमनुरी, औसा, औंढा, वसमत, नळदुर्ग, मानवत, लोहा, चाकूर येथेही वाचनालय सुरु झाले. १ ऑगस्ट १९२० रोजी औरंगाबाद येथे बलवंत वाचनालय स्थापन झाले. आ. कृ. वाघमारे हे या वाचनालयाचे प्रमुख होते. खाजगी शाळा या राष्ट्रीय भूमिकेतून कार्य करु लागल्या सरकारचे धोरण खाजगी शाळांबाबत फारसे अनुकूल नव्हते. तरीही इ. स. १९३५ च्या सुमारास २० खाजगी शाळा राष्ट्रीय भावनेतून सुरु झाल्या. त्यात

परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भवन विद्यालय, भारत विद्यालय राष्ट्रीय विद्यालय, श्रीकृष्ण विद्यालय गुंजोटी, योगेश्वरी विद्यालय अंबोजोगाई, शामलाल विद्यालाय उदगीर, राजस्थान विद्यालय बीड, प्रतिभा निकेतन नांदेड, मराठा हायस्कुल औरंगाबाद, असा क्रम लागतो यामागे स्वामी रामानंत तीर्थ व बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा होती.

वरिल शिक्षण संस्थानी मराठवाड्यात राष्ट्रीय जागृतीचे कार्य केले. शारदा मंदिर शाळामुळे मुलींच्या शिक्षणाला चालना मिळाली तर मराठा शिक्षण संस्थेने बहुजनांसाठी शिक्षणाची द्वारे खुली केली. साहित्य विषयक चळवळी सुरू झाल्या उर्दु भाषा शैक्षणिक व्यवस्थेतून राजभाषा बनली त्यामुळे संस्थानातील अन्य भाषा, साहित्य व संस्कृतीची गळचेपी होत गेली. या सांस्कृतिक संघर्षामुळेच साहित्य संस्थानी राजकीय सल्ला जोपासली इ.स. १९१४ - १५ मध्ये हैदराबादेत दक्षिण तरुणांनी साहित्य संघ स्थापन झाला. या कार्यात किशनराव कोरटक्कर व वामनराव नाईक यांनी पुढाकार घेतला या साहित्य संघात अनेक मराठी तरुणांनी सहभाग घेतला प्रारंभाच्या काळात विदर्भ साहित्य संघाशी ही शाखा संलग्न करण्यात आली इ. स. १९३१ मध्ये हैद्राबादेत महाराष्ट्र साहित्य संमेलन घेण्यात आले. डॉ. श्रीधर व्यंकटेश, केतकर हे अध्यक्ष होते. आ. कृ. वाघमारे यांनी संजीवनी साप्ताहिकात मराठी भाषेच्या विकासाबद्दल चिंता केली होती. लक्ष्मणराव फाटक यांनी इ. स. १९२० मध्ये निजाम विजय हैदाराबाद सुरु केले. आ. कृ. वाघमारे यांनी दि. १० फेब्रुवारी १९३७ रोजी मराठवाडा साप्तहिकाची स्थापना केली. इ. स. १९३७ मध्ये निजाम प्रांतीय मराठी साहित्य परिषद स्थापन झाली. तिचे पहिले अधिवेश १, २ व ३ ऑक्टोबर १९३७ रोजी दादांसाहेब खावर्डे यांच्या अध्यक्षतेखाली हैद्राबाद येथे झाले. दुसरे अधिवेश नांदेड येथे दि. २८ ते ३० सप्टेंबर १९४३ मध्ये दत्ता वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली झाले. इ. स. १९४४ तिसरे अधिवेशन औरंगाबाद येथे ग. त्र्य. माडखोलकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. यामुळे मराठवाड्यात सांस्कृतिक आणि साहित्यिक चळवळी मधून मुळ धरु लागल्या त्यातून अप्रत्यक्ष स्वातंत्र्याच्या चळवळीचे बीजे पेरली जाऊ लागली.

■ ■ ■



# हैद्राबाद मुक्तीलढ्याच्या संदर्भात जालना जिल्ह्याचे योगदान

**शिवकन्या अशोक कनकुटे,** बी. ए. प्रथम वर्षे
**आश्विनी बळीराम कसाब,** बी. ए. प्रथम वर्षे

हैद्राबाद मुक्ती संग्रामात मराठवाड्याने अत्यंत मोलाचे योगदान दिले आहे. खरं तर निजामी काळात मराठवाड्यान खुप सोसल आणि बरेच प्रहार सहन केले. मराठवाड्याच्या मातीमध्येच हैद्राबाद मुक्ती आंदोलनाचे सरसेनानी व लोकनेते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या व्यक्तीमत्वाची आणि कर्तृत्वाची अंबाजोगाईमध्ये धारदार बनली. मराठवाड्यांच्या मातीत घडलेले, जोपासलेले, सुसंस्कृत व सुसंपन्न झालेले स्वामी रामानंद तीर्थ संपुर्ण हैद्राबाद संस्थानाच्या मुक्ती लढ्याचे शिल्पकार व्हावेत, हा खरोखरच योगायोगच समजला जातो.

आर्य समाजाची चळवळीने हैद्राबाद मुक्ती आंदोलनात जे योगदान दिले त्यातील पहिले बलिदान वेदप्रकाश आर्यांच्या रुपाने मराठवाड्यानेच दिले. हैद्राबाद मुक्ती संग्रामात रझाकारांच्या आत्याचाराविरुद्ध आणि निजामी सरकारच्या जुलुमाविरुद्ध पहिलं घेताच मराठवाड्याच्या गोविंद पानसऱ्यानं दिलं. हुतात्मा गोविंद पानसऱ्यांच्या बलिदानातुन प्रेरणा घेऊन हुतात्मा बर्हिजी शिंदे हुतात्मा श्रीधर नाईक, हुतात्मा जनार्दन मामा, हुतात्मा बाबुराव बोरगावकर, हुतात्मा देवराव पाटीलबुवा, अुगलमुगले, लक्ष्मण मारुती कुंभार, हुतात्मा बबुन्या मोठाराम हमाल, हुतात्मा सदा संभा महार, शेषराव भिमा वडार, चंदा नागनाथ मांग, गणपती जळवा मांग, किससिंग छेदासिंग राजपुत, कोडुबा दमन्ना चन्नेवार, स्वरुप चंद जमनालाल, हुतात्मा वसंतराव राक्षसभुवनकर इत्यादीचा आवर्जून उल्लेख करता येईल पूर्वीच्या औरंगाबाद आणि आताच्या जालना जिल्ह्यात मुक्ती आंदोलनाची चळवळ अनेक दृष्टीने गतीमान असल्याचे अनेक दाखले व पुरावे पाहावयास मिळतात. पंधरा हुतात्म्याच्या रक्ताने पावन झालेला

हा वैशिषृथपुर्ण जिल्हा आहे, त्यात जनार्दन मामा हु रमाजी म्हतारबा भावरे कुंभार, हु. केशवराव परशुराम, हु. दाजिबा तात्याबा, मस्के हु. दगडूशीर गुलाबगीर, हु. तात्याबा मभाजी, हु. सांडु मभाजी हु. शामराव भिकाजी, हु. भगवंतराव लालुजी इत्यादींचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल, जालना जिल्ह्यात तुरुंगावास भोगलेल्या स्वातंत्र्य सैनिकांची संख्या १५० पेक्षा अधिक असल्याचे दिसून येते.

जालना येथे १९३२ मध्ये आर्य समाजाची स्थापना झाली. पं. कर्मवीरची यांच्या नेतृत्वाखाली अनेक धडाडीने आर्यवीर अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी पुढे आल्याचे दिसुन येतात. १९३८ च्या सत्याग्रह आंदोलनात आर्य समाजाचे नामदेव शर्मा, मांगीलालजी दायमा, लक्ष्मीनारायण काका, नंदलालजी आर्य, शिवराज पिराजी गणपत सोनार, सत्यनारायण शिंपी यांनी सत्याग्रह केला.

१९४२ ला 'भारत छोडों' च्या आंदोलनात वि. रा. जोशी, डॉ. विरखी, किशन तांबोळी, खंडेराव खलसे, गोपाळराव शामनगावकर, बाळ शिंगणे, नरहर खेरुडकर, वसंत कल्याणेकर, हारणीहार देशपांडे, विश्वाथ खेरुडकर यांनी सत्याग्रह व शिक्षा भोगली, अनेकांनी सरकारची पर्वा न बाळगता खादीचा एक वृत म्हणून स्वीकार केला.

स्वामी रामानंद तीर्थ यांच्या निकटवर्तीयामध्ये डॉ. मुरली हारराव काळे, गंगाबिशन करणा, विष्णुदत्त शर्मा, रामजीवन कर्वा, मोहनलाल कर्वा, गणेशलाल अक्कड, मिस्त्रीलाल कटारिया इत्यादींचा समावेश होता. १९४३ मध्ये महाराष्ट्र परिषदेचे चौथे अधिवेशन औरंगाबाद येथे संपन्न झाले. त्यानंतर १९४३ ते १९४६ पर्यंत मराठवाड्यात सर्वत्र संघटना बांधणीचे काम सुरू झाले. त्यात ची म. ना. सोनदे (संघटक), हनुमन बेडे, रामराव गुंजकर, मा. सी. व्याव्हाळकर, राधाकिशन लाला, बद्रीनारायम बारबाले, गोपीकिशन निमोदीया, उत्तमचंद जैन, विष्णू नातु, हरी सावजी, इराण्णा रामण्णा, इत्यादींचा सक्रीय सहभाग होता. विशेषत विद्यार्थी संघटना बांधण्याचे काम जनार्दन मामा, बद्रीनारायण बारवाले, अनंत जड, गोपीकिशन निमोदिया व चंदुलाल खुले यांनी केल्याचे दिसून येते, गाडीवानाच्या संघटनेचे काम ची सोनदे व राधाकिशन लाला हे बघत होते. गुमास्ता मंडळाचे काम गणपतराव वाहक डागा व इराण्णा शमण्णा हे पहात होते. वर्कशॉप युनियनचे काम मुन्नास्वामी व हनिफभाई यांच्याकडे होते. सौ. सक्तिदेवी आर्य यांनी आर्य महिला विरांगणा दलाची स्थापना करुन स्त्रियामध्ये चैतन्य ओतव्याचा प्रयत्न केला होता. तसेच सौ. इंदुमती सोनदे, सौ. गीता गुंजकर, माई अंबडकर, सौ. गोपिकाकाळे, कमला क्षीरसागर, प्रयागबाई यांनी स्त्रीवर्गामध्ये बरीच जागृती घडवून आणली.

तर शेतकऱ्याच्या संघटनामध्ये रंगनाथराव पाटील (डोंगरगाव), लिंबाजी पाटील व बाबासाहेब भांदरगे (दुधना कोळेगाव) दाजीबा पाटील (उद्धव, म्हतारबा शिंदे (खणेपुरी), चंपतराव जोशी (पाचनवडगाव) इत्यादीनी मोलाचे कार्य केल्याचे दिसून येते. तसेच जालना येथे अमरचंद गंगाराम पवार यांची एक प्रिंटिग प्रेस होती. महाराष्ट्र परिषद व स्टेट काँग्रेसची कामे विना मोबदल करुन देण्यात श्री पवार यांनी पुढाकार घेतला. पुढे त्यांनी आपली प्रेस स्वामीजंना नयी जींदगी हे वृत्तपत्र काढण्यासाठी विनामुल्य देवून टाकली. या सामान्य माणसाने मुक्ती लढ्यासाठी केलेला त्याग लक्षात घेण्याजोगा आहे.

जालना जिल्हयात जंगल सत्याग्रह, सरकारी दप्तर जाळणे, पोलीस पाटलांची दफ्तरे जाळणे, मालगुजारी लुटणे, रेल्वेच्या तारा तोरणे, जालना शहराच्या मध्यभागी असलेला पुल उडविणे, करोडगिरी नाक्यावर हल्ले करणे, पोलीस ठाण्यावर हल्ला करणे, जकात नाके उद्धवस्त करणे इत्यादी सर्व लढ्याच्या कार्यक्रमात जालना

जिल्हा अग्रभागी असल्याचे दिसुन येते.

**हुतात्मा जनार्दन मामाचे बलिदान**

जालन्याच्या या पार्श्वभूमीवर हुतात्मा जनार्दन मामाच्या समर्पित जीवनाचा आढावा घेणे संयुक्तिक ठरते. जनार्दनमामा मुळचे राहणारे परळी वैजनाथ जवळील नागरपुरचे त्याचे संपुर्ण नाव जनार्दन शंकरराव कुलकर्णी असे होते. त्याचा जन्म परळी वैजनाथ येथे २ एप्रिल १९२९ मध्ये झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण परळी येथेच झाले. पुढील शिक्षणासाठी ते जालना येथे आपल्या बहिणीकडे आले. त्यांचे मेव्हुणे डॉ. मुरलीधर काळे यांचेकडे कंपाऊंवर होते. इ. स. १९४६ ते १९४७ या काळात ते जालना येथील बस्तानिया फोकानिया या शाळेत आठव्या वर्गात शिकत होते. त्याचबरोबर भालचंद्र व्याव्हाळकर, बद्रीनारायण बारवाले व अनंतराव पड इत्यांदी वर्गमित्र होते. त्यांचे शिक्षण उर्दू माध्यमातुन होत असे. श्री जनार्दन कुलकर्णी आपल्या बहिणीकडे राहात असल्यामुळे सर्वजण त्यांना मामा म्हणून संबोधित असत. आठवीच्या वर्गात असताना स्वातंत्र्य चळवळीत जनार्दन मामानी उडी घेतली. त्यांच्या विरुद्ध निजमाने पकडण्यासाली वारंट काढले. ते सापडेनात म्हणून त्यांना शाळेतुन काढून टाकण्यात आले. विदर्भात असलेल्या देऊळगाव राजा येथील स्वातंत्र्य सैनिक कँपमध्ये मामा दाखल झाले.

देऊळगाव राजा येथील शिबिरात राहून त्या परिसरातील जकात नाक्यावर हल्ले करणे, तलाण्याची दफ्तरे लुटणे, पोलीस ठाण्यावर हल्ले करणे इत्यादी चळवळीत जनार्दन मामांचा सक्रीय सहभाग होता. जनार्दन मामा नागापुरकर त्यावेळी तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असलेले एक बिनीचे स्वातंत्र्य सैनिक होते. आपल्या अन्य सहकाऱ्यांसह त्यांनी या स्वातंत्र्य संग्रामात स्वत:च्या भवितव्यची पर्वा न करता झोकुन घेतले. याच काळात डोणगाव येथे जनार्दन मामा नागपुरकर या तरुणाच्या नेतृत्वाखाली तरुण सैनानींनी केलेला प्रखर हल्ला म्हणजे हैद्राबाद मुक्ती संग्रामातील एक चिरस्मरणीय घटना मानली जाते. डोणगाव हे गाव जालना शहरापासुन २३ कि.मी. अंतरावर येते. भोकरदन, बदनापुर व जाफराबाद तालुक्याच्या सीमेवर हे गाव वसलेले आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात येथे रझाकाराच्या शक्तिशाली कॅम्प होता. रझाकारांचे अनन्वित अत्याचार, छळ, बलात्कार, बेठबिगार इत्यादीमुळे सर्व परिसर दहशतग्रस्त झाला होता. रझाकार हे निजामाचे स्वातंत्र्यसैनिक होते. निजामराज्य हे स्वतंत्र राहावे यासाठी या स्वयंसेवी संघटनेची निर्मिती झाली होती. हे प्रशिक्षित रझाकार निजामाच्या हुकुमाप्रमाणे सर्व अत्याचार करीत असत. भारतीय स्वातंत्र्य चळवीचा कुठेही सुगावा लागला तर त्यास सर्व शक्तिनिशी ते उद्धस्त करीत असत: १९४७ मध्ये देश स्वतंत्र झाल्यानंतर रझाकारांचे आत्याचार अन्वित झाले. निजामाने भारतात सामिल होण्याचे नाकारले व स्वतंत्र मुस्लीम राष्ट्र म्हणूनच आपण राहु असे जाहिर केले. विलीनीकरणास प्रखर विरोध केला. म्हणून या भागात अत्याचार पराकोटीने वाढला. सर्व सामान्य हिंदू जनतेला जीवन जगणे कढीण झाले. अशावेळेस जालना जिल्ह्याचा स्वातंत्र्यसैनिक कॅम्प देऊळगाव राजा याकडे सर्व जनता आशेने पाहत होती.

डोणगावाच्या परिसरातील पोखरी, बुटखेडा, सातेफळ, देवेगव्हाण, निवडुंगा, आसरखेडा, अकोला, लोणगाव, बावनेपागरी, वाघुळ जहागीर या गावातुन स्वातंत्र्य चळवळीचे वारे वाहू लागले. या गावात रझाकार नव्हेत. ते नियमितपणे डोणगाव येथेच वास्तव्य करीत होते व त्यांचाकडे शक्तीशाली कॅम्प सर्व हत्यारे होते. परिसरातील सर्व गावांनी स्वातंत्र्याचा हुंकार दिला. स्वातंत्र्यानंतर एक वर्षाने १५ ऑगस्ट १९४८ रोजी, निझाम राजवट नेस्तनाबुत करण्याचा जो संकल्प कै. सरदार वल्लभभाई पटेल यांनी पोलीस ॲक्शन या

परवलीच्या शब्दानी केला. त्याचक्षणी डोणगाव इत्यादी कँपवर हल्लामोल झाला.

रणगाड्यांचे वाहनाचे स्वातंत्र्य सैनिकांच्या बंदुकाचे आवाज डोणगावच्या शिबीरात घूमू लागले. परिसरातील वरील गावातून स्वातंत्र्य सैनिकासोबत उत्स्फूर्त नागरीक डोणगावी लावले. रझाकार व स्वातंत्र्य सैनिकात चकमक झाली. याच चकमतीत १५ ऑग्सट १९४८ रोजी स्वातंत्र्यसेनानी जनार्दन मामांच्या पोटात ही गोली आरपार घुसली. स्वातंत्र्यसेनानी गावात घुसले. या रझाकारी कॅम्पवरील अनेक रझाकारांना गोलयांनी टिपले. रझाकारी कॅम्प उद्धवस्त केला गेला. अनेकांना जिवंत पकडले. शस्त्रे जप्त केली. निपचित पडलेल्या जनार्दन मामास सहकाऱ्यांनी तोपर्यंत दोन बंदुकीवर कापड टाकुन नविलेल्या स्टेजरवरुन देऊळगाव येथून बुलढाणा येथे हलविले. त्यांना वाचविण्याच पराकाष्ठेचा प्रयत्न आला. परंतु त्यांची प्राणज्योत १७ ऑगस्ट १९४८ रोजी माकवली.

पोलीस ॲक्शननंतर जालनेकरांनी जालना येथे भावी पिढीला प्रेरणादायी ठरावे म्हणून हुतात्मा जनार्दनमामांचा अर्धपुतळा उभारण्यात आला असुन त्यास मामा चौक असे नाव देण्यात आले आहे. तसेच ब अंतुले मुख्यमंत्री असताना जालना येथील मोतीबागेजळव ९ ऑगस्ट १९८३ मध्ये हुतात्मा जनार्दन मामा नागपुरकर यांचे स्मारक उभारण्यात आले असुन त्याच ठिकाणी हुतात्मा जनार्दनमामा नागरपुरकर वाचनालय व अरोग्य केंद्र सुरु करण्यात आले आहे. तसेच जालना जिल्हा परिषदेच्या वतीने प्रतिवर्षी १७ ऑगस्टला जिल्हा पातळीरव वादविवाद स्पर्धा आयोजित केली जाते.

अशारीतीने हुतात्मा जनार्दनमामाबद्दल जालना जिल्ह्यातील ९५० शवातील १५ लाख लोकांना ऐकुन माहिती आहे. जालना शहरातील मध्यभागी असलेला मामाच्या पुतल्याजवळून जाताना हजारो शहरी ब ग्रामीण माणसे ये – जा करीत असतात. हे हुतात्मा जनार्दन मामा आहेत. याची क्षणभर जाणीव त्याना होते व ते पुढे सरकतात.

■ ■ ■

# हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामातील शैक्षणिक संस्थांचे योगदान

**वैष्णवी तुकाराम कौसाईतकर**
**कोमल ज्ञानेश्वर कौसईतकर**
बी. ए. तृतयी वर्ष

हैद्राबादचा स्वातंत्र्य लढा हा. आधुनिक भारताच्या इतिहासात तेस्वी लढा म्हणून नोंदवला जातो. हजारो लढाऊ स्वातंत्र्य सैनिक या संग्रामात उतलले. अनेकांना आपले बलिदान द्यावे लागले. या लढ्यास अनेक राजकीय खाचखळग्यातून आणि कडव्या विरोधाच्या जंगलातून वाट काढावी लागली. स्वातंत्र्य सैनिक आणि रझाकार या निमलष्करी संघटनेतील चकमकी वगळल्या तर हा लढा धर्म निरपेक्षतेच्या तत्वावर आधारीत होता.

**निजाम राजवटीतील शिक्षणाचे धोरण व स्वरुप:**

हैद्राबाद राज्यात पूर्वी राजभाषा फारशी होती. तिच्या जागी उर्दू राजमाषा म्हणून आली. उर्दू भाषेचा आरंभ महेबुब अलीच्या काळात झाला व त्यानंतर हैद्राबाद राज्यात शिक्षणाचे माध्यम उर्दू ही भाषा कायमस्वरुपी ठरली. राज्यातील जनता मात्र मराठी, कानडी आणि तेलगू असली तरीही शिक्षणात मातृभाषेला प्राधान्य नव्हते. मातृभाषेतून शिक्षण मिळत नसल्यामुळे शिक्षणाची संकल्पनाही या काळात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फारसी आत्मसात करता येत नव्हती. निजाम राजवटीत १९२० पुर्वी ज्या संस्था स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने इस्लामी धर्माचे, अरबीचे, फारसीचे शिक्षण देण्याचा अट्टहास होत असे. १९१६ मध्ये औरंगाबाद, १९१६ व १९१८ मध्ये हैदाराबाद, १९१९ मध्ये लातूर व १९२० मध्ये परभणी येथे अधिवेशने मरली होती. या परिषदेच्या व्यासपीढावरुन उर्दू भाषेच्या सक्तीला विरोध होऊ लागला होता. संस्थानातील लोकांना माध्यमिक शिक्षण परिषदेने केशवराव कोरटकराच्या अध्यक्षतेखाली जनता शिक्षण परिषदेची स्थापना केली होती. शिक्षण क्षेत्रामध्ये निजाम सरकराने जी नवी नवी बंधने लादली होती. खाजगी शाळा, ग्रंथालय वगैरे काढणे अशक्य झाले होते. त्या विरुद्ध लोकमत संघटीत करणे, उर्दू भाषेची सक्ती रद्द करुन मातृभाषेच्या शिक्षणाची व्यवस्था करावी हा जनता शिक्षण परिषदेचा हेतु होता.

**निजामाचे पक्षपाती धोरण :-**

हैद्राबादच्या संस्थानामध्ये शिक्षण विषमतेवर आधारीत होते. इस. १९११ साली या संस्थानामध्ये हिंदूची संख्या ८६.८ टक्के होती तर मुस्लीमची १०.६ टक्के होती. परंतु शाळेत जाणाऱ्या मुलांच्या संख्येत हिंदू मुलांची संख्या ३.८ होती तर मुसलमान विद्यार्थ्यांची संख्या १२.५ होती. इ.स. १९२१ व १९४१ या काळात हिंदू मुलांच्या शाळेतील शिक्षणातील वाढ ही केवळ १० टक्के झाली तर मुसलमान विद्यार्थ्यांची शिक्षण घेणाऱ्यांची संख्या ३२.९ टक्के झाली. हिंदू विद्यार्थ्यांची संख्या १०टक्केने वाढली तर मुस्लीम यांची ३१ टक्के वाढली. या तीस वर्षाच्या निजाम राजवटीच्या काळात जे काही १० टक्के फरक पडला होता त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे धर्मांतरावर जोर देण्यात आला होता. हिंदूच्या अस्पृश्य ९ दलीत जमातींना प्रलोभने दाखवून मुस्लीम बनविण्यात आले होते. धर्मांतरासाठी या वेळी वीस लाढा रुपयाची निजाम

सरकारने खास तरतूद केली होती. याच कालावधीमध्ये संस्थाना बाहेर प्रसार करुन हिंदुस्थानच्या भिन् प्राातून मुसलमानांची आयात केली होती. यामुळे मुसलमानांची संख्या वाढली तर हिंदूची कमी झाली शिक्षणाच्या क्षेत्रात केवळ पक्ष पतीपणाच केला जात नव्हता तर मुस्लीम राज्याची कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी कोशिस केली जात होती.

**सक्तीचा गणवेश :**

उस्मानीया विद्यापीठाने सर्व विद्यार्थ्यांसाठी एक गणवेश मुक्रर केला होता. तो म्हणजे निळ्या किंवा काळ्या रंगाचे मुस्लीम पेहरावाची शेखानी आणि खाली पायजमा. या गणवेशाची सहसहा सक्ती करण्यात आली. हा गणवेश प्रदीर्घ काळ प्रचलित होता. परंतु औरंगाबादच्या वंदे मातरम् प्रकरणातून या मुस्लीम गणवेशाला विद्यार्थ्यांनी विरोघ केला. हिंदू मुलांनी आपला स्वाभीमान व राष्ट्रभक्ती जागृती झाल्यामुळे आपली नाराजी व्यक्त केली व त्यांनी शेवटी प्रोव्हाइस चॅन्सलर काझी महंमद हुसेन यांनी या मुलांना तुम्ही हिच संस्कृती स्वीकारली पहिजे, अन्यथा विद्यापीठ सोडले पाहिजे. हैद्राबादच्या उस्मानीया विद्यापीठापुर्वी औरंगाबादाच्या इंटरमिजील्टच्या विद्यार्थ्यांनी शेरवाणीचा गणवेश स्वीकारणार नाही असे निक्षुण सांगितले होते. त्यावेळी औरंगाबादला प्राचार्य महेमुद्दीन होते. त्यांनी मुलांशी तडजोड स्वीकारुन शेरवाणी किंवा काळ्या रंगाचा पार्शियन कोट असा गणवेश निश्चित करण्यात आला. पायजमा अथवा धोतर यापैकी काहीही चालेल असा त्यांनी निर्णय घेतला.

**खाजगी संस्थावर बंदी :**

हैद्राबादच्या निजाम संस्थानामध्ये शिक्षणाचा प्रसार अतीअल्प होता. त्याचे चित्र रेखाटले तर शिक्षण १५ टक्के जनतेलाच मिळत होता. तर ८५ टक्के जाणता शिक्षणापासून वंचित होती. रयतेला शिक्षण मिळू नये अशी निजाम राजवटीने व्यवस्था केली होती. संबंध संस्थानात केवळ ४३ हायस्कुल १०८ मिडल स्कुल, २९१९ प्रायमरी शाळा व ६ इंटरमेजिल्ट कॉलेज आणि एक विद्यापीठ त्यापैकी मराठवाड्यात एकच कॉलेज होते. अंबाजोगाईची योगेश्वरी शिक्षण संस्था व औरंगाबादची सरस्वती भुवन शिक्षण संस्था सोडली तर बाकी सर्व शिक्षण हे सरकारी कक्षात होते.

**अध्ययन व अध्यापन :**

उस्मानीया विद्यापीठात मुस्लीम विद्यार्थ्यांना इल्साम धर्माचे शिक्षण दिले जाई. त्या विषयाला दिनयात असे म्हणत. या विषयाचे प्रोफेसर व विभाग प्रमुख म्हणुन मौलवी मजहरुल हसन जिलानी होते. पैगबराच्या जन्मदिवासाला मिलादुन्नबी या नावाने ओळखले जाई. हा उत्सव विद्यापीठाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी उदासिनतेची व आत्मसंतुष्टतेची निर्भृत्सना केली व देशात जोपर्यंत २२ कोटी गोवर परस्त आहेत. तोपर्यंत मुस्लीम युवकांनी स्वस्थ बसू नये, असे प्रक्षोभक भाषण केले. विद्यापीठात सर्व शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. अरबी, फारसी व उर्दू या विषयाचे खास विभाग होते. प्रत्येक विभागासाठी विभाग प्रमुखाची नेमणुक करण्यात आली होती. विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षणाची व्यवस्था होती. परंतु हिंदू विद्यार्थ्यांना मात्र त्यांच्या धर्माचे शिक्षण देणारा दीनियात या नावाच विषय आवश्यक होता. म्हणजेच ईस्लाम खेरीज अन्य कोणत्याच धर्मासाठी ही व्यवस्था नव्हती. बिगर मुस्लीम विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा नितिशास्त्राचा तास घेतला जात असे. नितीशास्त्र या विषयात क्रमिक पुस्तके असत नीतीशास्त्राला आढालकियात असे म्हणत. या क्रमीक पुस्तकातील जे धडे असत ती मुस्लमान आणि ख्रिश्चन लेखंकांनी लिहिलेली असत. त्यामुळे आदर्शाची उदाहरणे फक्त मुस्लीमांचीच दिली जात असत. नीतिशास्त्राच्या नावावर मुस्लीम पुराणकथा दिलेल्या असत. त्यामुळे

इतर विद्यार्थ्यांच्या मनात तिव्र स्वरुपाची नाराजी आणि शिक्षणाबाबत अनादर निर्माण झाला होता.

हैद्राबादच्या निजाम राजवटीमध्ये नागरी हक्क दडपलेले होते. मीर उस्मान अली याच्या सत्तांकाक्षेमुळे व महत्वकांक्षेमुळे संस्थानातील जनतेच्या सर्वसामान्य व प्राथामिक अधिकारावर जालीम बंधने टाकण्यास प्रारंभ केला होता. याचाच एक भाग म्हणुन इ.स. १९२१ मध्ये एक आदेश काढून सभा, संमेलने, बैढकी, प्रवचने, मिरवणुका वगैरे वर सत्क बंधने लादली होती. लोकांना दडपुन टाकण्यासाठी निजाम अशा रितीने शिकस्त करीत होता व आपल्या महत्वकांक्षेच्या परिपुर्तीसाठी आणखीनही साधने वापरीत होता. उस्मानीया विद्यापीठाचा व एकुण शिक्षण क्षेत्राचा त्यांनी या कामी फार प्रभावी उपयोग करुन घेतला.

**शैक्षणिक संस्थांना अनुकूल वातावरण :**

मीर उस्मान अलीच्या काळात सत्तेचे केंद्रीकरण इतरांच्या तुलनेपेक्षा मोठ्या प्रमाणात घडून आले होते. सरकारने दडपशाहीच्या कोणत्याच उपायाने समाधान होते नराल्याने ते वरचेवर बंधने लादत. परिस्थिती अधिकच कंठीत करीत होती. जागृतीचा नुसता संशय सुद्धा सरकारला संहन होत नव्हता. आखाडे, व्यायाम शाळा, या सर्वांनी बंदी घालण्यात आली होती. धार्मिक क्षेत्रातील अळचेवी वाढीस लागत होती. यामध्ये जेवढा पक्षपात आणि अन्याय करता येईल तेवढा करण्यात आला. नवी मंदीरे बांधता येत नव्हती जुन्या मंदिराचा पुनरुपद्धार किंवा विस्तार करता येत नव्हता. माशीदीसमोरुन वाद्य वाजवीत इतर धर्मीयांना मिरवणूका काढण्यावर अधिपासूनच कडक बंधने होती. या संबंधी इ. स. १८८६ पासूनच एक फर्मान काढून बंधने लादली होती. मीर उस्मान अलीने तर ही बंदने पुरेशी नव्हती असे समजून १९३५ मध्ये यासंबंधी खास आदेश काढून ही बंधने कठोर केली. ऐवढेच नव्हे तर खाजगी जागेतही मशिद असले तर वाद्य वाजविण्यावर बंदी करण्यात आली. परंतु लोकांतील प्रतिकार शक्ती व आपल्या हक्काची जाणीव याच काळात त्यांना मार्ग दाखवित होती. या प्रतिकारात या भागात आर्य समाजाने फार मोठी जागृती केली व मराठवाड्यात शिक्षणाला अनुकूल वातावरण निर्माण केले.

■ ■ ■



# ऑपरेशन पोलो

**संघमित्रा राजकुमार वडमारे**
बी. ए. प्रथम वर्ष

ऑपलेशन पोलो हे सप्टेंबर १९४८ मध्ये भारतीय लष्कराच्या गुप्त ऑपरेशनचे नाव होते. ज्यात हैदराबादचा शेवटचा निजाम सत्तेवरुन उढाडला गेला आणि हैदराबादला भारताचा एक भाग बनवण्यात आले. हे लक्षात घेण्यासारखे आहे की भारताच्या स्वातंत्र्यानंतर जेव्हा भारतीय संघाची स्थापना होत होती. तेव्हा हैद्राबादच्या निजामाने भारताच्या मध्यभागी असतानाही स्वतंत्र देश असण्याची प्रथा सुरु केली होती. फाळणी दरम्यान, हैदराबाद हे त्या शाही घरापैकी एक होते. ज्यांना पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते, जरी १९४८ मध्ये त्यांना भारत किंवा पाकिस्तानमध्ये सामील होण्यासाठी फक्त दोन पर्याय शिल्क होते. उस्मान अली बान, मुस्लिम शासक आणि बहुतेक हिंदु लोकसंख्या असलेल्या राज्याचा शेवटचा निजाम, स्वातंत्र्य राहण्याचा निर्णय घेतला आणि आपल्या सामांन्य सैन्याच्या बळावर राज्य केली.

निजामाने राजकारस सैन्याची स्थापना केली. ज्यामध्ये बहुतेक मुस्लिम सैनिक होते. भारत सरकार उत्सुकतेने हैदराबादच्या दिशेने पाहत होते आणि विचार करत होते की हैद्राबादचा निजाम स्वत: भारतीय संघात सामील होईल. पण सरदार पटेल यांनी राजकारस सैन्याच्या दुर्दक्ष्यतेमुळे हैदराबादला जबरदस्तीने जोडण्याचा निर्णय घेतला.

सरदार पटेलने हे काम पोलिसांच्या मदतीने केले,

ज्याला फक्त पाच दिवस लागले, राजकारांच्या मुस्लिम सैन्याचा सहज पराभव झाला.

मोहिमे दरम्यान मेठ्या प्रमाणावर जातीय हिंसाचार झाला, मोहीम सपल्यानंतर नेहरुंनी त्याची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन केली, ज्याचा अहवाल २०१४ मध्ये सार्वजनिक झाला.

म्हणजेच, अहवाल सुद्धा जाहीर झाला नव्हता, एक सुंदरलाल समिती तज्ञानी हा अकडा दोन लाखापेक्षा जास्त असल्याचे सांगितले. जिना यांच्या प्रभावाखाली, मुस्लिम लीगचे संस्थापक, हैदराबादचे निजाम, नवाब बहादुर जंग यांनी लोकशाही स्वीकारली नाही.

नवाम कासमी रसमी, जे एमआयएम (मजलिसे एथुड मुस्लिमिन) चे प्रमुख नेतो होते. त्यांनी राजकार सैन्य स्थापन केली. जे सुमारे दोन लाखा होते.

मुस्लिम लोकसंख्या वाढण्यासाठी त्याने हैद्राबादला लुटले होते. जबरदस्तीने बलात्कार आणि मुस्लिम हिंदु महिलांची सामुहिक हत्या करण्यास सुरुवात केली होती. कारण हिंदुना भारतात हैद्राबाद हवे आहे. मीरपुर नैखलिया हत्याकांड (मुस्लिमानी हिंदुवर केले).

राजकारांनी पाच हजाराहूं अधिक हिंदुची हत्या केली होती, जी अधिकृत आकडेवारी आहे, हैद्राबादच्या निजामाला पाकिस्तानकडुन म्यानमारच्या माध्यमातून शस्त्रास्त्र आणि पैशांची मदत्त मिळत होती.

ऑस्ट्रोलियन कंपनी त्यांना शस्त्रेही पुरवत होती, त्यानंतर पटेल यांनी ठरवले की अशा प्रकारे हैद्राबाद भारताच्या मध्यभागी एक बंकर बनेल आणि नंतर आर्मि ऑपरेशननंतर लष्कराने सर्व मुस्लिमांना ओळखले आमि त्यांना मारुन टाकले. म्हणुनच आजपर्यंत हा अहवाल सार्वजनिक केला गेला नाही जातीय फायदा घेण्यासाठी काँग्रेसने निवडणुकी पूर्वी तो बाहेर काढला असावा.

हैदराबाद प्रांत भारतीय संघराज्यात विलिन करण्याचा निर्मय घेतला.

**दलिताचा सिंहाचा वाटा**

दक्षिण भारताच्या मधोमद हैद्राबादचा निजाम भारताच्या विभाजनाची आग्रही भुमिका स्वातंत्र्य राष्ट्राची मागणी करत होता.

मराठवाड्यातील जनतेच्या एकजुटीने व भारतात समील होण्याच्या ३ जिद्देने निजामाला गुडघे टेकण्यास भाग पाडले.

देशाच्या एका वर्षाच्या स्वातंत्र्यानंतर मराठवाडा आतुन धगधगत होता. अत्याचार सहन करत लढत होता. याच स्वाधीनता संग्रमाला स्वामी रा. ती. यांच्यासारख्या व्यक्तीमत्वाचे नेतृत्व लाभले. कट्टरपंथी कासीम रझवीच्या नेतृत्वाखाली रझाकार नावाचे एक क्रुर निमलष्करी दल स्थापन केले.

धर्मातरण करण्यासाठी लुटमार करणे, हिंदु स्त्रियांची अब्रु लुटणे हिंदुची घरे जाळणे, जमिनी बळकावणे, सरकारी कर्मचाऱ्यावर हल्ला करणे.

रझाकार हे तेथील जनतेला अतिशय त्रास देत असत त्यांच्या तेथे कायमच दरारा होता. परभणीत रझाकाराना हुसकावून लावणारे सुर्यभान पवार, बिनायक राव चारठानकर विश्वनाथराव कातनेश्वरकर यासारख्या अनेक स्वातंत्र्य सैनिकानी आपल्या जीवनाची पर्वा न बाळगता भारतात दिलीन होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

■ ■ ■

# हुतात्मा गोविंदराव विनायक पानसरे

**झाडे सपना बालाजी**
बी. ए. तृतीय वर्ष



१९३६ साली बिजली व माळकवठा या गावी लेव्ही वसुलीसाठी गेलेल्या नांदेडच्या तहशिलदाराने घराघरात घुसून स्त्रियांची विटंबना केली, चिडलेल्या गावकऱ्यांनी तहशिलदाराला दगडांनी ठेचून ठार मारले, निझामी पोलिसांनी या घटनेबद्दल बिजली व माळकवठ्याच्या बारा नागरिकांना अटक केली! गुन्हेगार म्हणूनच त्यांच्यावर खुनाचा खटला भरण्यात आला कोटीने बारा जणास जन्मठेपेचा शिक्षा दिली १) तानाजी नागोबा २) गणा तानाजी ३) दत्तू माणिका ४) बाबूराव गोविंदराव ५) भुंजगा विठोबा ६) रामा माणिक ७) गणपीत परबाना ८) चापा गुंडाजी ९) गाना भुजंगा १०) भुंजग पांडू ११) लक्ष्मण किसन १२) शामराव कृष्णाजी हे ते १२ नागरीक होते.

गोविंदराव पानसरे धर्माबादच्या जाहीर सभेत बोलले, 'लाचखाऊ अत्याचारी, स्त्रियांची इज्जत घेणाऱ्या नांदेडच्या त्या तहशिलदाराला ठार मारणाऱ्या नागरिकांनं गुन्हेगार समजून जन्मठेपेची शिक्षा देण्याचा निझाम सरकारला हक्क पोचत नाही! विनाअपराध रयतेला छळणाऱ्या, पदोपदी माणुसकीचा मुडदा पाडणाऱ्या निझामी शासनातील कोणत्याही अधिकाऱ्यास या लोकांना गुन्हेगार ठरविण्याचा हक्क नाही। तो हक्क आहे. जनतेच्या जबाबदार राज्य पद्धतीला उद्या उद्यांस येणारी जनतेची जबाबदार राज्यापद्धती या खटल्याबाबत न्याय निवाडा करील! निजाम सरकार न्याय देऊ शकणार नाही! कदापी नाही ! आणि तसा अधिकार निझाम सरकार स्वत:कडे आहे,असे समजून बिजली व माळकवठ्याच्या त्या बंदिवान नागरिकांना फाशी देणार असेल तर अशा संस्थानात जिवंत राहण्यापेक्षा मी स्वत: फासावर जाणे अधिक योग्य समजतो!

पुढे मुधोळच्या तहशिलदाराने लाच घेण्याचा सपाटा सुरु केला. तेव्हा गोविंदरावांनी भ्रष्टाचाराविरुद्ध तुफान भाषण देऊन तहशिलदाराविरुद्ध रान उठवले! झाले ! गोविंदरावांना राजद्रोहाखाली अकट करण्यात आली ! कसला राजद्रोह ? कोणाचा देश ? कोण या देशाचे मालक ? कोण देशद्रोही ? आणि गोविंदरावना देशद्रोही ठरविणारे कोन ? जेथे पिसाट जुलमी निझामी अधिकारी देशद्रोही ठरत नाहीत । निरपराध रयतेला गोळ्या घालणारे इतेहादुल संघटनेचे नेते देशद्रोही ठरत नाहीत । स्त्रियांच्या अब्रूचे धिंडवडे काढून खेडी जाळून टाकणारे रझाकार देशद्रोही ठरत नाहीत । पण तेथे देशद्रोही ठरतात सत्य आणि अहिंसा अंगी

बागवलेले गांधीजीचे सच्चे अनुयायी गोविंदराव ! साने गुरुजी सारखे मातृरुदयी प्रेमळ गोविंदराव! न्याय ते निर्भयपणे घोषित करणारे गोविंदराव पानसरे! या थोर देशभक्ताला देशद्रोही म्हणून अटक करणारे धन्य ते करंटे सरकार !

१५ मे ला बदनापूर जिल्हा औरंगाबाद येथे गोविंदरावचा जन्म झाला वडील विनायकराव आणि आई यमूनाबाई दोघे एकाच दिवशी सहा महिन्याच्या गोविंदाला सोडून निघून गेले ! या अनाथ गोविंदाचे पालन पोषण त्याचे मामा शंकरराव यांनी केले. शिक्षण विवेकवर्धिनी येथे मॅट्रीकपर्यंत पूर्ण झाल्यावर उस्मानिया विद्यापीठाच्या कॉलेजमध्ये गोविंदरावनी प्रवेश घेतला म. गांधीजींची ४२ वी ची चळवळ जोमात आली! हरिपूरा येथील काँग्रेस अधिवेशन पार पडले. गोविंदराव यांनी कॉलेजला राम राम ठोकला धर्माबाद हे आपले कार्यक्षेत्र निवडले. जनजागृतीच्या व विधायक कार्याचा आरंभ केला. वाचनालय राष्ट्रीय व्यापारी मंडळ, हमाल संघटना, खादी प्रचार इत्यादी संस्था स्थापन केल्या.

गोविंदराव रंगाने काळे सावळे बातवेत उंचीचे बिनकॉलरचा खादीचा डगळ नेहरू शर्ट, दुहेरी काष्टा, धोती, डोक्यावर खादीची शुभ्र टोपी असा त्यांचा पोषाख होता कोठे प्रवासास निघाले की खांद्यावर घोगडी असे. त्यामुळे गोविंदराव खेड्यातील लोकांना हा आपलाच आहे असे वाटे व ताबडतोब त्यांच्याशी जवळील निर्माण होईल धर्माबाद परिसरातील अनेक खेड्यांना भेटी देऊन हैद्राबाद संस्थानात जबाबदार राज्यापद्धति स्थापन झाली पाहिजे, त्यासाठी जनतेने सत्याग्रहा साठी सिद्ध झाले पाहिजे अशी प्रचार मोहिम उघडली!

आरंभी उद्‌घृत केलेल्या बिजली व माळकवठा प्रकरण व मुधोळच्या तहशिलदाराच्या भ्रष्टाचाराविरुद्ध केलेल्या भाषणामुळे निझाम सरकारने २१.८.१९४५ रोजी गोविंदरावाना अटक केली. आणि दि. २९.१०.१९४६ रोजी जामिनावर त्याची सुटका केली ता. २९ रोजी सुटका करण्यामागे रझाकार संघटनेच्या नेत्यांचे कुटिल कारस्थान होते. त्या दिवशी बिलोली जि. नांदेड येथे कासिम रझवीची एक प्रचंड सभा आयोजित करण्यात आली होती त्या सभेसाठी शेकडो रझाकार बिलोली येथे जमले होते. 'आझाद हैदराबाद झिंदाबाद' 'कालिम रझवी झिंदाबाद' अशा घोषणांनी, कराबीनीच्या व बदुकांच्या बारांनी गाव दणागून गेले होते या सभेला आलेली रझाकारांची एक तुकडी पुर्वेनियोजित कटाप्रमाणे धर्माबादकडे निघालेल्या गोविंदराव पानसरेच्या बेलगाडीपुढे अजीपुर या गावाजवळ आडवी आली! गाडी थांबली गाडीतील लोकांना खाली उतरण्यास फर्माविण्यात आले. गोविंदराव बरोबर पुंडलिक पाटील व इतर दोघे गाडीतून खाली उतरले! रझाकार काँग्रेस मुर्दाबाद ! गोविंद पानसरेको काट देंगे । असे ओरडु लागले । इतक्यात तुकडीच्या म्होरक्याने यहाँ गोविंद पानसरे कौन है? असा सवाल केला! मरण्याची तमा न बाळगणारे गाविंदराव मै गोविंदराव पानसरे हूँ। असे उत्तर देऊन ते पुढे येतात न येतात तोच त्यांच्यावर तलवारीचे सपासपू वार हाऊ लागले! पुंडलिक पाटील २०, २२ वर्षाचा तरुम गोविंदराववर आडवा पडला त्याच्यावर वार झाले. दोघा तिघा रझाकारांनी पुंडलिकला बाजूला ओढले आणि रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या गोविंदरावचे मस्तक तलवारांच्या वारानी धडा वेगळे केले ! गोविंदराव पानसरे धारातिर्थी पडले! स्वातंत्र्य देवतेला प्रसन्न करण्यासाठी चेतवलेल्या अग्नीकुडात आणखी एका वीराची आहती पडली!

■ ■ ■

# हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात कंधारचा सहभाग

**कु. अंकिता टाळेकार**
**कु. भारती बारटक्के**
बी. ए. तृतीय वर्ष

भारतात अस्तित्वात असलेल्या ५६३ संस्थानांपैकी 'हैद्राबाद' हे एक संस्थान होते. या संस्थानात मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगणा हा प्रदेश समाविष्ट होते. या संस्थानातील जनतेला स्वातंत्र्यासाठी सशस्त्र आंदोलन करावे लागले. हे सश्त्र आंदोलन भारतीय आंदोलनाचाच एक भाग होता या संस्थानांचा शेवटचा निजाम मीर उस्मान अली खान हा होता. तो 'रझाकार' या लष्करी संघटनेच्या जोरावर आपले संस्थान भारतीय संघराज्यात विलीन न करता स्वतंत्र ठेवण्यासाठी प्रयत्नशील होता, म्हणूनच या संस्थानातील जनतेने हैद्राबाद राज्याच्या मुक्तीसाठी आंदोलन सुरु केले. या आंदोलनात कंधार तालुक्याचा सहभफाग फार मोठा आहे. त्याचीच माहिती यात घेण्यात आली आहे.

**आर्य समाजाचा सत्याग्रह इ. स. १९३८ :**

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाची पार्श्वभूमी तयार करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. स्वामी द्यानंद सरस्वीतींनी मुंबई येथे सर्वप्रथम १० एप्रिल १८७५ रोजी आर्य समाजाची स्थापना केली. पुढे संपूर्ण देशात आर्य समाजाच्या शाखा स्थापना करण्यात आल्या, 'हैद्राबाद संस्थानात इ.स. १८८० मध्ये प्रथम मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील ता. किल्ले धारुर, येथे आर्य समाजाची स्थापना झाली. पुढे १८९२ मध्ये हैद्राबादला सुलताननबझार येथे आर्य समाजाची स्थापना झाली.

धारुर येथे आर्य समाजाची स्थापना करण्यासाठी पंडित भगवतीप्रसाद, कुंदन प्रसादजी, गोकुल प्रसादजी, मगनलालजी, रामचंद्र भाईजी, माणिक प्रयादजी, बाबुरावजी वैदय, वाळू गणेश सिंहजी वर्मा व बन्सीलालजी तिवारी वकील यांनी प्रयत्न केले होते.

मराठवाड्यात सर्वात जास्त म्हणजेच ५९ हुतात्मे कंधार तालुक्यात झाले आहे. या तालुक्यात १७१ स्वातंत्र्य सैनिक होऊन गेले आहेत.

आर्य समाजाच्या सामाजिक व धार्मिक कार्यामुळे चळवळ उद्यास येत असल्याचे जाणीव झाल्यामुळे निजाम सरकारने आर्यसमाजावर अनेक निर्बंध घातले. त्यामुळे१९३८ साली आर्यासमाजानी निजाम सरकारच्या विरोधात सत्याग्रह सुरु केला.

हा सत्याग्रह १९३९ पर्यंत चालू होता. या सत्याग्रहात कंधार तालुक्यातील अनेक आर्यसमाजी व्यक्तींनी सहभाग घेतला होता. उदगीर येथील भाई शामलालजी व बन्सीलालजी या आर्यसमाजी बंधूनी स्वातंत्र्य चळवळीचे लोण गावोगावी पोशेचविले होते. ते कंधारला सुद्धा आले होते. कंधार व बहादरपुरा येथील बजरंगलालजी चौधरी, माणिकराव कुरुडे, नागबाच टेकाळे, ग्यानोबाराव टेकाळे, जयवंतराव कुरुडे, अनंतराव मामडे, रामदास कोळनुरकर आणि वडवळकर या आर्यसमाजी व्यक्तींनी कंधारला सत्याग्रह केला. केशवराव धोंडगे यांनी हि तरुण मुलांना एकत्र जमवून रोज सकाळी बहादरपूरा येथील विठ्ठल मंदिरात राष्ट्रीय प्रार्यना घ्यायला सुरवात केली ती प्रार्थना 'ऐ मातृभूमी तेरे चरणोंमे शिर नमाऊ, विश्व विजया तिरंगा प्यारा झेंडा उंचा रहे, हमारा' अशी होती. ही प्रार्यना बंद करण्यासाठी रझाकारांनी धमक्या दिल्या परंतु

प्रार्थनेला खंड पडला नाही.

**स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह १९३८ :**

२९ जून १९३८ रोजी हैद्राबाद स्टे काँग्रेसची स्थापना झाली. परंतु ८ सप्टेंबर १९३८ रोजी 'पब्लीक सेफ्टी रेग्युलेशन' या कायद्याने निजाम सरकारने काँग्रेसच्या स्थापनेवर बंदी घातली. त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थांनी स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवावी आणि जनतेला राजकीय स्वातंत्र्य द्यावे अशी मागणी करुन २४ ऑक्टोबर १९३८ रोजी एक कृती समिती स्थापन करुन सत्याग्रह सुरु केला. २४ डिसेंबर १९३८ रोजी महात्मा गांधीजीच्या आदेशानुसार हा सत्याग्रह स्थगित करण्यात आला. स्वामीजींच्या आवाहानास प्रतिसाद देऊन संस्थानातील जनतेने ठिकठिकाणी सत्याग्रह केले. कंधार, सोनखेड व लोहा या ठिकाणीही सत्याग्रहे करण्यात आले. 'कंधार तालुक्यात पहिला सत्याग्रह ॲड गोविंदराव मोरे यांनी कंधार, लोहा व सोनखेड येथे केला. त्यासाठी त्यांना १४ महिन्याची शिक्षा भोगावी लागली. याच सत्याग्रहात राजाराम मामडे, रंगनाथ मामडे, रमाकांत मामडे, गुरुनायराव कुरुडे, पंढरीनाथ कुरुडे, माणिकराव कुरुडे, केशवराव घोंडगे, माणिकराव पाटील, अनंतराव मामडे इ. आणि प्रल्हाद आनावडे यांनी सहभाग घेतला होता.

**झेंडा सत्याग्रह :**

११ जून १९४७ रोजी निजामाने आपले राज्य स्वातंत्र्य राहणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे स्टेट काँग्रेसने स्वामी रामानंदतीर्थांच्या नेतृत्वाखाली पुन्हा स्वातंत्र. आंदोलनाला सुरुवात केली. त्यांनी आता कायदेभंगाच्या चळवळीला प्रारंभ 'संघराज्यात विलीन होण्याचा दिन' आणि १५ ऑगस्ट हा दिवस 'भारतीय स्वातंत्र्य दिन' म्हणून साजरा करण्याचे जनतेला आवहान केले. या दिवशी ठिकठिकाणी तिरंगा ध्वज फडकवून सत्याग्रह करण्यात येणार होता इकडे निजामाने मात्र संस्थानात तिरंगा फडकाविण्यात कायद्याने बंदी घातली होती. तरीही ठिकठिकाणी झेंडा सद्याग्रह झाला.

कंधार येथे ७ ऑगस्ट १९४७ रोजी रामदासराव कोळनुरकर यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह झाला. त्याच्या सोबत २२ सत्याग्रही होते.

त्यापैकीच दत्तात्रय रंगनाथ बिडवई, नागोराव कोळनुरकर व गुरुनायराव कुरुडे हे तिघेजण होते. येथील मोरे व्यायामशाळेवरही तिरंगा फडकाविला होता. पोलिसांना या सर्व सत्याग्रहींना अटक केली होती. कल्हाळीच्या आपासाहेब नाईकांनी आपल्या गठीवरं तिरंगा लावला होता. बहादुरपूरा येथील केशवराव घोंडगे हे यावेळी औरंगाबाद / संभाजीनगर येथे मराठा बोर्डींगमध्ये शिक्षण घेत होते. या बोर्डिंगमधील सर्व विद्यार्थींनी ७ ऑगस्टला तिरंगा ध्वज घेऊन मिरवणूक काढली. दिवाण देवडीजवळ पोलिसांनी मिरवणूक अडविली, तेव्हा पोलिसांचे कडे तोडून मिरवणूक पुढे निघाली. त्यामुळे मिरवणूकीवर लाठीहल्ला केला. त्यामुळे अनेकजण जघमी झाले. केशवरावांच्या हातात तिरंगा ध्वज होता. पोलिसांनी केशवरावांना काठीने बेदम मार दिला. परंतु त्यांनी ध्वज खाली पडू दिला नाही. गुरुनायराव कुरुडे, पंढरीनाथ कुरुडे, जयवंतराव गुरुडे, माणिकराव कुरुडे, शंकरराव कुरुडे व केशवराव घोंडगे यांनी भूमिगत राहून कार्य केले.

**जंगल सत्याग्रह :**

जंगल सत्याग्रह हा हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनाचाच एक भाग होता. स्टेट काँग्रेसच्या कृतीसमितीने जंगल सत्याग्रह करण्याचा आदेश दिल्यामुळे जनतेने १५ सप्टेंबर १९४७ पासुन जंगल सत्याग्रहाला प्रारंभ केला. ताडी, शिंढी व मोह या झाडापासुन सरकारला १, ७८, ५७, ९०४ रुपये महसूल मिळत असे. त्यामुळे हि झाडे तोडणे गुन्हा होता. अशी झाडे तोडून कायदेभंग करणे व सरकारला त्यापासून मिळणारा महसूल बंद करणे या हेतूने जंगल सत्याग्रह सुरु केला. नांदेड जिल्हाचे तीन विभाग पाडले व त्यावर तीन कार्यकर्त्यांची नियुक्ती करण्यात आली. मुधोळ व बिलोली हे तालुके आणि त्यास सभोतालचा भाग रघुनाथ रांजणीकरांकडे, कंधार,

मुखेड व देदलूरचा भाग नागनाथ परांजपे यांच्याकडे भोकर, हदगाव व नांदेड तालुक्याचा भाग अनंत भालेराव यांच्याकडे देण्यात आला.

**रझाकारांशी प्रतिकार :**

रझाकार ही निजामाने पोसलेली लष्करी संघटना होती. या रझाकारांचा प्रमुख कासीम रिझवी होता. त्याच्या जोरावरच निजामाने आपले संस्थान स्वतंत्र्य ठेवण्याचा निर्धार केला होता. या रझाकारांना जनतेने मिळेल त्या साधनाने आणि मार्गाने प्रतिकार केला. २० जून १९४७ रोजी रात्री चाळीस रझाकार व रोहील्यांनी लोहा येथील गावाला वेठा दिला. या गावात राहणाऱ्या पंडितराव मक्तेदार, चिमणराव पटवारी व बाळासाहेब पटवारी यांची घरे लुटन व त्यांना ठार करुन रझाकारांनी इतर घरांची लूट सुरु केली. त्यावेळी माधवराव नळगे व त्यांची पत्नी पार्वतीबाई व मुक्तामन बळगे यांनी रझाकार व रोहील्यांशी गोळीबार करुन प्रतिकार केला. त्यामध्ये एक रोहीला आणि मुक्तामन बळगे ठार झाले या घटनेच्या निषेधार्य कंधारचे तहसीलदार फरीद मिर्झा यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला होता. १५ सप्टेंबर १९४८ रोजी माधवराव बळगे व अनंत मामडे यांनी कंधारमध्ये भारतीय लष्करांच्या मदतीने रझाकारांना पिठाळून लावले होते.

रमाकांत मामडे, बजरंगलाल चौधरी, ग्यानोबाराव टेकाळे, नागोराव कोळनूरकर, उद्धव यन्नावर, गंगाधर येशवार शिवलिंगप्पा देशमुख व दत्तात्रय बिडवई यांनी रझाकारांशी प्रतिकार केला. गंगाधर येरावार हे रझाकाराशी लढा देतानाच ठार झाले.

**कल्हाळी आंदोलन १९४८ :**

कंधार तालुक्यात 'कल्हाळी' हे गाव कंधार ते मुखेड रस्त्यावर आहे. त्या ठिकाणी रझाकार आणि स्वातंत्र्यवीर यांच्यात चांगलाच संघर्ष झाला येथील आंदोलनात ३६ स्वातंत्र्यवीरांना वीर मरण प्राप्त झाले. कल्हाळी येथील जहागिरदार बापुसाहेब, भगवंतराव नाईक आणि अप्पासाहेब नाईक हे हैद्राबाद स्वातंत्र आंदोलनाचे भूमिगत राहून काम करीत होते. ७ ऑगस्ट १९४७ रोजी त्यंनी आपल्या गढीवर तिरंगा फडकाविला होता. त्यामुळे मुखेडच्या फौजदाराने गढीवर गोळीबार केला. पण नाईक बंधूनी त्याला पिटाळून लावले होते. यानंतर गंगाधर पटवारी शेतसारा व लेव्ही वसुलीसाठी कल्हाळीला आला. पण त्यावर्षी नापिकी झाल्यामुळे शेतसारा व लेव्ही देणे लोकांना शक्य नसल्यामुळे आपासाहेबांनी गंगाधर पटवारी यास दम दिला. यानंतर पटवाऱ्याने आप्पासाहेबांच्या बंडाची माहिती कंधारच्या तहसिलदाराला दिली. तेव्हा तहसिलदाराने शेतसारा व लेव्ही वसुलीसाठी पटवाऱ्यासोबत अमीन साहेब व काही कर्मचाऱ्यांना सोबत देवून कल्हाळीला पाठीवले पण आप्पासाहेबांनी शेतसारा व लेव्ही देणार नाही असे सांगून अमीन साहेबांवर गोळी झाडली. त्यामुळे अमीनसाहेबाने कल्हाळीतील लोकांचा सुड घेण्यासाठी कंधारचे २०० रझाकार व नांदेडचे सशस्त्र पोलिस २९ जुलै १९४८ रोजी कल्हाळीला पाठविले, आप्पासाहेबांनी गावातील सर्व स्त्री – पुरुष, मुले व जनावरांना गढीत आश्रय दिला व गढीचा दरवाजा बंद करुन घेतला. त्यांनी संभाजी टोळ, लक्ष्मणराव बडजे, तुकाराम वारीक व धोंडीबा मंदाडे यांच्यासह गावातील स्त्री – पुरुषांनी रझाकारांवर गोळीबार सुरु केला. या लढ्यात २५ रझाकार ठार झाले. परंतु दुसऱ्या दिवशी पुन्हा एक सशास्त्र पोलिस दल कल्हाळीत घुसते. इकडे अन्नधान्य, दारुगोळा व शास्त्रसाठा संपल्याने नाईक हतबल झाले.

शेवटी रझाकार व पोलिसांशी लढता लढताच आप्पासाहेब यांचे उसहकारी हुतात्मा झाले. शेवटी रझाकारांनी संपुर्ण गावाला आग लावली. अशा रितीने कल्हाळीच्या स्वातंत्र्यवीरांनी रझाकारांशी दिलेला लढा अविस्मरणीय ठरला.

■ ■ ■

# हैद्राबाद मुक्ती लढयात औसा तालुक्याचा सहभाग

**पानझाडे नेहा**
बी.ए. प्रथम वर्ष

औसा तालुक्यातील दुसरे घडाडीचे स्वातंत्र्य सैनिक म्हणुन श्री चंद्रशेखर वाजपाई यांचा उल्लेख करावा लागेल त्याचांही जन्म औसा तालुक्यातील नागरसेवा येथे १९२२ मध्ये झाला.

१९२८ मध्ये चंद्रशेखर वाजपाई हिप्परग्याच्या शाळेत रुजू झाले. तेथेच त्यांचा पु.स्वामी रामानंद तीर्थ, पु. बाबासाहेब परांजपे, श्री राघवेंद्रराव दिवाण, बाबुराव कानडे, दादाराव गुरुजी व श्री देवीसींह चौहान आदि भारावलेल्या शिक्षकांचा सहवास मिळाला. खऱ्या अर्थाने चंद्रशेखर वाजपाई यांना राष्ट्रीय विचारांचे बाळकडु हिप्परग्याच्या शाळेतच मिळाले.

श्री चंद्रशेखर वाजपाई यांनी चिंचोली कँपमध्ये पु. बाबासाहेब परांजपे व श्री रामचंद्रराव मंत्री यांच्या सोबत महत्वपुर्ण जबाबदारी पार पाडली. चिंचोली कँपच्या अधिकारक्षेत्रात परांडा तालुक्यातील मामकेश्वर, ढोकी, अंपसिंगा, पानगाव इत्यादी निजामी राजवाड्यातील गावे येत असत. कँम्प माध्यमातुन रात्री ११.०० ते पहाटे पर्यंत करोडगिरी नाक्यावर हल्ले करणे, निझामी पोलिस ठाण्यावर हल्ले करणे, रझाकारांच्या अन्यायमुलक धोरणांचा प्रतिकार करणे इत्यादी कामात चंद्रशेखर वाजपाईचा महत्वपुर्ण वाटा राहिला याच कँम्पध्ये हैद्राबादचा अत्यंत बुद्धीमान, धाडसी स्वभावाचा श्रीधर वर्तकही होता. आपसिंगा येथील रझाकाराचे केंद्र उडवुन देण्याची जबाबदारी चिंचोली कॅम्पच्या श्री रामचंद्रराव मंत्री, चंद्रशेखर वाजपाई, शेषराव वाघमारे, श्रीनिवास खोत, काशीनाथराव मुकदम, नरहरराव मालखरे, राघवेंद्र दिवाण व श्रीधर वर्तक यांच्यावर टाकण्यात आली होती. रझाकारांनी तुळजापुर व उस्मानाबादहुन ज्यादा हुकुम देखील मागविली होती. रझाकारानी दर्ग्याहुन जबरदरस्त मारा केला. त्यातील एक गोळी श्रीधर वर्तकाच्या मस्तकाचा छेद घेवुन गेली. श्रीधर वर्तक रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याचे प्रेत शत्रुच्या हाती लागु नये म्हणुन श्री रामचंद्रराव मंत्री वेगाने पुढे गेले, तेंव्हा जखमी अवस्थेत असलेल्या वर्तकाने आदेश दिला की, ‘भाबडेपणा, सोडा एक सैनिक राष्ट्रासाठी ’ गेला आता इतरांनी हाकनाम बळी पडु नये, मरणाचे आणखी प्रसंग येणार आहेत, चला, मागे फिरा! अशारितीने वर्तकाचे शव तिथेच सोडून दयावे लागले. वर्तकाच्या हौतात्म्यने अवघ्या चिंचोली कँम्पमधील चंद्रशेखर वाजपाई सारख्या सैनिकांना राष्ट्रासाठी धैर्याने लढण्याची प्रेरणा निर्माण झाली.

चंद्रशेखर वाजपाई यांनी सोलापुरच्या माणिक ऑईल मीलमध्ये हातबॉम्ब तयार करण्याच्या कारखान्यात बाबासाहेबाच्या प्रेरणेमुळे कार्य केले. सोलापुर केंद्राने मराठवाड्याच्या सर्व केंद्राना तसेच तेलंगणा – कर्नाटकातील काही केंद्राना बॉम्ब पुरविण्यात महत्वपुर्ण योगदान दिले होते. या केंद्रातुन सहा हजार पेक्षा अधिक बॉम्बस तयार करण्यात चंद्रशेखर वाजपाई सारख्या औसा तालुक्यातील तरुणांचा मोलाचा सहभाग राहिला.

चिंचोली कॅम्पच्या सैनिकांनी पुढाकार घेवुन रझाकाराच्या तावडीतुन ६५ गावे मुक्त केली व त्यांना ‘मुक्तपुर स्वराज्य’ असे नाव देण्यात आले. या ६५ गावाचे मुख्यमंत्री श्री फुलचंद गांधी हे होते. श्री चंद्रशेखर यांनी या नवनिर्मित तालुक्याच्या पोलिस अधिकाऱ्याची जबाबदारी पुर्णत्वाला नेली. १५ ऑगस्ट १९४८ ते १३ सप्टेंबर १९४८ पर्यंत २९ दिवस या ६५ खेड्यांचा पोलिस प्रमुख म्हणुन काम पाहण्याची जबाबदारी चंद्रशेखर वाजपाई यांनी पार पाडली हे

विशेष समजले पाहिजे.

औसाचे श्री शंभुगीर महाराज यांनी संपूर्ण मराठवाड्यातील सर्वात मोठ्या संख्येच्या तुकडीसह (१२५) सात ऑगस्टला उमरगा येथे सत्याग्रह केला. त्यांना व त्यांच्या बरोबच्या सत्याग्रहीला बेदम मारण्यात आले.

औसा तालुक्यातील कितीतरी गावांनी हैद्राबाद मुक्तीसंग्रामात हिरीरीने भाग घेतल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य सैनिकामध्ये शंकर लिबांजी बंडगर, विठ्ठल गोपाळ माने, धर्मवीर पांडुरंग धनगर, बाबुराव बळवंत गोरे, नरसिंह बाबारा जगताप, शांतीवरीप्पा शंकरप्पा माशाळकर, मुकुंद विठ्ठल चव्हान, गुरुलिंग विश्वनाथ हुच्चे, धर्मामाधव परीर, तुकाराम पंढरीनाथ लोखंडे, राम बसप्पा हाल्कुटे, दादाराव मारोती लोखंडे, ज्ञादेव माधवराव गोरे, किल्लारी येथील निळकंठ बाबुराव हेळंबे, गुंडाप्पा शामराव बिराजदार, विश्वनाथ माधय्या स्वामी, विलास कृष्णाजी पवार, शंकर बापु मुळगे, चनबसप्पा शेटे, सिद्राम ग्यानोबा बाभळसुरे, लक्ष्मण विठोबा भोसले, शामराव दादाराव हेळंबे, नारायण जोतिबा भोसले, भिमराव बाजीराव भोसले, पार्श्वनाथ मातीचंद भोसले, मारुती सखाराम भोसले, व्यंकट शिवराम सुरवसे, निलकंठ बाबारा बोदल, बसनवण्णा नागाप्पा फताटे, नामदेव दत्तोबा बाभळसुरे, किशन शिवराम बाभळसुरे, हिराचंद रामा भोसले, महादेव लिंबाजी बिराजदार, व्यंकटराव बाबुराव पोतदार, गुरुलिंग रामा कुंभार, शिवाप्पा भिमराव बालकुमेद, रामा व्यंक सगर, हणमंत शंकर बिराजदार, विश्वनाथ तुकाराम जोगी, रामा पेमा भोसले, शंकर गुंडांप्पा रेड्डी, विश्वनाथ ग्यानोबा माने, शंकर साधु उमाटे, गुरुपादप्पा शंकर बिराजदार, माधव एकनाथ परसलगे, तासूर्डी येथील पंढरी सखाराम माळी, निवृत्ती गोपाळराव शिंदे, शंकरण सखाराम अगासे, रंगाभिमा (नाशिक) इत्यादीचा समावेश दिसून येतो.

